# खाकी वर्दीतील
# वेचक आठवणी



सत्यमेव जयते

GREATER MUMBAI POLICE

बृहन्मुंबई पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय



# जनता जनार्दनांच्या सेवेसाठी सदैव तत्पर

# ।। श्रीसिद्धिविनायक ।।



वक्रतुंड महाकाय सूर्य कोटि समप्रभं
निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | 1 |
| आभार | 2 |
| लेखक परिचय | 3 |
| मनोगत | 5-11 |
| अंधश्रद्धा | 14 |
| देवदूत | 16 |
| वाईटातून बरे होते ते असे | 18 |
| धाडस | 20 |
| जत्रा | 22 |
| खेळ आंधळी कोशिंबीरीचा | 24 |
| अनामिका | 26 |
| नराधम | 28 |
| शाळेतला चोर | 30 |
| पोखरला डोंगर निघाला उंदीर | 33 |
| समज | 35 |
| सुलेमान बेकरी | 41 |
| संशय | 42 |
| गैरसमज | 43 |
| अफवा | 44 |
| खंडणी | 49 |
| आधुनिक धर्मराज (कविता) | 51 |
| विश्वासघात | 58 |
| पोस्टर | 62 |
| चोरीचे चेक | 68 |
| दागिन्यांची चोरी | 74 |
| कुंपणाने शेत खाल्ले | 82 |
| लहर | 95 |
| श्रद्धांजली | 102 |

# प्रस्तावना



माझे वडिल, दिवंगत विजय राजाराम पेडणेकर, सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त (मुंबई), यांनी त्यांच्या पोलिस जीवनाशी निगडीत कार्यकाळाचा, कर्तृत्वांचा व गुणगौरवांचा ठेवा जो त्यांनी त्यांच्या मनात साठवून ठेवला होता तो हया पुस्तकरुपाने जगासमोर सादर करताना मला मनापासून आनंद होत आहे. हया पुस्तकात त्यांच्या जीवनातील पोलिस कालखंडात घडलेल्या काही वेचक आठवणी त्यांनी त्यांच्या शब्दात मांडल्या आहेत.

सर्वच गुन्हयांचा तपास कायदयाच्या चौकटीत राहून व नुसत्या पुस्तकी ज्ञानाने होत नसून कधी कधी तेव्हा घडणा-या परिस्थितीनूसार, कधी सामंज्यस्याने, पुर्वानूभवाने, भावनिक आधार देऊन, तर कधी देवावरच्या श्रद्धेने पण सोडवला जाऊ शकतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

माझ्या वडिलांनी त्यांच्या कार्यकाळात किचकट आणि जाचक गुन्हयांचा तपास अतिशय कौशल्याने केला व पूर्ण कार्यकाळ त्यांनी गुन्हा तपास अधिकारी (Detection Officer) म्हणूनच काम केले. त्यातील ब-याच सत्यकथा यापूर्वीच ‘दक्षता’ व ‘लोकप्रभा’ अशा नामांकित मासिकातून प्रसिध्द झालेल्या आहेत आणि सर्वांनी त्या वाचल्या देखील आहेत.

त्यांनी त्यांच्या संपूर्ण पोलीस जीवनात ज्या प्रकारे गंभीर गुन्हयांचा तपास केला ते वाचून इतरांना देखील मार्गदर्शन व्हावे अशी त्यांची मनापासून इच्छा होती. परंतु दुर्दैव ! दिनांक २३/०६/२०१६ रोजी त्यांना देवाज्ञा झाली आणि त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले.

त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न, पूर्ण करण्याचा वसा मी त्यांची मुलगी या नात्याने स्विकारला. त्यांनी त्यांच्या हयातीत लिहिलेल्या ‘खाकी वर्दीतील वेचक आठवणी’ मी पुस्तकरुपी प्रकाशित करुन त्यांच्या चरणी विनम्र भावाने अर्पण करीत आहे.

या पुस्तकाचे मुळ लेखक माझे वडिल दिवंगत विजय राजाराम पेडणेकर हेच असून मी फक्त निमित्तमात्र आहे. माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याकरीता ज्यांनी मला मदत केली त्या सर्वांचे मी मनःपुर्वक आभार मानते. तसेच हया पुस्तकात काही त्रुटी राहिल्यास दिलगीरीही व्यक्त करते.

– सौ. भावना पेडणेकर चोरगे

# आभार

माझे वडिल कै. विजय राजाराम पेडणेकर हे दिनांक २३ जून २०१६ रोजी निवर्तले आणि त्यांच्या पोलीस कारकीर्दीतील अनुभवांचा अमुल्य ठेवा पुस्तकरुपी लोकांसमोर आणण्याचे त्यांचे स्वप्न अपुरे राहून गेले.

मी त्यांची मुलगी सौ. भावना, हिने त्यांचे हे अपुर्ण स्वप्न पुर्ण करण्याचा छोटासा प्रयत्न माझ्या परीने केला आहे. या पुस्तकात जर काही त्रुटी राहिल्या असतील तर आपण त्या मोठयामनाने माफ कराव्या अशी मी विनंती करते.

हे पुस्तक छापताना मला तुम्हां सर्वांचे अमुल्य योगदान मिळाले. तुम्ही सर्वांनी आपापल्या परीने माझ्या वडिलांबरोबरचे तुमचे अनुभव मला व आमच्या वाचकांना सांगितलेत. तुम्हां सर्वांच्या मदतीशिवाय हे शक्य झाले नसते. सर्वांची नावे इथे लिहिणे मला शक्य होणार नसल्यामुळे त्यातल्या त्यात ज्यांनी मला खूपच चांगले योगदान दिले त्यांची नांवे मी इथे आवर्जुन जाहीर करु इच्छिते व या माध्यमाद्वारे मी त्यांचे मनःपुर्वक आभार मानते.

१. श्री. प्रमोद दत्तात्रय कोदे (नि.न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई)
२. श्री. सुरेंद्र मोहन शंगारी, (नि. पोलीस महासंचालक, म.रा.)
३. श्री. नीळकंठ प्रतापराव म्हस्के (आय.पी.एस. पोलीस अधीक्षक (स्वे.नि.), मुंबई)
४. श्री. कालिदास निळकंठ कोळंबकर (आमदार, माजी राज्यमंत्री, मुंबई)
५. श्री. भास्कर गणपत उदावंत (संकल्पना, पो. निरीक्षक, भोईवाडा पो.ठाणे. मुंबई)
६. श्री. नितिन विष्णू कदम (विश्वस्त, श्रीसिध्दीविनायक मंदिर, प्रभादेवी, मुंबई)
७. डॉ. शंकर श्रीनिवासन. (प्लास्टिक सर्जन, वाडिया बालरुग्णालय, परेल, मुंबई)
८. श्री. किशोर तुकाराम कदम (उपाध्यक्ष, को-ऑ.बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई)
९. सौ. सीमा मंगेश दांडेकर (संगणक चालक, सहाय्यक मदतनीस)
१०. सौ. भारती चंद्रशेखर गांधी. (सहाय्यक मदतनीस)
११. श्री. उल्हास अनंतराव सावंत ( आनंद प्रिंटींग प्रेस)
१२. मे. सिध्दीविनायक ग्राफिक्स, दादर, मुंबई.
१३. श्री. सुरेश आत्माराम लाड (समाजसेवक)
१४. सौ. सुषमा चंद्रकुमार पौडवाल (नि.लायब्ररीयन,एसएनडीटी., युनिव्हर्सिटी, मुंबई)
१५. श्री. रवि भगवते. (शब्दांकन)
१६. लोकप्रभा मासिक
१७. दक्षता मासिक

आणि माझे सर्व हितचिंतक..

# लेखक परिचय



| | | |
|---|---|---|
| नांव | - | **कै. विजय राजाराम पेडणेकर** |
| जन्म दिनांक | - | ५ जानेवारी १९४१ |
| मृत्यु दिनांक | - | २३ जून २०१६ |
| शिक्षण | - | बी.ए. |
| आवड | - | वाचन आणि नियमित व्यायाम |

पोलिस दलात भरती - जानेवारी १९६६ साली. मुंबई पोलिस दलात भरती झाल्यानंतर नाशिक येथे २ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करुन आठव्या क्रमांकाने पास झाल्यामुळे थेट 'पोलिस उपनिरीक्षक' पदावर नेमणूक.

*** त्यानंतरची नेमणूकीची ठिकाणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सन १९६७ | - | पायधुणी पोलिस ठाणे. |
| २. | सन १९७२ | - | बांद्रा पोलिस ठाणे. |
| ३. | सन १९७३ | - | वरळी पोलिस ठाणे |
| ४. | सन १९७७ | - | वाहतूक शाखा. |
| ५. | नोव्हेंबर १९७९ | - | सामान्य शाखा, गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग |

*** दिनांक ०२/०९/१९८१ रोजी पोलीस इन्स्पेक्टर पदावर पदोन्नती मिळून याच शाखेत नियुक्ती झाली.**

६. सप्टेबर १९८४ - एन.एम.जोशी मार्ग पोलिस ठाणे.

७. जानेवारी १९८७ - विमानतळ सुरक्षा दल.

८ सप्टेंबर १९८७ - सहार विमानतळ पोलिस ठाणे.

९. जानेवारी १९९० - खार पोलिस ठाणे.

१०. जुलै १९९१ - दादर पोलिस ठाणे.

*** १५ ऑगस्ट, १९९१ रोजी राष्ट्रपती पोलिस पदकाने सन्मानित.**

११. जानेवारी १९९२ - पुन्हा जनरल ब्रांच, क्राईम ब्रांच, सी.आय.डी. येथे बदली आणि वरीष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून बढती.

* दिनांक १ मे, १९९२, महाराष्ट्र दिनी शिवाजी पार्क येथे भव्य सोहळ्यात **राष्ट्रपती पोलिस पदक बहाल.** त्याचबरोबर पोलिस महासंचालकांचे मानचिन्ह बहाल करुन सन्मानित.

१२. डिसेंबर १९९२ - माता रमाबाई आंबेडकर (एम.आर.ए.) मार्ग पोलिस ठाणे येथे वरीष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून बदली.

१३. फेब्रुवारी, १९९६ - शिवाजीनगर पोलिस ठाणे, गोवंडी येथे बदली.

* २ सप्टेंबर, १९९७ रोजी **सहाय्यक पोलिस आयुक्त** म्हणून पदोन्नती

१४. सप्टेंबर, १९९७ - ल.वि.१, नायगांव पोलीस मुख्यालय येथे बदली.

* नायगांव पोलीस मुख्यालय येथे सहाय्यक पोलिस आयुक्त (ए.सी.पी.) म्हणून नेमणुकीत असताना त्यांच्या तीस वर्षापेक्षा जास्त कार्यकाळाची गुणवत्ता व कामगिरी पाहून तेव्हाचे पोलिस आयुक्त श्री. मेंन्डोंझा यांनी १९९९ च्या गणतंत्र दिनी देण्यात येणा-या (POLICE MEDAL DISTINGUISHED SERVICE) साठी देखील शिफारस केली.

## शिफारशी आणि बक्षिसे..

१. **राष्ट्रपती पोलीस पदक**

२. **डी.जी.पी. एम.एस.इंन्सिग्निया - १**

३. **रोख बक्षिस - रु. १५,७००/-**

४. **सचोटी प्रमाणपत्र (Commendations) - ८४**

५. **प्रशंसनीय (Appreciations)- २१**

६. **चांगल्या नोंदी (Good Service Entries)- १२९**

७. **कस्टम - १**



**कालीदास कोळंबकर**
आमदार
महाराष्ट्र राज्य.

माझ्या बंधु-भगिनींनो,

**कै. श्री. विजय राजाराम पेडणेकर** हे माझे चांगले मित्र होते. माझ्या राजकीय कारकिर्दीत मला पुष्कळ पोलिस अधिकारी भेटले पण पेडणेकर साहेब यांचे व्यक्तिमत्व काही वेगळेच होते. एक घाव दोन तुकडे असा त्यांचा तडफदार स्वभाव होता. मनात एक आणि तोंडावर एक असा दुटप्पीपणा कधीच त्यांच्यात नव्हता.

कुठलाही धागादोरा नसताना, अनेक गंभीर गुन्हे त्यांनी उघडकीस आणले. कागदपत्रे तयार करण्यामध्ये त्यांचा हात कोणीही धरु शकत नव्हता. कुशल नेतृत्व, मेहनत आणि तल्लख बुध्दित्ता या गुणवत्तेवर यांनी अनेक पदके जिंकली. इंग्रजी भाषेवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. त्यांच्या वकृत्व वैपुण्यावर त्यांचे वरिष्ठ अधिकारीही अतिशय खुष असत. त्यांना राष्ट्रपती पोलिस पदकाने गौरविले गेले. सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून ते नायगाव सशस्त्र दलात कार्यरत असताना मला ते अनेकदा भेटत.

निवृत्त झाल्यानंतर सुध्दा त्यांनी त्यांचे काम सोडले नाही. त्यांच्या अनुभवांचा अमुल्य ठेवा स्वत:कडे न ठेवता त्यांनी अनेक नवीन कार्यरत झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांना फायदा करुन दिला.

एक चांगला माणुस, एक चांगला मित्र, एक दर्जेदार व्यक्तिमत्व मी गमावलं याचे मला अतिशय दु:ख होत आहे.

**त्यांना माझा शतशः प्रणाम !**

**(कालीदास कोळंबकर)**

५/३६, स्प्रिंग मिल चाळ, ग. द. आंबेकर मार्ग, नायगांव, मुंबई - ४०० ०१४. दूरध्वनी - २४१५ ४८४८.



## सुरेंद्र मोहन शंगारी

निवृत्त, पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य.

नमस्कार,

सन १९८७ साली मी अतिरिक्त पोलिस आयुक्त म्हणून विमानतळ सुरक्षा दल येथे काम पहात होतो. जानेवारी १९८७ मध्ये श्री. पेडणेकर, एन.एम.जोशी मार्ग येथून सदर पोलीस ठाण्यात रुजू झाले. त्यावेळचे पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांना घेऊन एअर इंडियाचे जंबो जेट विमान चीन येथे जाणार होते. ऐनवेळी त्या विमानाच्या विद्युततारा कुणीतरी कापल्याचे आमच्या लक्षात आले. हे विमान सहार पोलिस ठाण्याच्या हद्दीत नसताना देखील मी या तपासाचे काम श्री. पेडणेकर यांना दिले. तेव्हाचे आमचे पोलिस आयुक्त श्री. वसंत सराफ साहेब व इतर वरीष्ठ अधिकारी व मी हे श्री. पेडणेकर यांच्या कर्तबगारीबद्दल ऐकून होतो. सन १९७३ मध्ये ते वरळी पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना त्यांनी ज्याप्रकारे जातीय दंगल हाताळली होती व १९७९ साली ते गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग येथे असताना त्यांनी जी गुन्हे प्रकटीकरणाची धडाकेबाज कामगिरी केलेली होती, त्याबद्दल आम्ही अवगत होतो.

त्यांनी या विमान प्रकरणाचा तपास ज्या पध्दतीने केला व जो तपासाचा अहवाल आम्हा वरिष्ठांना सादर केला हे पाहून आम्ही सर्वजण त्यांच्यावर अतिशय खूष झालो. त्यांचे इंग्रजी भाषेवरचे प्रभुत्व, त्यांची वरीष्ठ अधिका-याशी अदबीने वागण्याची पध्दत व त्यांची शिस्त हे सर्व पाहून ते माझे कनिष्ठ अधिकारी न रहाता मित्र बनले.

श्री.पेडणेकर यांच्या रुपाने पोलीस खात्याला एक परिसच मिळाला होता. ते जिथे जिथे काम करतील, तिथे तिथे ते स्वतः तर नावलौकिक मिळवतीलच, पण ज्या वरिष्ठांसोबत काम करतील, त्यांचे व संबंधित पोलीस ठाण्याचेही नाव गौरवान्वीत करतील, याची मला खात्री झाली होती.

जानेवारी १९९० मध्ये खार पो. ठाणे येथे काम करुन ते जूलै १९९१ साली दादर येथे बदलून गेल्यानंतर परत जाने. १९९२ मध्ये जनरल ब्रांचमध्ये आले. १ मे, १९९२ साली त्यांना **राष्ट्रपती पोलीस पदकाने गौरवण्यात आले होते.**

मी स्वतः त्यांच्या घरी माझ्या पत्नीसह जाऊन गणेशमूर्ती देऊन त्यांचे अभिनंदन केले होते.

६ डिसेंबर १९९२ साली बाबरी मस्जिद पाडल्यानंतर जी मुंबईत जातीय दंगल उसळली अगदी त्याच दिवशी वरीष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून त्यांची माता रमाबाई आंबेडकर येथे नियुक्ती झाली होती. येथे हिंदू-मुसलमान लोकांची संमिश्र वस्ती असल्याने अतिशय संवेदनशील असा हा विभाग होता. पण त्यांनी ज्या पध्दतीने सर्व परिस्थिती हाताळली व हिंदू-मुसलमान लोकांमध्ये सलोखा राखला हे अगदी वाखाणण्यासारखे होते.

सन १९८७ साली आम्ही जे भेटलो, त्यानंतर २००४ साली मी निवृत्त होईपर्यंत आम्ही ऐकमेकांची साथ सोडली नाही. माझ्या निवृत्तीनंतरही आम्ही एकमेकांच्या संपर्कात राहिलो होतो.

पोलीस खात्याला त्यांचे फार मोठे योगदान लाभले होते. आणि आता या पुस्तकरुपाने ते पुढील पिढयांनाही मार्गदर्शक ठरतील व त्यांच्या अनुभवाचा नक्कीच फायदा होईल. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो ।

सु० मो० शंगारी

सुरेंद्र मोहन शंगारी
निवृत्त, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.



## नीलकंठ म्हस्के

आय.पी.एस.
पोलीस अधीक्षक (स्वे.नि.)

सन १९७२ ते २०१२ या ४० वर्षाच्या पोलीस सेवेत सब- इन्स्पेक्टर (म.पो) ते पोलीस अधीक्षक (भा.पो.से.) म्हणून कार्यरत असताना ज्या आदरणीय व कनवाळू पण कणखर अधिका-यांचा सहवास व मार्गदर्शन लाभले. त्यातीलच एक म्हणजे माझे ज्येष्ठ बंधू स्व.श्री. पेडणेकर साहेब.

१९७५ ते १९७८ या कालावधीत काळाचौकी पोलीस ठाण्यात फौजदार म्हणून कार्यरत असताना माझा (नवीन फौजदारास त्या काळी ''बाबल्या'' म्हणत) पेडणेकर साहेब वरळी पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना परिचय झाला.

प्रथमतः त्यांना पाहून मी थोडा घाबरलो होतो. पण पिळदार देहयष्टी, केसाळ कणखर मनगटे, चेह-यावर कटारी भाव, कडवे व्यक्तिमत्व पण मनाने प्रेमळ अगदी फणसासारखे असलेल्या पेडणेकर साहेबांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि मला एक पालक मिळाला.

मुंबईत टिकाव धरुन चांगला अधिकारी म्हणून नावलौकीक मिळविण्यासाठी कसे वागावे, कसे काम करावे ? याचे बाळकडू पेडणेकर साहेबांकडून मला मिळाले.

त्यानंतर २००९ पर्यंत मुंबई पोलीस मध्ये सेवेत असताना वेळोवेळी पेडणेकर साहेबांना भेटत असे आणि त्यांचा आशिर्वाद, गुन्हे तपासाबाबत मार्गदर्शन घेत होतो. कुटूंबियांबद्दलही आपुलकीने विचारपूर करुन मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देतोस ना? असा वडिलकीचा सल्ला मिळायचा.

साहेब आम्हां सर्वांना सोडून अनंताच्या प्रवासाला निघून गेले. काळजात रुखरुख लावून गेले.

त्यांच्या आमच्यासाठी तळमळत असलेल्या पवित्र आत्म्यास चिरशांती **लाभू दे हे परमेश्वरा।**

नीलकंठ म्हस्के
आय.पी.एस.
पोलीस अधीक्षक (स्वे.नि.)

*Justice Kode Pramod (Retd.)*

*(Former Judge Bombay High court)*

*204, Vardhaman Chamber,*
*2nd Floor, Cawasji Patel Street,*
*Fort, Mumbai - 400 001.*
*Tel.: 022 - 22040976*
*Email : kodepd19@gmail.com*

---

कै. विजय राजाराम पेडणेकर - म्हणजे माझा मामेभाऊ, स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात परिश्रमपूर्वक प्रवेश मिळवून स्वकर्तृत्वाने व अपार मेहनतीने त्यात ठसा उमटवणारे दुर्मिळ व्यक्तिमत्व. लहानपणी शालेय सुट्टी बहुदा आजोळी व्यतीत करत असल्यामुळे मला त्याच्या प्रदीर्घ सहवासाचा लाभ झाला. परेल येथील आर. एम. भट विद्यालयातील शालेय शिक्षणापासून पोद्दार महाविद्यालतील शिक्षणाच्या कालावधीत विजयदादाला पोलीस दलात प्रवेश करण्याचा ध्यास होता. त्याकालावधीत पोलीस प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक ते ज्ञान व शरीरसंपदा प्राप्त करण्यासाठी तो अत्यंत मेहनत करीत असे.

नाशिक येथे दोन वर्षाचे पोलीस प्रशिक्षण पुर्ण करून सन १९६७ मध्ये पायधुणी पोलीस ठाणे इथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून बृहन्मुंबई पोलीस दलात कार्यरत झाल्यावर विजयदादाच्या प्रगतीचा आलेख, तो जानेवारी १९९९ मध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त बृहन्मुंबई म्हणून निवृत्त होईपर्यंत सदैव उंचावत राहीला. त्यामध्ये १ मे १९९२ साली त्यास राष्ट्रपती पोलीस पदक देऊन गौरवण्यात आले. या दीर्घ कालावधीत बृहन्मुंबईतील अनेक महत्वाच्या पोलीस ठाण्यात/ शाखेत विविध प्रकारची प्रकरणे यशस्वीरित्या हाताळून तो नावलौकीकास प्राप्त झाला.

आमची कार्यक्षेत्र जरी वेगळी असली तरी माझ्या कार्यक्षेत्राचा पोलीस दलाशी संबंध येत असल्यामुळे मला वेळोवेळी दादाच्या कामाबाबत माहिती मिळत असे. त्याच्या यशामागील त्याची कार्यपध्दती, कार्यतत्परता, धडाडी, कठोर शिस्तप्रियता, परंतू माणुसकी जोपासण्याची वृत्ती सहका-यांबद्दल आपुलकी व प्रेम याबद्दलच्या मिळणा-या माहितीमुळे मला सदैव त्याचा अभिमान वाटत राहीला.

निवृत्तीनंतर सुध्दा स्वतःस सक्षम ठेवून कार्यरत राहून आपल्या अनुभवाच्या शिदोरीचा सहका-यांना मोलाचा लाभ देणा-या, आयुष्यभर कामाशी निष्ठावंत राहणा-या, सदैव दुस-यास जमेल ती मदत करणा-या, साधेपणातून मोठेपणा मिळवणा-या व त्यानंतर सुध्दा साधेपणा जपणा-या माझ्या कै. वडील बंधूस माझे शतशः प्रणाम.

अशा कर्मयोगी बंधूच्या कामाची ओळख दर्शविणा-या व पोलीसास मार्गदर्शन देणा-या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी माझ्या शुभेच्छा व आपल्या गौरवास्पद पित्याच्या स्मृती पुस्तकरूपे जतन करण्याच्या सौ. भावना चोरगे हिच्या स्तुत प्रयत्नाचे मनःपूर्वक कौतुक.

( प्रमोद दत्तात्रय कोदे )



**नितीन विष्णू कदम,**
**विश्वस्त,**
**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,**
**(प्रभादेवी), मुंबई**

''**विजय राजाराम पेडणेकर**''- १९७९ साली हे नाव पोलीस कमिशनर ऑफीस कंपाऊंडमध्ये असलेल्या गुन्हे विभागाच्या दोन मजली दगडी इमारतीच्या प्रत्येक दगडातून गुंजत असे.

या इमारतीच्या दुस-या मजल्यावरील जनरल ब्रांच त्या काळी खूप गजबजलेला विभाग. अरब देशात नोकरी करण्याच्या हेतूने दलालामार्फत जाण्याकरीता गांव खेडयातून आपले घर व जमीन विकून मुंबईला येऊन, या कुकर्मी दलालांच्या कचाटयात सापडून सर्व काही गमावून बसलेले, पोलिसांच्या या शाखेकडे धाव घ्यायचे. त्या काळात ५०-६० हजार रुपये या गाव-खेडयातून आलेल्यांकरीता खूप मोठी रक्कम होय. परत गावी जाऊन तोंड दाखवणे म्हणजे अशक्य, आता उरला फक्त एक मार्ग, आत्महत्या!

अशा गंभीर व केविलवाण्या परिस्थितीतल्या गरीबांचा वाली म्हणजे **'जनरल ब्रांच'**. त्या काळच्या त्या ब्रांचमधले सर्व अधिकारी आत्मियतेने काम करायचे, गरीबांचा पैं-नी-पैं या चिटर धोखेबाजांकडून, सक्तीने वसूल करुन या गरीबांना मिळवून द्यायचे. यातला 'धर्मराज-युधिष्ठीर'म्हणजे पोलीस उप-निरीक्षक 'विजय राजाराम पेडणेकर'.

रोज सायंकाळी ५/- रुपयाचे शेंगदाणे (त्या काळी ५/- रुपयात खूप शेंगदाणे मिळायचे) घेऊन मी जनरल ब्रांचमध्ये जाऊन या सर्व अधिका-यांसोबत माझी सायंकाळ घालवायचो. या सर्व अधिकारी मित्रांकडून खूप शिकायला मिळाले. जे आजही दैनंदिन जीवनात उपयुक्त सिध्द होते.

१९७९ साली पेडणेकर साहेबांशी नाळ जुडली ती आजपर्यंत कायम आहे. ते नसले तरीही त्यांच्या कुटूंबाशी अतूट नाते जुडलेले आहे. पोलिसी कर्तव्य बजावत असतानाही त्यांनी त्यांच्यातला माणून कायम जिवंत ठेवला.

*He was a officer and a gentleman. We miss him.*

नितीन विष्णु कदम



## डॉ. शंकर श्रीनिवासन

M.S. Mch (प्लास्टिक)
वाडीया चिल्र्डन हॉस्पिटल
परेल, मुंबई

नमस्कार,

माझा आणि पेडणेकर साहेबांचा परिचय झाला ते निवृत्त झाल्यानंतर. त्यांच्या पत्नीवर एक छोटीशी शस्त्रक्रिया करण्याच्या निमित्ताने आम्ही भेटलो. नंतर नियमित औषधोपचार करण्यासाठी मी त्यांच्याकडे जाऊ लागलो. जेव्हा जेव्हा मी त्याच्या घरी जायचो तेव्हा तेव्हा ते इतक्या प्रेमळपणे व आपुलकीने माझ्याशी वागत की रुग्ण आणि डॉक्टरचे नाते कधी मुलामध्ये बदलले मला समजलेच नाही.

ते पोलीस खात्यातून सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून निवृत्त झाले आहेत हे मला नंतर समजले. पण एक दर्जेदार व्यक्तिमत्त्वाचा माणूस म्हणून मी जेवढा त्यांना पारखला ते दोन शब्दात मांडणे अशक्य आहे.

अतिशय दानशूर, प्रेमळ पण शिस्तप्रिय असा त्यांच्या स्वभाव होता. स्वतःच्या पेन्शनमधून ते जमेल तेवढी मदत लोकांना करत. विशेषतः गरीब व गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी फी भरण्यासाठी भरपूर मदत केली.

७ जानेवारी २०१२ रोजी त्यांची पत्नी निवर्तली. त्यानंतर मात्र ते खचुन गेले. त्यांनी सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले. अनेक मान्यवर वकिल व पोलीस अधिकारी त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी येत. साहेबही स्वतःच्या अनुभवातून त्यांना आवडीने निःशूल्क मदत करत.

इंग्रजी भाषेवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. जुन्या चालीरीती जपणारे, पण तितकेच आधुनिक विचाराचे ते होते. त्यांच्याबरोबर कधी बाहेर गेलो असताना रस्त्यात जर कोणी त्यांच्या ओळखीचा पोलीस शिपाई किंवा अधिकारी दिसला तर तो पेडणेकर साहेबांना आवर्जून सलाम करे. कधी कधी तर काहीजण भररस्त्यात त्यांच्या पाया पडताना मी पाहिले आहे. मला अतिशय आश्चर्य वाटत असे. तेव्हा मला ते म्हणत, ‘मी माझ्या पोलीस जीवनात जे माझ्या सहकाऱ्यांना प्रेम दिले व जी मदत केली त्याची ही पोचपावती आहे“.

७ जानेवारी २०१६ रोजी त्यांनी त्यांच्या वयाची पंच्यात्तरी गाठली. मी सकाळीच त्यांच्या घरी शाल, श्रीफळ घेऊन त्यांचा आशिर्वाद घेण्यासाठी पोहोचलो. त्याची मुलगी भावना त्यांना आपण हा वाढदिवस थाटामाटात साजरा करूया असे विनवत होती. पण त्यांनी स्पष्ट नकार दिला. माझ्या समारंभाला जो काही खर्च येईल. तेवढया पैशाचे तू कॅन्सर रुग्ण व आंधळी मुलं यांना अन्नवाटप कर असे त्यांनी तिला सांगितले.

मी गेली १६ वर्षे वाडिया रुग्णालय परळ येथे प्लास्टिक सर्जन म्हणून कार्यरत आहे व मुंबईतील नामांकित २५ पेक्षा जास्त रुग्णालयाशी संलग्न आहे. माझ्या आयुष्यात मी हजारो माणसांना भेटलो पण पेडणेकर साहेबांचे व्यक्तिमत्त्व मी कोणातच पाहिले नाही.

देवपण न जाणे कुठून कसे नाते जुळवतो! ज्यांना आपण कधी ओळखतही नसतो त्यांना अगदी जिवाचे जीवलग बनवतो.

२३ जून २०१६ रोजी त्यांना देवाज्ञा झाली आणि माझ्या मनात एक खोल जखम देऊन गेली**. अजूनही मी या धक्क्यातून** सावरलेलो नाही. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास शांती देवो!

डॉ. शंकर श्रीनिवासन
M.S. Mch (प्लास्टिक)
वाडीया चिल्र्डन हॉस्पिटल



**के. टी. कदम**
उपाध्यक्ष,
को-ऑप.बॅंक एम्प्लॉईज युनियन, मुंबई

## माणूसकीचे प्रतिक

**कै. विजय रा. पेडणेकर,** निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त, मुंबई.

कै. विजय रा. पेडणेकर, यांची कन्या सौ. भावना ही त्यांच्या जीवन प्रवासावर एक स्मरणिका प्रकाशित करीत आहे, हे समजल्याने मला मनापासून आनंद झाला. कारण त्या निमित्ताने मला त्यांचे ऋण व्यक्त करण्याची संधी मिळाली. त्यांचे कार्य आणि कर्तव्य शब्दातून व्यक्त करायचे म्हंटले तर माझ्यासारख्या माणसाला ते पेलवणार नाही. सरकारी नोकरीत असतानाही त्यांनी माणूसकी जपली. कर्तव्याला प्रामाणिकपणाची जोड देऊन त्यांनी आपले वेगळे स्थान पोलिस खात्यात निर्माण केले होते.

मला एकदा माझ्या खाजगी कामानिमित्त रफी अहमद किडवाई मार्ग पोलिस ठाणे येथे जाण्याचा प्रसंग आला. पोलीस ठाणे म्हंटले की, कोणत्याही माणसाच्या मनामध्ये भिती निर्माण होते. मलाही अगोदर थोडी भिती वाटली. मी विजय पेडणेकर यांना फोन करुन मदतीची विनंती केली. ते कोणतीही अडचण किंवा कारण न सांगता ताबडतोब जातीने पोलीस ठाण्यामध्ये हजर झाले. ते निवृत्त झाले असताना देखील किडवाई मार्ग पोलिस ठाणे येथे आल्यानंतर जी काही मी वस्तुस्थिती पाहिली त्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. कारण अगदी कनिष्ठ कर्मचाऱ्यांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यत सर्वच त्यांच्याबरोबर आदराने व आपुलकीने वागत होते.

पोलिस अधिकारी म्हणून काम करीत असताना त्यांनी आपल्या कार्यात कधीही कसूर केली नाही. "मी एक जनतेचा रक्षक आहे" याची जाणिव ठेऊन त्यांनी सदैव काम केले. "पोलिस अधिकारी असलो तरी जनतेचे देणेकरीही लागतो" याच भावनेतून त्यांनी आपले आयुष्य वेचले. म्हणूनच त्यांचा आदरयुक्त दरारा पोलिस खात्यात होता. याची प्रचिती मला देखील आली. निवृत्त झाल्यानंतर देखील पोलिस खात्यामध्ये त्यांचे वजन होते, आदर होता. एका निवृत्त अधिकाऱ्याचे एवढे कोडकौतुक व्हावे यातच त्यांच्या संपुर्ण आयुष्याच्या कार्याची महती आली.

साहेबांच्या उपस्थितीमुळे माझे पोलिस ठाण्यातील काम विनाविलंब झाले. त्यांचा मी सदैव ऋणी आहे. त्यांचे उपकार मी या जन्मी तरी विसरु शकत नाही. त्यांनी पोलिस खात्यामध्ये कर्तव्यपुर्तीने व प्रामाणिकपणे काम केल्यानेच त्यांना सहाय्यक पोलिस आयुक्त पदापर्यंत बढती मिळाली, एवढेच नव्हे तर त्यांच्या कार्याची शासनाने देखील दखल घेतली आणि राष्ट्रपती पोलिस पदक देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

**अशा या महान व्यक्तिमत्वाला माझा सलाम !**

**(के. टी. कदम)**
**उपाध्यक्ष**
**को-ऑप. बॅंक एम्प्लॉईज युनियन, मुंबई**

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

सन १९६८ सालची गोष्ट, पूर्वीच्या काळी अशी प्रथा होती की, पोलिस ट्रेनिंग महाविद्यालयातून 'पास आउट' होऊन या परिविक्षाधिन अधिका-यांची उपनिरीक्षक म्हणून मुंबई शहरात नेमणूक होत असे व ती गुणवत्तेच्या श्रेणीनुसार होत असे. त्यानुसार सर्वांत प्रथम आलेल्यास 'Sword of Honour' च्या तत्वानुसार कुलाबा पोलिस ठाणे येथे नियुक्ती मिळत असे. सन १९६७ साली मी आठव्या नंबरने पास झालो. मला पायधुणी पोलिस ठाणे मिळाले व तेथे माझी नेमणूक परिविक्षाधिन पोलिस उपनिरीक्षक म्हणून झाली.

१ जानेवारी, १९६८ सालापासून माझ्या आयुष्याच्या नव्या पोलिसी पर्वाची सुरुवात झाली.

त्या काळी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक असत आणि त्यांच्या हाताखाली दोन Selection Grade Sub-Inspector, इतर अन्य अधिकारी व पोलिस शिपाई असत. त्यांची संख्या पोलिस ठाण्याचे कार्यक्षेत्र व विभागाच्या संवेदनशीलतेच्या तीव्रतेनुसार असे.

माझे पहिले वहिले पोलिस निरीक्षक

श्री. जे. बी. जाल. ते अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्वाचे, पारशी अधिकारी होते. ब्रिटिशांच्या काळात प्रशिक्षित झालेले, अत्यंत अनुभवी अधिकारी म्हणून त्यांचा दबदबा होता. सहा फुटाच्या वर उंची असलेल्या जाल साहेबांसमोर जाणे म्हणजे मोठे जिगरीचे काम होते. जाल साहेब स्वतः अतिशय शिस्तबध्द, पोलिसांच्या कामकाजाबाबत अतिशय निष्णांत, कार्यक्षम अधिकारी म्हणून त्यांचा वरीष्ठांमध्ये तसेच जनतेत बोलबाला होता. परिविक्षाधिन अधिका-यांसाठी तर ते गुरु द्रोणाचार्याप्रमाणे होते. आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन तयार झालो, याचा आम्हांला अभिमान आहे. ते जितके करारी, तितकेच मायाळूपण होते. त्यांच्यासमोर जाणे म्हणजे त्याकाळी एकप्रकारचे दिव्यच असे. ते स्वतः पोलिस ठाण्याचे प्रमुख असून देखील रोजच्या कामाविषयीचे ऑर्डरबुक अतिशय समतोलपणे लिहित असत. (ऑर्डरबुक म्हणजे वरीष्ठांच्या आदेशानुसार त्यांच्या हाताखालील पोलीस अंमलदारांना दिलेले कर्तव्य वाटप).

पायधुणी पोलिस ठाणे म्हणजे हिंदू-मुस्लिम मिश्र वस्ती. तसेच अनेक प्रकारचे व्यापारी, व्यवसाय करणारे जसे सराफी, धान्य, लोखंड बाजार व मालाची वाहतूक. बाजूला मुंबईची गोदी असल्याकारणाने अतिशय गजबजलेले असे हे पोलिस ठाणे त्या काळी प्रसिध्द होते. भारतीय दंड विधानामध्ये (IPC) नमुद असलेल्या बहुतांशी सर्व गुन्ह्यांची तिथे नोंद व तपास होत असे. त्यामुळे तेथे परिविक्षाधिन म्हणून नेमणूक झालेला अधिकारी जणू काही अग्निपरीक्षेत पास होऊन चोख सोने म्हणून बाहेर पडत असे. मी देखील त्यातला एक नशीबवान होतो, याचा मला प्रत्यक्षात अनुभव आला असे मी म्हणेन.

एकदा रात्रपाळी करुन सकाळी घरी जायची वेळ झाली तरी दुस-या दिवशीचे ऑर्डरबुक लिहिले गेले नाही असे फार क्वचितच व्हायचे. तेव्हा मी परळ, भोईवाडा येथे आई-वडिलांबरोबर रहात असे. संध्याकाळी नाक्यावरच्या इराण्याच्या हॉटेलमधून, दुस-या दिवशीची माझी काय डयूटी ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने फोन केला. तो स्वतः जालसाहेबांनी उचलला. ''जाल स्पिकींग'' हे शब्द कानी पडल्यावर माझी तर बोबडीच वळली. पुढे एक शब्ददेखील न उच्चारता गुपचूप फोनचा रिसीव्हर खाली ठेऊन मी बस पकडून पोलिस ठाणे गाठले व माझ्या दुस-या दिवसाची डयूटी समजून घेतली. इतका त्या काळी वरीष्ठांचा दबदबा असायचा. ही गोष्ट खरंच कौतुकास्पद होती, असे आजच्या परिस्थितीत मला वाटते.

त्यावेळी विधानसभेची निवडणूक तोंडावर आली होती. माझी नुकतीच नेमणूक झाली होती. सर्व राजकीय पक्ष निवडणूक प्रचाराच्या सभा घेत असत. अशीच एका पक्षाची सभा आयोजित झाली होती. इतर अधिका-यांबरोबर मलादेखील त्या सभेसाठी नेमण्यात

आले होते. ती माझ्या पोलिसी आयुष्यातील पहिली बंदोबस्त डयूटी होती. मी बंदोबस्ताच्या जागी पोहोचलो. इतर अधिकारी व कर्मचारी आधीच हजर होते. जाल साहेब आधीच जातीने हजर झाले होते. नाशिकहून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उत्तीर्ण होताना बरोबर काठी (Baton) आणली होती, ती घेऊन मी बंदोबस्ताच्या जागी हजर राहिलो. हातात असलेली काठी पाहून जाल साहेबांनी मला जवळ बोलावून घेतले आणि मला म्हणाले, 'तू काय साला ACP आहे की DCP आहे ? इतर हजर असलेल्या अधिका-यांना ते म्हणाले, 'अरे ! हे बघा साला आपला ACP आला. मी एकदम बुचकळ्यात पडलो व मला समजेना माझे काय चुकले. पुन्हा ते गरजले, 'मी कोण आहे, साला तुला माहिती आहे का? साला माझी उंची बघ किती आहे.' मी तर एकदम गोंधळून गेलो होतो. 'हे बघ! साला माझ्या हातात काय आहे.'त्यांच्या हातात असलेली मोठी लाठी दाखविली आणि मी काय समजायचे ते समजलो. मग त्यांनी जीप ड्रायव्हरला बोलावून घेतले आणि त्याला फर्मावले, ''हया साहेबाला बरोबर घेऊन जा, आणि ही काठी कुठे मिळते ते दाखव.'' ड्रायव्हर मला जवळच्या दुकानात घेऊन गेला आणि ती बंदोबस्ताची लाठी मी विकत घेतली. ती पहिली काठी (Baton) जी सोडली व ही बंदोबस्ताची लाठी हाती धरली ती अगदी शेवटपर्यंत. अगदी सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून बढती मिळेपर्यंत.

असे जालसाहेब माझे पहिले वहिले गुरु.त्यानंतर देखील मला एकापेक्षा एक, वरचढ गुरु भेटले व त्यांनी मला घडविले.



निवृत्त पोलिस कमिशनर श्री. आर. डी. त्यागी (IPS) यांच्या समवेत

# अंधश्रध्दा

## त्या पहिल्या वहिल्या पोलिस ठाण्यात व त्यानंतर माझ्या पोलिस सेवांमध्ये काही हृदयस्पर्शी आठवणीतून साकारलेल्या साठवणी खाली नमुद करीत आहे. त्यातील प्रस्तावना म्हणून ही पहिली आठवण.

या जगात जशी ठक, बनेल माणसं असतात, तशीच साधी-भोळी, आपण सध्या ज्यांना 'बावळट', 'वेडी' ठरवू अशीही माणसं असतात. अशा माणसांना मार्ग दाखविणं हेही पोलिसी कामाचा भाग ठरतो. हे मला माझ्या अनुभवांनी शिकवलं. त्यातलाच हा मला पहिल्या वहिल्या पोलिस ठाण्यात आलेला मासलेवाईक पण हृदयस्पर्शी अनुभव.

तो रविवारचा दिवस होता. माझी दिवसपाळी होती. आठ वाजता मी पोलिस ठाण्यात हजर झालो. साधारणपणे नऊच्या सुमारास दहा बारा धट्टया-कट्टया पैलवानांसारख्या दिसणा-या माणसांची झुंड स्टेशन हाऊस डयुटी (Station House Duty) कक्षाच्या बाहेर आली. सा-यांनी ढिला लेंगा व शर्ट परिधान केला होता. ते एकंदरीत देशाकडचे असावेत, असे दिसत होते. जसे काही मंदिरात प्रवेश करतेवेळी मंदिराच्या बाहेर माणसे उभी



राहतात तसे कुजबुजत होते व अगदी पायातल्या वाहाणा काढून एकमेकांच्या सम्मतीने मंदिराच्या गाभा-यात पदार्पण करतात तसे येऊन माझ्यासमोर उभे राहिले. तेव्हा सर्वांनी आपल्या उजव्या हाताचा तळवा समोर धरला होता व तो सुजलेला दिसत होता व त्यावर पिवळ्या रंगाचे औषध लावलेले दिसत होते. तेव्हा त्यांना 'काय झाले?' विचारले असता त्यांच्यापैकी एकाच्याही तोंडातून शब्द फुटत नव्हता. ते एकमेकांच्या चेह-याकडे पाहात होते. तेव्हा त्यांना धीर दिला असता ''तू बोल, तू बोल'' असे एकमेकांना सुचवित राहिले. शेवटी एकाच्या तोंडातून चाचरत चाचरत शब्द उमटले, ''साहेब, आम्ही लोखंडबाजारात महादेवाच्या टोळीत काम करतो (लोखंड वाहणा-या गाडया खाली करणे व भरणे हया हमालाच्या जथ्थ्याला टोळी म्हणत असत). आम्ही एकत्र गावच्या तालमीत राहतो. तालीम म्हणजे कुणा एका व्यापाऱ्याने त्यांच्या गोदामाच्या बाजूला राहण्याच्या केलेल्या सोयीचे ठिकाण. ''साहेब, रातच्याला आम्ही जेवून खाऊन दहाच्या सुमारास सर्व झोपी गेलो. सकाळी सात वाजता उठल्यावर म्हादया म्हणाला, 'मी माझ्या उशाखाली शंभर रुपयाची नोट ठेवली होती, ती जागेवर नाही, म्हणजे आमच्यापैकीच कोणीतरी चोरली. सर्वांनी आणाभाका घेऊन आपण चोरी केली नसल्याचे सांगितले. नोट मिळत नाही हे नक्की''असे म्हादयाचे म्हणणे होते. शेवटी एकमताने असे ठरले की, कढईत तेल गरम करावयाचे व प्रत्येकाने आपण गरम तेलाच्या कढईत टाकलेले नाणे काढून आपण चोरी न केलेल्याचे सिध्द करुन दाखवायचे. तेव्हा आम्ही सर्व म्हादयास म्हणालो की, ''तुझी शंभराची नोट खरेच चोरीस गेली यावर आम्ही विश्वास का ठेवावा?'' त्यावर म्हादया म्हणाला की, ''तेलात पहिला हात मी घालून नाणे काढून माझी नोट चोरीस गेली हे सिध्द करीन.'' आणि त्यानुसार साध्याभोळ्या माणसांनी खरेच कढईत तेल गरम केले व एका मागोमाग एक तेलात हात घालून नाणे काढून दाखविले. हा काय रामराज्याचा काळ नव्हता, याचे त्यांना भान नव्हते आणि जे व्हायचे तेच घडले आणि सर्वांनी आपल्या मनगटापर्यंत हात गरम

तेलाने पोळून घेतला व नंतर सारे जे.जे.रुग्णालयात उपचारासाठी गेले व तेथे 'पोलिस केस' नोंद झाल्यामुळे ते रुग्णालयातून पोलिस ठाण्यात हजर झाले.

यावर मी त्यांना म्हणालो, ''वेडयांनो हा सर्व उपद्व्याप करण्याआधी तुम्ही सारेजण पोलिसठाण्यात आला असतात तर हा अनर्थ टळला असता. तुम्ही राहता ती पत्र्याची शेड आहे व त्या भागात उंदरांचा सुळसुळाट आहे व ते स्वैरपणे फिरत असतात हे खरे की नाही? उशाखाली नोट ठेवल्यास त्याला तेल लागल्याने उंदीर ती नोट पळवू शकतो की नाही? तेलाची जळती वात देखील उंदराने पळविल्याने आग लागलेल्यांच्या घटना ऐकिवात असताना तुम्ही हा असा वेडेपणा का केलात? जर तुम्ही पोलिस ठाण्यात आला असता, तर प्रत्येकाने पाच-पाच रुपयाची वर्गणी काढून बाकी रक्कमेत आम्ही पोलिसांनी वर्गणी काढून भर टाकून म्हादयाचे हरविलेले शंभर रुपये उभे केले असते व हा अनर्थ टाळता आला असता. खुळ्यांनो! तुम्ही रोजच्या रोज मोलमजूरी करुन पोट भरणारे लोक, आता किमान आठ दिवसतरी तुम्ही काम करु शकणार नाही. अरे, हा काय रामराज्याचा काळ नाही की अग्निपरीक्षा करुन आपण निर्दोष असल्याचे सिध्द करावे.'' त्यानंतर त्यांचा जाब-जबाब घेऊन झालेल्या घटनेची कायदेशीर नोंद करुन त्या सर्वांना चहा-पाणी करुन जाऊ दिले.

---

***अशा भाबडया माणसांना मार्गदर्शन कसं करावे, याचा प्रत्यक्ष अनुभवातून मी बोध घेत होतो. माझ्या कार्यक्षमतेचा पाया इथं कुठंतरी घातला गेला, असं प्रकर्षाने मला जाणवलं.**

---



# देवदूत

## 'सच्चेपणाचा धडा शिकविणारा टॅक्सी चालकाच्या वेशातील देवदूतच ठरला. माझ्या पोलिसी आयुष्याला या घटनेमुळे वेगळी कलाटणी मिळाली.



असेच एकदा मला बंदोबस्तासाठी घाईघाईत डयुटीवर जायचे होते. पण मला उशीर झाला होता, म्हणून मी घराजवळून टॅक्सी केली. पुर्वी BMR व BMT अशा छोटया व मोठया टॅक्स्या असायच्या. BMR या छोटया टॅक्सीला 'बिमार' असे म्हणत असत. सर्वसाधारणपणे टॅक्सी करताना चांगली धडधाकट टॅक्सी निवडणे ही माणसाची वृत्ती असे. परंतु तेव्हा मला इतकी घाई होती की, सर्वप्रथम समोर आलेली टॅक्सी करुन त्यात मी बसलो व त्यानंतर माझ्या ध्यानात आले की, ती जुनी खटारा टॅक्सी होती. परंतू मला घाईत बंदोबस्ताला जायचे असल्याकारणाने मी त्याचा फारसा विचार केला नाही. त्यावेळी मी गणवेषातच होतो. गाडीचा चालक गाडीप्रमाणेच एक वृध्द मुसलमान होता. बहुधा तो गाडीचा मालक देखील असावा. मी चालकाच्या मागच्या सीटवर बसलो. त्या चालकास माझे जाण्याचे ठिकाण सांगितल्यानंतर

बसल्याजागी मला काहीतरी खुपल्याने मी चाचपडले असता मला एक छोटी सोन्याची अंगठी किंवा दुसरा लहान दागिना घेतल्यावर सोनार ज्या कुपीमध्ये घालून देतो अशी कुपी हाताला लागली. मी ती मालक वजा चालकास देऊन कुणा प्रवाशाची चुकून राहिली असावी असे सांगून सुपूर्द केली. त्याने ती घेऊन बेदरकारपणे डॅश बोर्डवर टाकली. मी देखील त्याला तितकेसे महत्व दिले नाही. कारण मला वेळेवर नेमणूकीच्या ठिकाणी बंदोबस्तावर पोहचायचे होते. मी त्यास थोडा वेग वाढविण्यास सांगितले. चालक वजा मालकाच्या वयासारखी ती जुनी टॅक्सी धावत असताना मध्येच छोटयाश्या खड्डयाने दणका दिल्याने डॅश बोर्डच्या खाली असलेल्या टूल बॉक्सच्या झाकणाने तोंड उघडले व त्यात मला माझ्या हाताला लागलेल्या कुप्या सारख्या अनेक कुप्या दिसल्या. तेव्हा माझे कुतूहल जागरुक झाले व त्याबाबत मी त्यास विचारले असता, त्याने मला एक कुपी दिली व सांगितले, 'साहब, डब्बी खोलकर देखो. त्यावर मी ती कुपी उघडली असता त्यात मला एक छोटी कागदाची चिठ्ठी सापडली व ती चिठ्ठी मी उघडून वाचली असता त्यात लिहिले होते, ''दुसरे की अमानत पर बुरी नजर मत रखो'' नंतर तो मला म्हणाला की, जेव्हा **कुणी प्रवासी त्याची टॅक्सी** ठरवितो तेव्हा तो मोठया शिताफीने प्रवासी टॅक्सीत बसण्याच्या आधी ती कुपी सीटवर टाकतो व नंतर पाठीमागचे दिसण्यासाठी लावलेल्या ड्रायव्हरच्या समोरच्या आरश्यातून प्रवाशाच्या हाताला ती कुपी लागल्यानंतर त्याच्या मनात चाललेली व शारीरिक चलबिचल, हालचालीची घालमेल न्याहाळतो. त्याच्या म्हणण्याप्रमाणे बहुतांशी पुरुष प्रवासी कुपी हाताला लागल्यानंतर आपल्या निदर्शनास आणून देतात. परंतु महिला प्रवासी ती कुपी लाटण्याच्या मनःस्थितीत असतात व ती कुपी ज्यारितीने व परिस्थितीत ती/तो प्रवासी आपल्या पर्स/पिशवी/ बॅगमध्ये टाकत असताना जो प्रयत्न करत असतात ती वेळ अगदी खेदनिय, पण आल्हादकारक असते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे ती कुपी लाटण्यात यशस्वी झाल्यानंतर काहीजण तर टॅक्सी ठरवितेवेळी सांगितलेल्या ठिकाणी जाण्याअगोदरच टॅक्सी सोडून देतात. तेव्हा तो मनात म्हणत असे, 'चलो मियॉं घर जाके सच्ची जिंदगी जीने का सबक सिखो.' हे सारे ऐकल्यानंतर मला खूप हसू आले व त्या व्यक्तीबद्दल आदरही वाटला. आज समाजात अशा प्रकारच्या आदर्श शिकविणा-या व्यक्ती फार कमी असतात. मी तर त्यांना वंदन करतो.



ल.वि. १, नायगांव पोलिस मुख्यालय येथे मानवंदना देताना

# वाईटातून बरे होते ते असे

तो सोमवारचा दिवस होता व मी ठाणे अंमलदार म्हणून दिवसपाळीच्या डयूटीवर होतो. साधारणपणे ११.०० वाजण्याच्या सुमारास एक गुजराती ३७-४० वयाच्या आसपास असलेली स्त्री धापा टाकत पोलिस ठाण्यात आली व माझ्यासमोर बाकडयावर बसली. तिने टेबलावर डोके टेकले व तिची शुध्दच हरपली. आम्ही लगेच तिच्या तोंडावर पाणी मारले व तिला शुध्दीवर आणले. गरम गरम कॉफी पाजून तिला धीर देऊन तिच्या समस्येबद्दल विचारले असता ती म्हणाली, 'पाटीवाले हमाल के पास साडी का बंडल दिया था, वो हमाल साडी के बंडल के साथ गायब हो गया है । वो १६,०००/- रुपये का माल है, मैं तो मर जाऊँगी । आणि माझ्या मनात चर्र... झाले.

पायधुणी पोलिस ठाणे व आजुबाजुचा परिसर हा सोन्या-चांदीची दुकाने व किंमती शालू, साडी वगैरेच्या दुकानांनी व्यापलेला असायचा. साडीच्या दुकानाचे होलसेल व्यापारी गरजू बायकांना साडीच्या पदराच्या गाठी बांधण्याचे काम मोबदल्याने देत असत. स्त्रिया साडया घरी घेऊन जात असत व दुस-या दिवशी काम पूर्ण करुन देत असत. साडया घरी नेताना त्या एखादया पाटीवाल्याकडे देत असत व पाटीवाला साडयांसकट गायब झाल्याच्या तक्रारी वरचे वर येत असत. जागोजागी फलक लावून लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतो. तरीही गर्दीचा फायदा घेऊन माल घेऊन हमाल गायब होत असत

त्या बाईची रितसर तक्रार दाखल करुन घेऊन आम्ही ती केस उघडकीस आणण्यासाठी भरपूर प्रयत्न केला. व आमच्या शोधपथकाने (Detection Staff) अशा प्रकारच्या चो-या करणा-या चार-पाच हमालांना देखील अटक केली आणि अशा प्रकारचे पूर्वी नोंदविलेले अनेक गुन्हे उघडकीस आले. परंतु जंग जंग पछाडून देखील ह्या बाईचा माल ज्या हमालाने लंपास केला त्या हमालाचा तपास काही लागला नाही आणि आम्ही सारे हताश झालो



आमच्या शोधपथकाच्या (Detection Staff) चलाख व अनुभवी हवालदाराला ह्या बाईचा चोरीस गेलेला माल कुणी विकत घेतला होता, याची कुणकुण लागली व त्याला आम्ही छेडले असता त्यांनी आमच्या विरुध्द आमच्या ए.सी.पी. साहेबांकडे तक्रार केली. तेव्हा आमच्या ए.सी.पी. साहेबांनी आम्हांस बोलावून दम देखील भरला होता. 'पाटीवाला हमाल पकडला आहे का? मग कुठल्या आधारावर तुम्ही त्यास माल खाऊ म्हणून हटकता. उगाच त्याला त्रास देऊ नका,' असा

दम आम्हांस भरला. मी तर खात्यात नवीनच होतो. पण आमच्या चाणाक्ष व अनुभवी हवालदाराला काय झाले असावे ते कळून चुकले होते. तो मला म्हणाला, ''साहेब, तुम्ही गप्प बसा, मी काय ते बघतो'' व न डगमगता त्याने तो चोरीचा माल घेणा-या व्यक्तीला पुन्हा छेडले. त्याला त्या गरीब बाईची झालेली केविलवाणी स्थिती समजावून सांगितली. त्याला सज्जड दम देखील भरला. ''तुम तो चोरी का माल लेने में मशहूर हो, चोरी का माल लेने का धंदा छोड दो, नही तो कभी हमारे हात में लगोगे, तो तुम्हारी क्या हालत कर देंगे वो याद रखना.'' त्यावर त्याने चोरीचा माल आपण घेतल्याचे कबूल केले व सांगितले, ''भाई, वो चोर को भी पैसा दिया है, मुझको तो सिर्फ सात-आठ हजार रुपया मिला है.''त्याने ते नफ्याचे मिळालेले पैसे त्या बाईला देण्याचे कबूल केले.

मध्यंतरीच्या काळात आम्ही त्या बाईला ज्या व्यापा-याने काम दिले होते, त्या व्यापा-याला भेटून सत्य परिस्थिती समजावून सांगितली व ती बाई प्रामाणिक असल्याचे पटवून सांगितले व तिला काम देण्याचे चालू ठेवण्यास विनंती केली. नंतर आम्ही त्या चोरीचा माल घेतलेल्या इसमाकडून मिळालेले पैसे व त्यात आम्ही सर्वांनी वर्गणी काढून माणुसकीच्या नात्याने बारा-तेरा हजार रुपये उभे केले व त्या बाईकरवी साडीवाल्या व्यापा-याला दिले. त्या बाईला काम देण्याची विनंती केली. त्या बाईचे, व्यापा-याचे तीन-चार हजार रुपये देणे बाकी होते व तिचा उदरनिर्वाहसुध्दा त्याच कामातून होत असे. म्हणून ती बाई जिकीरीने अधिक काम अंगावर घेऊ लागली. तिला आम्ही योग्य त्या सावधगिरीच्या सूचना दिल्या होत्या. किंबहुना त्या व्यापा-यानेच एका माहितीच्या हमालाची नेमणूक करुन त्या बाईच्या कामाला हातभार लावला व तिचे काम चालू राहिले.

एक दोन महिन्याचा काळ लोटला व एक दिवस सदरची बाई नटून थटून चांगले कपडे घालून पोलिस ठाण्यात सकाळीच आली. तो रविवारचा दिवस होता. तिने सोबत एक डबा भरुन स्वतः हाताने घरी बनविलेले खादयपदार्थ बरोबर आणले होते. तेव्हा ती सुखावलेली दिसत होती. तिने आम्हांला सोबत आणलेले खादयपदार्थ खाऊ घातले. ती बाई म्हणाली की, ''त्या झालेल्या घटनेमुळेच तिच्या आयुष्याला कलाटणी मिळाली.''ती पुढे म्हणाली की, त्या व्यापा-याचे पैसे देण्यासाठी तिने स्वतः काम केले व तिला एक कल्पना सुचली. ती आपण आणलेले काम इतर होतकरु व गरजू बायकांना देत असे व त्यांच्याकडून ते काम करुन घेत असे व त्यात तिला आपले कमिशन देखील मिळत असे. असे करत करत तिने आपल्या घरातच 'कॉटेज इंडस्ट्री' उभारली व तिला महिन्याकाठी चांगली कमाई होऊ लागली. आम्ही देखील त्या धाडसी स्त्रीचे धैर्य व कसब पाहून आश्चर्य- चकित झालो. त्यानंतर ती बाई अशीच अधूनमधून माझी डयूटी जाणून घेत असे व असाच घरी बनविलेला फराळ आम्हांस खाऊ घालत असे. त्यानंतर कालांतराने माझी बांद्रा पोलिस ठाणे येथे बदली झाली. ती बाई कदाचित आता छोटी कारखानदार देखील झाली असावी. ईश्वर तीचे भले करो.

* **वाईटातून बरे होते ते असे.**



ना. म. जोशी मार्ग पोलिस ठाणे येथे सत्कार स्विकारताना

# धाडस

**बांद्रा पोलिस ठाण्यात डिटेक्शन ऑफिसर म्हणून कार्यरत असताना अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणून तपास करण्यात मी यशस्वी ठरलो होतो. त्यातील मी तपास केलेल्या दोन गुन्हयांची माहिती सत्यकथेच्या स्वरुपात १. लहर व २. विश्वासघात या सदरामध्ये 'लोकप्रभा' या मासिकात सादर केलेल्या आहेत व त्या आपल्या वाचनाकरीता या पुस्तकात छापल्या आहे.**

मे, १९७२ मध्ये माझी पायधुणी येथून बांद्रा पोलिस ठाण्यात बदली झाली. अशी प्रथा आहे की, बदली झाल्यानंतर आपल्या जवळ असलेल्या तपास प्रलंबित गुन्हयांची कागदपत्रे व पोलिस ठाण्यासंबंधीत असलेल्या इतर कागदपत्रांची सूची करुन ती वरीष्ठांना प्रत्यक्ष भेटून सुपूर्द करावी. त्याला (Call on) म्हणतात. त्यांचा आर्शिवाद व शुभेच्छा घेऊन नवीन नेमणूक झालेल्या ठिकाणी हजर व्हावे. या सर्व गोष्टींची पूर्तता करेपर्यंत दुपार टळून गेली होती. सर्वांचा आशिर्वाद घेऊन नवीन नेमणूक झालेल्या बांद्रा पोलिस ठाणे येथे रिपोर्ट करेपर्यंत दोन वाजून गेले होते. पोलिस ठाण्यात पोहचताच पोलिस ठाण्याचे प्रमुख पोलिस इन्स्पेक्टर श्री. डिसिल्वा यांना रिपोर्ट करताच स्वागताचे बोल तर सोडाच, पण घडयाळाकडे पाहून 'ही काय रिपोर्ट करण्याची वेळ आहे का?' असा सवाल त्यांनी मला विचारला. मग मी त्यांना समजावून सांगितले की, ''मी माझ्या सर्व वरीष्ठांना भेटून मगच पायधूणी सोडून सरळ पोलिस ठाण्यात हजर झालो, त्यामुळेच सदरचा उशीर झाला आहे.'' त्यांनी ''ठीक आहे, रुजू व्हा !'' असे फर्माविले व सांगितले की, ''आज आपल्याला रात्रपाळी (स्टेशन हाऊस) डयूटी देण्यात आली आहे. तेव्हा आठ वाजता डयूटीवर यायचे, हे ध्यानात असू दया.'' खुणेनेच जाण्यास सांगितले. त्यानंतर इतर अधिका-यांना भेटून त्यांची ओळख करुन होईपर्यंत चार वाजून गेले होते.

आठ वाजता परत डयुटीवर जायचे आहे, याची जाणीव ठेवून मी घरी जात असताना माझ्या मनात विचार आला की, चार वाजेपर्यंत पोलिस ठाण्यात हजर असल्याचे माहित असताना देखील नव्याने बदलून आलेल्या अधिका-याला पोलिस ठाण्याची व तेथील परिसराची काहीही माहिती नसताना रात्रपाळी दिली गेली आहे, याचे मनात दुःख तर झाले आणि राग देखील आला होता. या पोलिस ठाण्यात आपले पुढील भविष्य काय असेल? याचा विचार करत करत घरी गेलो व रात्री आठ वाजता पुन्हा पोलिस ठाण्यात डयूटीवर हजर झालो.

आठ वाजता कामाचा ताबा घेतला. पोलिस ठाणे नवे, परिसर नवा, सहकारी नवे, सारे वातावरणच नवे अशा परिस्थितीत कामावर रुजू झालो. रात्री एकच्या सुमारास बांद्रा मशिदच्यासमोर असलेल्या पेट्रोल पंपावर चोरी झाल्याची, कंट्रोल रुम येथून फोन आला असता शोध पथक (Detection Staff) व इतर कर्मचा-यांसह भेट दिल्यानंतर चौकशीअंती असे समजले की, पेट्रोल पंपावरचे वितरण करणारे दोन कर्मचारी बाहेर ट्रान्झिस्टर रेडिओ लावून थंड हवा खात असताना, एक अज्ञात इसम हातात चाकू घेऊन आला व त्याने एका

कर्मचा-याच्या हातातून मनगटी घडयाळ व दुस-याच्या हातातून ट्रान्झिस्टर रेडिओ जबरदस्तीने घेऊन, जणू काही घडलेच नाही अशा थाटात आरामशीर बांद्रा कत्तलखाना झोपडपट्टीच्या दिशेने निघून गेला. मी तर पोलिस ठाण्यात नवा होतो. परंतू माझ्यासोबत आलेले विशेष पथकाचे कर्मचारी त्या पोलिस ठाण्यात पुर्वीपासून कार्यरत असल्याकारणाने त्यांनी ताडले की, हे काम बहुधा मन्नन खान याचे असले पाहिजे. नंतर मला स्टाफकडून समजले की, मन्नन खान हा बांद्रा कत्तलखान्यात काम करणा-या एका कर्मचा-याचा दिवटा मुलगा होता. बांद्रा कत्तलखान्याचा परिसर फार मोठा होता व तेथे काम करत असलेले कर्मचारी त्याच परिसरात कत्तलखान्याच्या क्वाटर्स, पत्र्यांच्या चाळी व त्या परिसरात विखुरलेल्या झोपडपट्टीत रहात असत. मन्नन खान त्यातील कर्मचा-याचा मुलगा होता. व तो चो-यामा-या करत असे व बाहेर कुठेतरी रहात असे. अधूनमधून तो झोपडपट्टीत येत असे व कुणाच्याही घरी घुसून चाकूच्या धाकाखाली स्त्रियांची अब्रू लुटत असे. त्याचा धाक इतका होता की, त्याच्या धाकापोटी तक्रार करावयास कोणीही धजत नसे. त्याचे आईवडिल व इतर नातेवाईक देखील त्याच्या जाचाला कंटाळलेले होते. वर नमूद केलेला गुन्हा जेव्हा त्याने केला, तेव्हा तो दारुच्या नशेत होता व त्यानंतर झोपडपट्टीत कुणाच्या तरी घरात वाईट उद्‌देशाने घुसला होता. त्या विभागातील सर्वच लोक त्यांच्या विरोधात होते व त्यामुळे तो त्या परिसरात असल्याची कुणकुण आम्हांला लागली. त्यापूर्वी त्या पेट्रोल पंपाच्या दोन्ही कर्मचा-यांची जबानी घेऊन रीतसर जबरीच्या गुन्हयाची नोंद केली. इतर गुन्ह्याबाबतचे कामकाज संपविले. मन्नन खान परिसरात असल्याची कुणकुण असल्याने सोबत आवश्यक कुमक घेऊन आम्ही त्याला झोपडपट्टीतून पकडण्यात यशस्वी झालो. जेव्हा त्यास पकडले, तेव्हा त्याच्याकडे नुकताच चोरलेला ट्रान्झिस्टर रेडिओ, मनगटी घडयाळ व त्याव्यतिरिक्त आणखी दोन मनगटी घडयाळे त्याच्या खिशात सापडली. त्यांना पोलिस ठाण्यात आणल्यानंतर सर्वत्र कत्तलखान्यात दहशत पसरवणा-या कुप्रसिध्द मन्नन खानला अटक करुन वर नोंदविलेला गुन्हा तर उघडकीस आणलाच, पण त्याच्या खिशात सापडलेल्या दोन मनगटी घडयाळ्यांचे मालक देखील शोधून काढण्यास आम्हांस यश मिळाले व सदरची दोन घडयाळेदेखील पेट्रोल पंपावर चोरी करण्यापूर्वी त्या परिसरातल्या लोकांच्या हातातून हिसकावून घेतल्याचे लक्षात आले व त्या गुन्हयांची देखील रीतसर नोंद केली. माझ्या पहिल्याच रात्रपाळीच्या डयूटीत स्टेशन हाऊसचे नित्याचे काम सांभाळून वर नमूद केलेला गंभीर गुन्हा उघडकीस आणला. रात्रभरात तपासाचे कागदपत्र तयार करुन सकाळी पोलिस निरीक्षक श्री. डिसिल्वा साहेबांस सुपूर्द केले व मन्नन खान यांस कोर्टातून पोलिस कोठडी मिळण्यासाठी आवश्यक ते कागदपत्र तयार करुन घरी रवाना झालो. घरी थोडा आराम करुन संध्याकाळी वरील गुन्हयाचा पुढील तपास करण्यासाठी पोलिस ठाण्यात हजर झालो असता तेव्हाचे आमचे ए.सी.पी. श्री. जाल साहेब हे दुपारी रोजच्या भेटीला (Visit) आले असता, मी तपास केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर माझ्या कामाची कार्यपध्दती व तपासाची पध्दत पाहून एकदम खूष होवून त्यांनी इन्स्पेक्टर डिसिल्वा यांना मला डिटेक्शन ऑफिसर म्हणून नेमणूक करण्याची शिफारस केली व डिसिल्वा साहेबांनी देखील ते मान्य करुन माझी डिटेक्शनसाठी नियुक्ती देखील केली व त्यातच तेव्हाचे माझे पी.आय. सुरेश जयवंत व अर्जुन देसाई यांनी माझे काम पाहून हा निर्णय उचलून धरला व माझ्या श्रमाचे चीज झाले.

सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर त्याच्यावर रीतसर चार्जशिट दाखल केले गेले व पुढे गुन्हा सिद्‌ध झाल्याने सत्र न्यायालयाने त्याला सात वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. अशाप्रकारे बांद्रा पोलिस ठाणे येथे माझे नवे पर्व सुरु झाले. पायधुणी पोलिस ठाण्यात कार्यरत करताना माझे पहिले इन्स्पेक्टर श्री. जालसाहेब यांची जेव्हा बदली झाली, तेव्हा त्यांनी मला खास बोलावून सांगितले की, **''यापुढे तू कोठेही बदली होवून गेलास तरी डिटेक्शन ऑफिसर म्हणूनच काम करशील''** आणि त्यांनी केलेले भाकित खरे ठरले.

# जत्रा

## कोणाच्या खांदयावर कोणाचे ओझे

बांद्रा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दरवर्षी माऊंट मेरीची जत्रा भरते. ती सर्वसाधारण पावसाळा अखेरीस असते. माऊंट मेरी नवसाला पावते आणि सर्व धर्मातील लोक जातीने त्या जत्रेस हजेरी लावतात, खास करुन नवस फेडण्यासाठी. मी लहान असताना माझ्या आजीचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झाले होते. त्या काळात हे ऑपरेशन म्हणजे गंभीर बाब समजली जायची. मला अजून आठवते डॉक्टर बालीगा यांच्या ऑपेरा हाऊस येथील हॉस्पिटलमध्ये तिचे ऑपरेशन केले होते. ती बरी झाल्यावर माझी आई आम्हांला नवस फेडण्यासाठी जत्रेच्या काळात माऊंट मेरीला घेऊन गेली होती. अजून आठवतयं, पोटाच्या आकाराची मेणाची प्रतिकृती आम्ही देवीला अर्पण केली होती.

जत्रेच्या काळात गर्दीचा फायदा घेऊन बायकांची छेडा-छेडी केली जाते. पाकिटमारी सारखे किरकोळ गुन्हे घडतात. त्याला प्रतिबंध म्हणून तेथे तंबू ठोकून सब पोलिस स्टेशन बांद्रा पोलिस स्टेशनच्या अखत्यारीत उघडले जायचे. त्याचा तपास अधिकारी प्रमुख (Detection Officer In charge) असायचा. त्या काळात तपास अधिकारी (Detection Officer) तेथे बसलेला असायचा. अर्थातच माझी (Detection Officer) म्हणून निवड झाल्यानंतर अशाच एका जत्रेत मी तेथे बसलो असता एक ख्रिश्चन बाई संध्याकाळच्या सुमारास आयासोबत तेथे आली. तिने त्याच परिसरात रहात असल्याचे सांगितले. तिने तिची रांगत्या वयाची मुलगी आयाजवळ देऊन तिला फिरवून आणण्यास सांगितले होते. तिच्या आयाच्या म्हणण्याप्रमाणे कुणा बदमाशाने तिच्या मुलीला हिसकावून घेऊन पलायन केले. गजबजलेल्या जत्रेत अशी घटना घडणे अशक्य नव्हते.पण आया धादांत खोटे बोलत होती, हे मी ताडले. बाईचा नवरा पारसी असून एअर इंडिया मध्ये पायलट होता. त्याचे विमान रात्रीपर्यंत परदेशातून येणार होते. बाईच्या सांगण्यानुसार त्याचे त्या मुलीवर इतके प्रेम होते की, आपल्या मुलीच्या अपहरणाची घटना त्याचे कानी गेली तर तो तिला गोळीच घालील.बाई ओक्साबोक्सी रडत होती.



जत्रेच्या काळात लोकांच्या करमणुकी साठी फिरता पाळणा वगैरे अनेक प्रकारची करमणुकीची साधने लावतात. फिरता पाळणा चालविण्यासाठी खड्डा खणून त्यात मोटर बसविली जाते व त्या मोटारीला बसवलेल्या पट्टयामुळे पाळणे फिरतात. बाईचे हरवलेले मूल तर रांगते होते. माझ्या मनात चर्र झाले, वाटले की जर हे रांगते मूल असेच चोरटयाने सोडून दिले आणि जर ते रांगत रांगत अशाच खड्डयापाशी आले तर खुप मोठा अनर्थ घडू शकेल. म्हणून मी लगेचच माझ्या सर्व सहका-यांना त्या मुलीच्या शोधात पिटाळले. मला माझ्या आईने आजीसाठी केलेल्या नवसाची आठवण झाली. मीही माऊंट मेरीला नवस केला की, ''त्या बाईचे हरवलेले मूल सुरक्षित मिळू दे, जेणेकरुन ती बाई आपल्या नव-यासोबत मेणाचे बाळ अर्पण करुन नवस फेडेल.''

काही मिनिटातच माझा शिपाई ते बाळ घेऊन तंबूत आला व म्हणाला की, परिसरातच एका बाकावर ते बाळ मोठमोठ्याने रडत होते व कुतूहलाने लोकांची गर्दी जमली होती. ते हरवलेलेच बाळ असावे असे समजून ते बाळ शिपाई घेऊन आला होता.

ते बाळ पाहताच त्याच्या आईचा आनंद गगनात मावेनासा झाला. तिने तिचे बाळ अगदी हृदयास कवटाळून घेतले. तिच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. मग मी आयास खडसाविले, तिने दिलेल्या जबानी बद्दल कसून चौकशी केली असता असे समजले की, ती जेव्हा बाळाला फिरायला घेऊन गेली तेव्हा तिचा प्रियकर तिला भेटला. तिने त्या बाळास बाकड्यावर बसविले व आपल्या सोबत बाळ आहे याचे भान विसरली. ती आपल्या प्रियकरासोबत बाजूस कोठेतरी गप्पा मारत असताना कुणी अज्ञात चोरट्याने ते बाळ एकटे असलेले व त्याच्या गळ्यात सोन्याची साखळी असलेले पाहून उचलून बाजूस नेले. सोन्याची साखळी काढून घेऊन ज्या बाकड्यावर ते बाळ सापडले त्या बाकड्यावर त्या बाळास बसवून तो भामटा साखळी घेऊन पसार झाला होता.

ती बाई पुढे म्हणाली की, तिचे मुल सुरक्षित मिळाल्याने चोरीस गेलेल्या साखळीविषयी तिची कोणतीही तक्रार नाही व झाल्या प्रकाराची वाच्यता पोलिसांनी कुठेही करु नये व त्या आयास तिच्या चुकीबद्दल माफ करावे. ती बाई जेव्हा बाळास घेऊन घरी जावू लागली तेव्हा मी माऊंट मेरीस केलेल्या नवसाबद्दल व तो आपल्या पती समवेत जाऊन फेडावा अशी विनंती केली असता ती हादरुनच गेली व मला म्हणाली की, तिने झाल्या घटनेबद्दल सारे नव-यास सांगितले तर तिची काही खैर नाही व तो नवस फेडणे तिच्याने शक्य होणार नाही. पुढे कालांतराने झालेली घटना मी माझ्या पत्नीस सांगितली व तिची समजूत काढून तिला माझ्याबरोबर माऊंट मेरीस येवून तो नवस फेडण्याचे आम्ही ठरवले. व एक दिवस आम्ही जोडीने चर्चमध्ये जाऊन देवीस मेणाचे बाळ अर्पण करुन नवस फेडलाही.



# खेळ आंधळी कोशिंबीरीचा

बांद्रा पोलिस ठाण्यास डिटेक्शन ऑफिसर म्हणून दीड वर्षे मी काम पाहिले व पुष्कळ गंभीर गुन्हयाचा तपास करुन यश मिळविले.

त्याकाळी आमच्या विभागाचे पोलिस उपायुक्त श्री. भालचंद्रन होते. त्यांची नंतर बदली झाली आणि त्यांच्या शिफारसीनुसार ते कार्यरत असलेल्या विभागात माझी बांद्रा पोलिस ठाण्याहून ऑगस्ट १९७३ रोजी वरळी पोलिस ठाणे येथे नियुक्ती झाली. वरळी पोलिस ठाणे येथे पहिलीच ठाणे अंमलदार म्हणून (Station House)ड्यूटी करत असताना एक विचित्र घटना घडली. वरळी पोलिस ठाणे परिसरात १२१ बी. डी.डी. चाळी आहेत व त्या दिवशी एका चाळीच्या गच्चीवरुन एक ४-५ वर्षाचा लहान मुलगा खाली पडून मृत झाल्याची घटना घडली. त्या मुलाच्या आईने अशी तक्रार केली की, तिच्याच चाळीत राहणा-या शेजारच्या मुलाने तिच्या मुलास गच्चीवरुन मुद्दाम ढकलले असावे. कारण आदल्या दिवशी त्या मुलासोबत तिच्या मुलाचे भांडण झाले होते.

मुलावर केलेले आरोप गंभीर स्वरुपाचे होते. त्यानंतर घटनास्थळी भेट देऊन सर्व संबंधितांशी संपर्क साधला. सखोल चौकशी करुन घटनास्थळाची प्रत्यक्ष तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, मुळात गच्चीवर लहान मुले सहज जाऊ शकतील अशी सोयच नव्हती व गच्चीवरती कुणालाही जाण्यास मनाई होती. कारण गच्चीवर फक्त दोन फूट उंचीची संरक्षक भिंत(Perafet Wall) होती व फक्त बी.डी.डी. चाळींचा देखभाल करणारा कर्मचारीच वर जात असे. परंतु काही खोडकर मुले आईबाबांचा डोळा चुकवून गच्चीवर जाऊन खेळत असत. मृत्युमुखी पडलेला मुलगा व इतर काही मुले त्या दिवशी संध्याकाळी गच्चीवर आंधळ्या कोशिंबीरचा खेळ खेळत असताना वरील दुर्घटना घडली होती.

घटनेची सखोल चौकशी करुन घटनास्थळाचा पंचनामा व आराखडा वगैरेच्या कागदपत्रांची पूर्तता करुन झालेल्या घटनेची कायदेशीर नोंद घेतली. सदर प्रकरणाच्या तपासाची नोंद घेताना मी नोंद केली की, मृत मुलांच्या आईने केलेल्या तक्रारीत जरी तथ्य आढळले नाही, तरीसुध्दा तिने केलेली तक्रार खरी आहे, असे गृहित धरले असता सदरचा गुन्हा हा अल्पवयीन मुलाच्या हातून घडला असल्याने कायद्याच्या चौकटीत तो गुन्हा ठरत नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द कायदेशीर कृती करणे शक्य नाही. दुस-या दिवशी मी कौशल्याने केलेल्या तपासाची कागदपत्रे जेव्हा माझे तेव्हाचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक सुर्वे साहेब व ए.सी.पी. श्री. के.के. बलसारा ह्यांनी तपासली, तेव्हा सहा वर्षाच्या अनुभवाच्या अल्पशः काळात कौशल्याने केलेला तपास व कायद्याचे आत्मसात केलेले ज्ञान पाहून त्यांनी मला बोलावून माझे कौतुक तर केलेच आणि त्याच क्षणापासून माझी पोलिस ठाण्याचे डिटेक्शन ऑफिसर म्हणून नियुक्ती देखील केली. अजून एक मानाचा तुरा माझ्या टोपीत खोवला गेला.त्यानंतर मी आणखीन एका आव्हानाचा विडा उचलला.

**'One More Feather In My Cap'**



स्व. पोलिस कमिशनर ए.एस. सामरा यांच्यातर्फे सत्कार स्विकारताना

# खाकी वर्दीतील वेचक आठवणी

आव्हानाचा विडा उचलला तर खरा, परंतु तेव्हाचे डी.सी.पी. श्री. भालचंद्रन साहेब यांच्या शिफारशीनुसार माझी बांद्रे पोलिस ठाण्याहून वरळी पोलिस ठाणे येथे बदली झाली होती. त्यांचीच बदली स्पेशल ब्रांच, सी.आय.डी येथे झाली व त्यांच्या जागी श्री. व्ही. एन. देशमुख हे पोलिस उपायुक्त म्हणून आमच्या झोन मध्ये आले. त्यांना देखील माझ्या कामाची पध्दत व राबता पाहून ते मला वेळोवेळी प्रोत्साहन देत गेले व त्यामुळे माझ्या यशात भर पडत गेली व डिटेक्शनचे काम अति सुरळीतपणे चालू राहिले.

५ जानेवारी, १९७४ रोजी मडके बुवा मैदान येथे दलित पँथर यांनी मिटींग आयोजित केली होती. त्या मिटींगमध्ये राजा ढाले, नामदेव ढसाळ यांनी हिंदूंच्या देवदेवतेबद्दल अपशब्द वापरले आणि व्यासपीठावर दगड पडला व त्यानंतर हिंदू व दलित यांच्यामध्ये दंगल उसळली, ती तब्बल चार महिने ही दंगल चालू राहिली. १२१ बी.डी. डी. चाळीचा परिसर संध्याकाळी सूर्यास्तानंतर, मध्यरात्रीपर्यंत दंगलीमुळे तणावाखाली असे व तिच्यावर मात करता करता पोलिस जिकरीला येऊ लागले. त्यातच फेब्रुवारी महिन्यात कम्युनिस्ट पक्षाच्या श्रीमती रोझा देशपांडे यांनी गिरण्यांमध्ये संप पुकारला. त्यामुळे बिकट परिस्थिती आणखी बिघडली. वरळी पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये सुतगिरण्या होत्या व बी.डी.डी. चाळीत राहणारे बहुतांशी लोक गिरणी कामगार होते. त्याकाळात वरळी पोलिस ठाण्याशी संलग्न असलेल्या ब-याचशा पोलिस अधिका-याच्या त्या चार महिन्याच्या काळात बदल्या होत गेल्या. परंतु मी मात्र दंगलीच्या पहिल्या दिवसापासून ते संपूर्ण दंगल आटोक्यात येईपर्यंतच्या चार महिन्याच्या काळात वरळी पोलिस ठाण्यातच कार्यरत होतो. दंगलीच्या काळात नोंदविलेले बहुतांशी गुन्हयाचा तपास माझ्याकडे असल्यामुळे, तसेच दंगलीविषयी इत्यंभूत माहिती असल्याकारणाने पुढे सरकारने नेमलेल्या न्यायमूर्ती श्री. एस. बी. भस्मे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्यासमोर पोलिसांच्यावतीने नेमणूक झालेल्या इन्स्पेक्टर श्री. मजीगूड साहेब यांचा सहाय्यक म्हणून माझी निवड करण्यात आली. दंगलीच्या काळात मला जबरदस्त मार देखील लागला होता व पोलिसांवर झालेले पक्षपाताचे तसेच बळाचा गैरवापर केल्याचे आरोप वगैरे खोडून काढण्यासाठी पुष्कळ पराकाष्ठेचे काम करावे लागले. त्यात आम्हांस यश देखील प्राप्त झाले. आयोगाने आपल्या अहवालात पोलिसांना दोषमुक्त (cleanchit) केले.

चौकशीच्या काळात श्री. मजीगूड यांनी चौकशी चालू असताना बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे टिपण श्री. भस्मे साहेबांनी आपल्या अहवालात नमूद केले. त्यात त्यांनी असेही नमुद केले की, **''त्यांचे कर्तबगार सहाय्यक पोलिस फौजदार पेडणेकर हे त्यांच्याजवळ स्थानिक परिस्थितीची परिपूर्ण माहिती असल्याने व त्यांनी वेळेवर सहाय्य दिल्याने ते त्यांना जितके उपयुक्त ठरावे तितकेच आयोगालाही उपयुक्त ठरले.''** ही ओळ तर माझ्या आयुष्याची कोरलेली सोन्याची अक्षरे ठरली.

त्यानंतर १९७५ साली आणीबाणी चालू झाली आणि पोलिसांचे काम आणखी जिकरीचे होऊन बसले. दादा, दारुचे धंदे वगैरे यांना मिसाखाली (Misa) अटक करणे वगैरेचे अतिरिक्त काम पोलिसांना करावे लागले. डिटेक्शन ऑफिसर म्हणून पुष्कळ गंभीर स्वरुपाचे गुन्हे उघडकीस आणण्यास मला यश आले होते व त्यातील काही सत्यघटनेवर आधारीत गुन्हयांची नोंद याच पुस्तकात केली आहे.

मागील ३ वर्षे ८ महिन्यांचा काळ धकाधकीचा व तणावग्रस्त गेल्याने मला उसंत मिळावी म्हणून माझी वरीष्ठांच्या शिफारशीनुसार वाहतूक शाखा येथे बदली झाली.

# अनामिका




नुकताच मी वरळी पोलिस ठाण्याहून वाहतूक शाखेत बदली होऊन गेलो होतो. सर्वसाधारण रविवारी आम्हांस महालक्ष्मी रेसकोर्स येथे डयुटी असायची. रेस सुरु होण्यापूर्वी व संपल्यानंतर गाडयांची पार्किंग करुन घेणे व वाहतूक सुरळीत चालू ठेवणे हे काम असे. मधल्या वेळेत आम्ही देखील काही काम नसताना गंमत म्हणून घोडयांची शर्यत पहाण्यास जात असू.

'फस्ट इन्क्लोझर' मध्ये मी उभा असताना पांढरे शुभ्र कपडे परिधान केलेली व सफेद पांढरे चप्पल घातलेली एक व्यक्ती माझ्या जवळ घुटमळताना माझ्या नजरेस आली. चेहरा साधारण ओळखीचा व नंतर सदर व्यक्तीस मी मृत अनामिका हिचा पती असल्याचे ओळखले. तशी मला त्या व्यक्तीबद्दल एकदम घृणा वाटू लागली व मी मग त्याला टाळण्याचा प्रयत्न केला. तरी देखील सदर व्यक्तीने मला गाठले व म्हणाला 'साब मुझे पहचाना क्या? मैअनामिका का पती हूँ। साहब वह इन्कम टॅक्सवाले को बुलाके डराना की, अनामिका के मर्डर केस में मै तूमको अंदर डालूंगा, उससे बहुत माल निकलेगा, आपका भी भला और मेरा भी भला'. मी त्यास सांगितले की, 'मेहेरबानी करुन त्या केसबाबत माझ्याशी काही संभाषण करु नको.' इतके सांगून देखील तो नराधम मला म्हणाला, 'साहब वो अनामिका जब मर गई, तब उसके कान में सोने के फुल थे और वो पुलीस थाने में जमा है। वो मुझे मिल सकते है क्या ।' त्याला आपल्या पत्नीच्या मृत्युबद्दल जरा देखील दुःख नव्हते. त्याला दुःख होते ते तिच्या मिळकतीवर मजा करण्याचे तिच्या मृत्युमूळे बंद झाल्यामुळे. मी त्याला सांगितले, 'तू कॉरनर कोर्ट व वरळी पोलिस ठाणे येथे काय ती चौकशी कर, माझी तेथून बदली झाली आहे व माझा त्या केसशी काही संबंध नाही.'

अनामिका मुळची लखनौची निष्पाप, निरागस चेह-याची, कायम बुरख्यात असणारी मुलगी. तिचा पती देखील चांगल्या घरचा परंतु मुंबईत आल्यानंतर त्याला मुंबईची हवा लागली व तो एका उच्चभ्रू कुंटनखान्यावर मॅनेजर म्हणून काम करत होता व गावी आपल्या नातलगांना भासवीत असे की, मुंबईत

लखनौवी कुर्त्यांचा व्यापार करतो. त्याचे अनामिकेशी लग्न झाले व त्याने तिला मुंबईत आणले. तसेच तिला मुंबईत आणून सदरच्या कुंटनखान्यात ठेवून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले व तिच्या कमाईवर तो मौजमजा करत असे.

श्री. शहा एक प्रतिष्ठीत गृहस्थ इन्कमटॅक्स ऑफीसमधून रिटायर झाल्यानंतर कन्सलटंट म्हणून स्वतःचा व्यवसाय करीत. भरपूर पैसा उच्चभ्रु राहणीमान, पत्नी नुकतीच वारलेली. तसेच त्यांना मुलबाळ नसल्याने एकलकोंडे जिवन जगत असत. एकदा विरंगुळा म्हणून ते त्यांच्या मित्रासमवेत सदरच्या वरील नमुद कुंटनखान्यात गेले असता त्यांची अनामिकेशी ओळख झाली व नंतर त्याचे मैत्रीत रुपांतर झाले. शहा हे वयाने साठीतलेच. त्यामानाने अनामिका २६ ते २८ वयाची. शहा यांना अनामिकेबद्दल लैगिंक प्रेम नव्हते. तिच्याबद्दल त्यांना सहानुभूती होती व तिचा ते आदर करत. तिच्या नव-याने तिची केलेली दुर्दशा बघून त्यांना तिच्याबद्दल सहानुभूती वाटत असे व तिच्या नव-याबद्दल चिड उत्पन्न होत असे. अनामिका तशी अशिक्षित, अंगुठाछाप. शहांनी तिला तिच्या मर्जीनुसार त्या पेशातून बाहेर काढले. परंतू त्यास तिच्या नव-याचा विरोध होता. कारण त्याची पैशाची आवक बंद झाली होती.

शहांनी नंतर तिला अख्ख्या हिंदूस्थानाचे दर्शन घडविले. तसेच शिकवणी ठेवून साक्षर केले व तीला थोडे थोडे इंग्रजी सुध्दा बोलायला शिकविले.

तिला कायमची सोडचिठ्ठी देण्याच्या नावाखाली तिच्या नव-याने अनेकवेळा मोठया रकमा श्री. शहा यांचेकडून मिळविल्या होत्या. परंतु तो स्वतः दारु, वेश्या, जुगार या सर्व व्यसनात गुरफटला गेला असल्यामुळे त्याला कायम पैशाची चणचण भासत असे. श्री. शहा यांनी पुनम अपार्टमेंट येथे सातव्या मजल्यावर अनामिकेसाठी एक फ्लॅट बघितला होता व तिला आता कायमस्वरुपी तिच्या व्यवसायातून पूर्णतः मुक्त करुन एक प्रतिष्ठीत स्त्री म्हणून जगवण्याचा संकल्प त्यांनी बांधला होता.

नुकतेच ते बंगळूरहून अनामिकेसह मुंबईत दाखल झाले होते. तिच्या नव-याने तिला सोडचिठ्ठी देऊन देखील पुन्हा तो ब्लॅकमेल करु लागला व त्याने तिला श्री. शहा कडून रुपये ५०,०००/- घेऊन येण्याची मागणी केली. नाहीतर पुनःश्च तुला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडीन, अशी धमकी दिली. ती बिचारी द्विधा अवस्थेत पडली. एक परकी व्यक्ती कुठल्याही शारीरिक भोगाची प्रलोभना न बाळगता तिच्या आयुष्याचा उद्धार करावयास निघालेला, तर दुसरा तिच्याशी निकाह करुन धर्मगुरु समोर तिचा पत्नी म्हणून स्विकार करुन नंतर तिला वेश्या व्यवसायाच्या खाणीत ढकलणारा. श्री. शहाकडून वेळोवेळी पैसे मागुन नव-याला देऊन देऊन ती कंटाळली होती. नव-याने सोडचिठ्ठी देऊन देखील पुन्हा तो तिला सतवू लागला होता. शहाकडे आणखी पैसा मागण्याचे धाडस तिला झाले नाही व सरतेशेवटी तिने आपल्या जिवाचा अंत करण्याचे ठरविले. घटनेदिवशी ती आणि श्री. शहा पुनम चेंबरच्या सातव्या माळ्यावर आपल्या फ्लॅटमध्ये पोहोचले. ती वारंवार हॉलमध्ये खिडकीत येत असे व पुन्हा बेडरुममध्ये शहा जिथे बसले होते तिथे जात होती. जिवाचा अंत करण्याचे तिने ठरविले होते. पण तिला धाडस होत नव्हते. सरते शेवटी तिने आपल्या मनाचा ठिया केला. खिडकीखाली आपल्या उंच टाचेच्या चपला तिने काढून ठेवल्या व नंतर खिडकीवर चढून तिने स्वतःचे शरीर लोटून दिले. धाडदिशी आवाज झाला आणि आजूबाजूच्या बिल्डींगमधील लोक जमले. शहादेखील वरुन लिफ्टची वाट न पहाता धावत पळत खाली आले परंतू अनामिकेचे प्राणोत्क्रमण झाले होते.

तिच्या नव-याचे आयतेच फावले. आपली पत्नी मेल्याबद्दलचे जरासुध्दा सुतक त्याच्या चेह-यावर दिसत नव्हते. फक्त शहा यांना सदरच्या घटनेत गुंतवून त्यांच्याकडून काही पैसा उकळता येईल का? एवढाच त्याच्या मनात विचार.

सदरची घटना ही आत्महत्या होती हे सिध्द करण्यासाठी पोलिसांना पराकाष्ठा करावी लागली. तिच्याच वजनाची एक प्रतिकृती तयार करुन जर तिने आत्महत्या केली तर कुठल्या परिस्थितीत खाली सापडेल व तिला फेकून दिले तर कुठल्या परिस्थितीत सापडेल ईथपर्यंत पोलिसांना Re Construction of Incidence करुन ती आत्महत्या होती, हे सिध्द करता आले.

# नराधम

## (माणूसकीला कलंक लावणारी सत्यकथा)



बाळ तुझे नाव काय?

तु कुठल्या शाळेत, कोणत्या वर्गात शिकतोस? तुझे घरी कोण कोण आहेत?

मी, माझी आई, बाबा आणि बाई (सहा महिन्यांची लहान बहिण)

सहा वर्षाचा चिमुरडा पोरगा न्यायाधीशांसमोर साक्षीदारांच्या कठडयात खुर्चीवर उभा राहून साक्ष देत होता. एवढंस एक चिमुरड पोर गरीब घरचं, बैठया चाळीच्या घरात राहणार, परंतू चुणचुणीत उत्तर देत होतं. साक्षीदार हा लहान मुलगा असल्याने त्याची जबानी देखील मी प्रश्नोत्तरात घेतली होती व न्यायालयात देखील तशीच साक्ष काढण्यात आली होती.

बाळ त्यादिवशी काय घडले सांग पाहू? त्या दिवशी धुळवडीचा दिवस होता. बाप सकाळीच कामाला गेला होता व दुपारच्याला आई घरकामाला निघून गेली व मी खोलीत खेळत होतो व बाई पाळण्यात झोपली होती. थोडया वेळाने मामा घरी आला (शेजारी राहणार इसम) व त्याने बाईला उचलून घेतले व आपल्या घरी गेला. मी खोलीत एकटात खेळत होतो. एवढयात बाई किंचाळून रडल्याचा आवाज आला म्हणून मी मामाच्या खोलीवर गेलो तर दार आतून बंद होते व बाईचा रडण्याचा आवाज येत होता.

मी दार ठोठावले पण मामाने दार उघडले नाही म्हणून मी लाथ मारुन दरवाजा उघडला तर मामा खोलीत उभा होता. बाई गोधडीवर उताणी रडत पडली होती व तीच्या गुप्तांगातून रक्त येत होते. मी आरडाओरड केली व आजूबाजूचे लोकांना गोळा केले. कोणीतरी आईला देखील बोलावून घेतले. तेवढयात मामाने चाळीमागे जाऊन आंघोळ केली व पॅन्ट धुतली व वाळत टाकली. मग पोलिस आले व बाईला व आईला घेऊन हॉस्पिटलमध्ये गेले.

वरील घटनेची नुसती आठवण झाली तरी अंगावर काटा येतो व त्या नराधमावर व मनुष्यजातीवर एक तिटकारा असा वाटू लागतो.

तो धुलीवंदनाचा दिवस होता. लोक रंग उडवण्याचा खेळ खेळून पहुडले होते. जागोजागी पोलिस बंदोबस्त होता. दुपारची वेळ होती व मामा आपल्या खोलीत एकटाच दारु सेवन करुन पडला होता. आदल्याच दिवशी त्याने आपली बायका पोरं गावी पाठवून दिली होती व दुपारची वर्दळ नसलेली पहाताच मामाच्या डोक्यात भूत संचारले व त्याने शेजारील सहा महिन्यांची कोवळी पोरं पाळण्यातून काढून आपल्या घरी घेऊन आला व त्याने नको ते कृत्य केले.

मामाला नंतर अटक करण्यात आली व परिस्थितीजन्य पुरावा तसेच सहा वर्षाच्या पोराच्या जबानीवरुन व इतरांचे जाबजबाबा वरुन मामा विरुध्दचा पुरावा सिध्द झाला व सत्र न्यायालयाने मामास चार वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा ठोठावली.

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

वाहतूक शाखेत १८ महिने काम केल्यानंतर खास शिफारसीनुसार माझी बदली क्राईम ब्रांच येथे झाली. या शाखेत आर्थिक गुन्हयांचा तपास व सफेदपोष गुन्हेगार (White Collars Criminals) यांच्याशी सामना करावा लागतो. त्या काळात बोगस एम.पी. रणवीर जैन ज्याने एअर इंडिया, इंडियन नेव्ही आणि इतर एजन्सींच्या अधिका-यांना एम.पी. असल्याचे भासवून सवलती लाटल्या होत्या. मला येथे खास नमुद करावेसे वाटते की, ज्या दिवशी मी वाहतूक शाखेतून बदली झाल्यानंतर क्राईम ब्रांच मध्ये हजर होऊन रिपोर्ट केला तेव्हा मला माझ्या वरीष्ठांनी विचारले की, तुम्ही कधी विमानात बसला आहात का? अर्थातच त्यापूर्वी मला योग आला नसल्याचे कळल्यावर मला सांगितले की, 'उद्या सब इन्स्पेक्टर, देशमुख हे चौकशीसाठी विमानाने दिल्ली येथे जाणार आहेत त्यांच्या बरोबर जाऊन विमानाच्या प्रवासाचा अनुभव व लाभ घ्या.'

त्याकाळात इन्स्पेक्टर श्री. भास्करराव चौधरी, श्री. गुणवंत देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक आर्थिक गुन्हयाचा तपास मी यशस्वीरित्या केला. त्यात जम्मू काश्मिर बँकेला १३ लाखाला डूबवण्याआधी तेव्हाची नटी रुपमाला व बँकेचा मॅनेजर के.के. धर व इतर प्रख्यात ठग सनतकुमार सेन यांना मी अटक केली होती व त्या केसचा खूप गवगवा झाला होता व ती केस 'कुंपणाने शेत खाल्ले ' या मथळ्या खाली सत्यकथेच्या रुपाने 'दक्षता' साप्ताहिकाने छापली. ती आपल्या वाचनाकरीता या पुस्तकात छापली आहे.


नंतर मला १९८१ च्या नवव्या महिन्यात इन्स्पेक्टर म्हणून प्रमोशन देऊन त्याच ब्रॅचमध्ये काम करावे, असा निर्णय वरीष्ठांनी घेतला.



ना. म. जोशी मार्ग पोलिस ठाणे येथे वरिष्ठ अधिकारी श्री. वसंत चोरगे यांच्या समवेत

# शाळेतला चोर

## या गुन्हयाव्यतिरिक्त अनेक गुन्हयाचा तपास करुन त्यातील मिलमध्ये झालेल्या खुनाचे देखील आरोपी आम्ही शोधून काढले.




सप्टेंबर १९८४ साली एन.एम. जोशी मार्ग पोलिस ठाणे येथे पोलिस इन्स्पेक्टर (गुन्हे) म्हणून बदली झाली. तेव्हा त्याकाळात द.शं. सोमण हे मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर असताना पुढे मुंबई पोलिस कमिशनर म्हणून नुकतेच बदलून आले होते.

तो काळ महानगरपालिका शाळांच्या सुट्टयांचा होता व अगदी बोरीवलीपासून मध्य मुंबईपर्यंत १९ महानगरपालिका शाळांमध्ये शाळांचे दरवाजे फोडून चो-या झाल्याचे गुन्हे दाखल झाले होते व सदरचे गुन्हे सतत होत राहिल्याने सोमण साहेबांकडे महानगर- पालिकेच्या अधिका-यांनी गंभीर स्वरुपाची तक्रार केली होती व पोलिस नोटीसमध्ये असे फर्मान काढण्यात आले होते की, यापुढे एकजरी महानगरपालिका शाळेचा, घरफोडीचा गुन्हा दाखल झाला तर त्याविषयी संबंधितांविरुध्द गंभीर दखल घेण्यात येईल. तेव्हाचे माझे वरीष्ठ पोलीस निरिक्षक श्री. चोरगेसाहेबांनी नोटीस वाचल्यानंतर मला केबिनमध्ये बोलावून सदर नोटीसविषयी सांगितले. कारण एन.एम. जोशी पोलिस ठाण्याजवळ अगदी हाकेच्या अंतरावरच एक महानगरपालिकेची शाळा होती.

सर्वसाधारणपणे महानगरपालिका शाळेच्या आवारातच शाळेच्या रक्षकाला रहाण्यास जागा दिलेली असते. त्याचे वास्तव्य त्या आवारातच असणे अपेक्षित असते. निदान या रक्षकाला गाठून अशा प्रकारच्या शाळांमध्ये होत असलेल्या चो-यांबद्दल कल्पना देऊन जागृत राहण्यास व त्याची ओळख करुन घेण्याच्या उद्देशाने मी माझे सहकारी बरोबर घेऊन या शाळेला भेट देण्यासाठी गेलो. शाळेच्या आवारातून मुख्य दरवाजाच्या दिशेने नीटनेटके कपडे घातलेला एक तरुण इसम बाहेर येताना दिसला. शाळेला सुट्टी असल्याने शाळा बंद असताना सदरचा इसम कोण असावा या कुतूहलाने आम्ही त्याला हटकले. तो थोडासा घाबरला म्हणून त्याची झडती घेतली. त्याच्या खिशात चाव्यांचा जुडगा, हेक्सॉ ब्लेड, स्क्रू ड्राईव्हर हे सामान सापडले म्हणून त्यास चौकशीसाठी पोलिस ठाण्यात घेऊन गेलो. त्याने काही क्षणातच, १९ शाळांमध्ये कुलूपे फोडून चोरी केल्याचे कबुल केले. आम्हां सर्वांना जणू देवच पावल्याचा आनंद झाला.

चौकशीअंती असे समजले की, सदरचा गुन्हेगार हा एस.एस.सी. पास झालेला होता व धारावी बस डेपोच्या बाहेर त्याची पान-बिडीची टपरी होती. सर्व काही सुरळीत चालले असताना त्याला जुगाराचा नाद

लागला. त्यात झालेले कर्ज फेडण्यासाठी त्याने हे पाऊल उचलले होते. त्याची चोरी करण्याची कार्यपध्दती वेगळीच होती. तो तीन वेळा चोरी करण्याच्या ठिकाणी भेट देत असे व हे काम तो एकटयाने करत असे. पहिल्या दिवशी तो शाळेची टेहाळणी करुन शाळेचा रक्षक जागरुक नसल्याचे पाहून मागून शाळेत प्रवेश करत असे.बंद वर्गाची कुलूपे हेक्सॉ ब्लेडने कापून त्या जागी तशीच दिसणारी दुसरी कुलूपे लावत असे.

शाळेचा रक्षक सर्वसाधारणपणे रोज चक्कर मारुन टाळे चेक करण्याचे काम करत असत. दुस-या दिवशी शाळेत जाऊन कुलूप उघडून स्वतः जवळील चावीने वर्गात प्रवेश करुन सीलिंग फॅन स्क्रू ड्राईव्हरने काढून ते सारे सामान गोळा करुन वर्गाच्या दरवाज्याजवळ ठेवून दरवाज्याला कुलूपे ठोकून तो निघून जात असे. आणि त्याचा तिस-या भेटीच्या वेळेस अगदी दिवसा ढवळ्या शाळेच्या दरवाज्याजवळ टॅक्सी लावून तो ते सामान टॅक्सीत घालून नेत असे. त्याचा नीटनेटका पोषाख व वागण्याच्या रितीने टॅक्सी चालकास व इतर कोणास काही संशय येत नसे, जणू काही तो कोणी शाळेचा नोकर समजून सामान दुरुस्तीस नेण्याचा आव आणत असे.

चोरलेले सर्व सामान त्याने चोरीच्या मालाच्या व्यापा-यांना न विकता त्याच्या धारावीतल्या पान बिडीच्या टपरीजवळच्या झोपडट्टीतल्या लोकांना ते विकले होते. त्यांच्याकडे एकूण १०४ छताचे पंखे (सिलींग फॅन्स्) शाळेच्या प्रयोगशाळेत लागणारे सामान व शाळेच्या घंटा अशा एकूण मुंबईच्या २० शाळेतून चोरीस गेलेला माल मिळविण्यात आम्ही यशस्वी ठरलो व पोलिस आयुक्त सोमण साहेबांची मान महानगरपालिकेत अभिमानाने उंचावली.



गुन्हयातील आरोपी व चोरीच्या जप्त मालासह

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

जानेवारी १९८७ मध्ये माझी विमानतळ सुरक्षा विभागासारख्या(Air Port Security) अतिसंवेदनशील ठिकाणी बदली झाली. करोडो रुपयांची विमाने व ती हाताळणारे तितकेच महत्त्वाचे वैमानिक व त्याचा इतर कर्मचारी वर्ग यांची सुरक्षितता व त्या विमानातून प्रवास करणारे अतिमहत्त्वाच्या व्यक्ती व इतर प्रवासी यांना आतंकवाद्यांच्या फोफाटयात सांभाळणे म्हणजे जिकरीचे काम असते. एकदा टर्मिनल बिल्डिंगच्या आवारात प्रवेश केला की, बाहेरच्या जगाशी संबंध तुटतो व आपण काही नव्या विश्वातच प्रवेश करतो. येथे बाहेर उन्हाळा आहे की, पावसाळा आहे याचे देखील भान नसते. अगदी जग वाहून गेले तरी बाहेर काय चालू आहे याचे भान देखील राहत नाही. आतील वातावरण सुखकारक असले तरी अगदी बारीक-सारीक गोष्टींवर लक्ष देऊन सर्तक रहावे लागते व बारा तास डयूटीचा काळ कधी संपतो तो देखील समजून येत नाही.

असा ९ महिन्यांचा काळ लोटला आणि माझी सहार विमानतळ पोलिस ठाणे येथे बदली झाली. हे पोलिस ठाणे देखील विमानतळाशी संलग्न असल्यामुळे संवेदनशील पोलिस ठाणे अशी त्याची ख्याती होती आणि म्हणून ते ओळखले जाते. परदेशी नागरीक व त्यांच्या तक्रारी अतिकौशल्याने हाताळाव्या लागतात. तशात या अवधीत टॅक्सीवाले लहान-सहान कारणांवरुन, विमानाने प्रवास करुन थकून येणा-या प्रवाशांना वेठीस धरुन संपावर जात असत. अशा टॅक्सी ड्रायव्हरना एकदा आम्ही अशाच प्रकारच्या संपावर अगदी कायदेशीर कठोर कारवाई करुन काही मिनिटांच्या अवधीतच जेरीस आणले होते. ब-याच जणांची धरपकड करुन मूसक्या बांधून त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. त्यानंतर आजतागायत विमानतळावर टॅक्सीवाल्यांनी संप पुकारल्याचे ऐकिवात नाही.

हळूहळू विमानतळ सुरक्षा दलात माझी अधिकाधिक आव्हानात्मक कामासाठी निवड होऊ लागली.



पोलिस जीवनात मिळालेली विजय चिन्हे, पदके व पुरस्कार

# पोखरला डोंगर निघाला उंदीर

**जानेवारी १९९० साली माझी खार पोलिस ठाणे येथे बदली झाली. मी खार पोलिस ठाणे येथे देखील अनेक गंभीर गुन्हयाचा तपास केला. त्यातील मी तपास केलेल्या एका गुन्हयाची सत्यकथा 'लोकप्रभा' या पुस्तकात 'पोस्टर' या सदराखाली छापली आहे ती आपल्या वाचनासाठी याच पुस्तकात नमुद केली आहे.**




सदर पोलिस ठाण्यात कार्यरत असताना सांताक्रुझ पोलिस विमानतळ ठाण्याच्या हद्दीतील (Domestic Airport) 'महेंन्द्र वर्मन' एअर इंडियाचे जंबो जेट विमान, तेव्हांचे पंतप्रधान श्री. राजीव गांधी हयांना घेऊन चीन येथे जाणार होते म्हणून त्या संपूर्ण विमानात अंतर्गत सुरक्षिततेच्या कठडेत उभे असताना काही विद्युततारा कापल्याचे निदर्शनास आल्याने तो घातपाताचा प्रकार आहे की काय? याची चौकशी करण्याचा निर्णय वरीष्ठांनी घेतला. ते विमान सहार पोलिस ठाण्याच्या हद्दीत नसताना देखील तेव्हांचे अतिरिक्त पोलिस आयुक्त श्री. शंगारी साहेब यांनी माझी निवड करुन तपास करण्याचे आदेश दिले. मला जेव्हा जागेवर बोलविण्यात आले तेव्हा तेथे माननीय पोलिस आयुक्त श्री. सराफ साहेब, श्री. शंगारी साहेब व इतर वरीष्ठ अधिकारी, तसेच एअर

इंडियाचे टेक्निकल आणि नॉन-टेक्निकल अधिकारी उपस्थित होते. मला वस्तुस्थिती समजावून सांगून तो घातपाताचा प्रकार आहे का? ते चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे सांगून आमचे वरीष्ठ अधिकारी निघून गेले

मला तर बर्फाच्या पाण्याची आंघोळ घातल्यासारखे वाटले. विमान, वैमानिक व विमानातील हवाई सुंदरी यांच्या व्यतिरिक्त सर्वसाधारण माणसाला काय माहिति असू शकते? आणि मी देखील त्यातील एक होतो. त्यानंतर दोन पंचांना बोलावून वस्तूस्थितीचा पंचनामा करण्यासाठी गांगरलेल्या स्थितीत टेप घेऊन जेव्हा मी मोजमाप सुरु केले तेव्हा तेथे उपस्थितीत असलेल्या एअर इंडियाच्या एका सिनियर एअर क्राफ्ट इंजिनियरच्या लक्षात आले की, मी साफ गांगरुन गेलो आहे. मग त्यांने स्वतःहून माझ्याशी संपर्क साधून मला धीर दिला व सांगितले की, 'टेपने मोजमाप करण्याची काहीही जरुरी नाही. जंबो जेट हे विमान भले कुठल्याही कंपनीचे असो त्याची अंतर्गत रचना हि सारखीच असते. तेव्हा पंचनामा करताना विमानाच्या मागच्या, मध्य, पुढच्या दरवाज्यापासून सापडलेला दोष किती अंतरावर आहे व कितव्या सीटच्या बाजूस आहे, असे जरी पंचनाम्यात नमूद केले तरी तो दोष आढळलेली जागा बरोबर ठरविता येते.

त्यानंतर त्याने मला बरेच सहाय्य केले मी त्याच्या मदतीने तो पंचनामा पध्दतशीररित्या (Technically) पूर्ण केला. नंतर त्याने मला त्याच्या ऑफिसमध्ये नेले व जंबो जेटचे ब्लू-प्रिंटच्या प्रती व त्या विमानाची माहिति असलेली पुस्तके (literature) प्राप्त करुन दिली. पुढे हवे ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मला तर देवदूत भेटल्यासारखे वाटले. वरकरणी जेथे जेथे विद्युततारा कापल्याचे निदर्शनास आले तो कापलेला भाग शार्प कटर ने कापलेला नसून कुरतडलेला असावा असे दिसून आले व ते बहुदा उंदराचे काम असल्याचे दिसून आले.

विमान उभे केल्यानंतर त्यात सापडलेला दोष, त्या काळामध्ये जितक्या जणांनी कामानिमित्त विमानात प्रवेश केला त्या सर्वांचे जाब-जबाब घेण्यात आले, परंतु संशयास्पद असे कुणाचे वागणे आढळून आले नाही. नंतर एअर इंडियाच्या अधिका-यांच्या सहाय्याने विमानाचे आतून (Fumigation) केले असता आत सापळा म्हणून लावलेल्या एका पिंज-यात एक उंदीर सापडला. त्यानंतर हाफकिन इन्स्टीटयूट व व्हेटनरी हॉस्पिटलमधील तज्ज्ञांशी सल्लामसलत करुन त्या पिंज-यामध्ये त्याच त-हेच्या तारा कापून टाकल्या व तो प्रयोग यशस्वी झाला. कारण उंदराने चावलेल्या तारा व विमानात दोषी आढळलेल्या यांचा फॉरेन्सीक चाचणीमध्ये साम्य आढळल्याने सदरचा दोष हा घातपाताचा प्रकार नसून उंदराच्या उपद्रवामुळे झाला, या निर्णयाकडे जाणे सोपे झाले. सदरच्या काळामध्ये उंदराला काही खावयास दिले नसल्याने तो नंतर मृत झाला. पोस्ट मॉर्टम केल्यावर त्याच्या पोटात सदर तारेचे अंश देखील सापडले. हे सारे करताना उंदराचा कोष, व्हेटनरी दवाखान्यातून पुस्तके प्राप्त करुन घेऊन विमानाचा जसा अभ्यास करावा लागला तसा उंदराबद्दल देखील अभ्यास करावा लागला. त्यातून माझ्या ज्ञानात भर पडली की, उंदराचे वरचे व खालचे सुळे यांची वाढ इतकी जोरात असते की, जर त्याने २४ तास सुळ्यांनी कुरतडण्याचे काम केले नाही तर जेव्हा तो आपले तोंड मिटेल. तेव्हा त्याचे खालचे सुळे वरुन व वरचे सुळे खालून तोंडातून आरपार जाऊन मृत्युमुखी पडतो. त्या भितीपोटी उंदीर हा सतत सदरचे दात वाढू नये म्हणून काही ना काही कुरतडण्याचे काम करत असतो. सारी चौकशी करत असताना त्या उंदराचे जिवंतपणी आणि मृत झाल्यावर इतके फोटो दयावे लागले होते की, माझ्या लग्नात देखील माझे इतके फोटो काढले गेले नसतील. ही सारी चौकशी पूर्ण करण्यास जवळ जवळ दोन महिन्यांचा काळ लागला.मी नंतर माझा चौकशी अहवाल वरीष्ठांस सादर केला. 'डोंगर पोखरुन उंदीर काढला' हि हसू येण्याची म्हण जरी असली तरी ते काम किती जिकरीचे असते ज्याचे त्यालाच माहित असते. 'डोंगर पोखरुन' जरी उंदीर निघाला तरी उंदराच्या कर्तबगारीमुळे शोधाची पाळेमुळे कशी खणून काढावी लागतात आणि अतिमहत्वाच्या व्यक्तींबाबत हे काम किती जिकिरीचे असते आणि काटेकोरपणे करावे लागते, हे ज्याचे त्यालाच माहीत असते. हा अनुभव मला आयुष्यात बरंच काही शिकवून गेला. एक तर प्रसंगावधान ठेऊन असे चौकशी अहवाल तज्ज्ञांच्या मदतीने करावे लागतात. दुसरे असे की आपलें सर्व बाबतीतील ज्ञान अद्ययावत् ठेवणे अशा वेळी आवश्यक ठरते. विमानाची रचना, उंदराच्या हालचालींची आणि गुणवैशिष्टयांची माहिती मिळवून मी जे सव्यापसव्य केले त्याचा मला माझ्या व्यावसायिक जीवनात चांगलाच उपयोग झाला.

अशा घातपात केसेस व्यतिरिक्त अनेक गंभीर गुन्ह्याचा तपास सहार पोलिस ठाणे येथे केला. त्यात यू. पी. च्या वकिल व समाजसेवक यांस अटक करुन ७४ व्यक्तींना बनावट बंदुकीचे परवाने दिल्याचे उघडकीस आणून ७४ परदेशी बनावटीची छोटी शस्त्रे हस्तगत केली.



# समज

खार पोलिस ठाण्याहून बदली झाल्यानंतर ४-५ वर्षाचा काळ लोटल्यानंतर एकदा मी काही कामानिमित्त लिकिंग रोड, बांद्रा येथे नॅशनल कॉलेजजवळ असलेल्या ए-वन ग्रिल हॉटेल जवळ कुणाचीतरी वाट पाहत उभा असता एक २४-२५ वर्षाचा तरुण नीटनेटके कपडे घातलेला मुलगा माझ्याजवळ आला व मला म्हणाला, 'साहब, मुझे पहचाना क्या? मी देखील त्याच्याकडे बघून भुवया वर करुन आठवू लागलो. तेव्हा तो म्हणाला, 'साहब, मै वो रब्बर का साप जूते बजार में लडकियोंको दिखाकर डराता था, और छेडखानी करता था। तब आपने मेरी अच्छी मरम्मत की थी और सुधारकर मुझे अच्छा इन्सान बनाया। साहब, अब मेरी चप्पल की ६ छबडीया है। और मेरे पास अब स्कूटर भी है। और इन दिनों में मैं छोटी कार भी लेने वाला हूँ।' आणि मग मला सारे आठवले.




हा उनाड मुसलमान मुलगा त्याचा थोरल्या भावाच्या चपलाच्या छबडीजवळ वेळ घालवत असे व जाणा-या येणा-या मुलींच्या अंगावर रबरी साप टाकून त्यांना घाबरवत असे. त्याच्याबद्दल तक्रारी आल्यानंतर एक दिवस त्याला चौकीत आणून पोलिसांचा खाक्या दाखविला होता. तेव्हा त्याचा सख्खा मोठा भाऊ देखील मला भेटला व त्याच्या उनाड वागण्याबद्दल त्यास कायम धडा शिकविण्यास मला सांगितले. नंतर पोलिसांचा डोस पाजल्यानंतर मी त्याला एकटयाला माझ्या ऑफिसमध्ये नेऊन सांगितले की, 'तू चांगला घरचा मुलगा देखणा व धट्टाकट्टा आहेस, तुझा भाऊ देखील धंदा करुन चांगली कमाई करतो. पण तू असा वाह्यातपणे का वागतोस? तेव्हा तो म्हणाला, 'साहब, मैं भी छबडी लगाके चप्पल बेचता था, लेकिन मेरे पास लायसेन्स नही है। और पुलिसवाले मुझे धंदा नही करने देते और तंग करते है। मग मी त्यांच्याकडून व्यवस्थित सरळ वागण्याचे आश्वासन घेतले. संबंधित हवालदाराला व शिपायाला बोलावून त्या मुलाला धंदा करण्यास परवाना देण्याचे, सुधारण्याची संधी देण्यास सांगितले होते हे सारे आठवले. तो वाह्यात मुलगा छोटा का होईना, चपलांचा व्यापारी बनून सूखसमाधानाने जीवन जगत होता.



# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

माझे वरीष्ठ पो. नि. श्री. गौरंग मेहता हे किरकोळ रजेवर होते व पोलिस ठाण्याचा चार्ज माझ्याकडे होता. श्री. सामा-गौड हे तेव्हाचे सहाय्यक पोलिस आयुक्त, रोजच्या पोलिस ठाण्याच्या भेटीप्रमाणे आले तेव्हा मला म्हणाले की, पोलिस मेडलसाठी तुमच्या पोलिस ठाण्याहून जर कोणी अधिकारी वा शिपाई या चौकटीत बसत असतील तर इन्चार्ज हवालदार यांच्याकडून त्यांची माहिती गोळा करुन त्याची नावे त्यांच्या कार्यालयात पाठवा. (चौकटी म्हणजे नोकरीचा काळ, चांगल्या नोंदी, बक्षिसे वगैरे वरीष्ठ अधिका-यांचे वर्षाचे रिमार्क इत्यादी). तेव्हा मी श्री. सा. मा. गौड यांना सांगितले, 'साहेब, इन्चार्ज हवालदारांना विचारुन कुणी आहे का पाहतो. परंतु मी मात्र या चौकटीत पोलिस मेडलसाठी बसतो.' तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तुझा बायोडेटा व इतर सर्व माहिती घेऊन माझ्या कार्यालयात येऊन मला भेट. मी तुझ्या शिफारसीची रुपरेषा (Frame Work) करुन देतो. नंतर त्यांनी मला खरोखरच सहकार्य केले व रुपरेषा (Frame Work) नंतर वरीष्ठांस सादर केले व मुंबई पोलिस आयुक्तांनी राष्ट्रपती पोलिस पदकासाठी माझी शिफारस ही केली.



"ARM OF THE LAW"

THE SUNDAY TIMES - JUNE 6, 1993

नंतर माझी ८ जुलै, १९९१ मध्ये दादर पोलिस ठाणे येथे बदली झाली व १५ ऑगस्ट, १९९१ साली मला राष्ट्रपतीचे पोलिस मेडल मिळाल्याचे जाहीर देखील झाले. राष्ट्रपती पदकाने सन्मानित झालो आणि त्या दिवशी मी मनोमन माझी जडण-घडण करणा-या माता-पित्यांचे, वरीष्ठांचे आणि देवाचे आभार मानले.

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

दादर पोलिस ठाणे एकेकाळी सैतान चौकी पोलिस ठाणे म्हणून ओळखले जाई. ते अक्षरशः सैतानासारख्या गुन्हेगारांचे माहेरघर होते. इथल्या टोळीयुध्दाला काबूत आणणे आणि गुन्हेगारीला आळा बसविणे हे आव्हानात्मक काम आम्ही हाती घेतले होते. माझ्यासाठी ते गुढ अजून कायम आहे. मन्या सुर्वे, अमर नाईक हे त्याच पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये येणारे होते. त्याशिवाय आताच्या काळात शिवाजी पार्क मैदान, सिध्दीविनायक मंदिर, कॉंग्रेसचे टिळक भवन वगैरे ठिकाणी अतिमहत्वाच्या व्यक्तींची वर्दळ असल्याने ती संवेदनाशील ठिकाणे म्हणून ओळखली जातात. अर्थातच त्या सर्वांची जबाबदारी दादर पोलिस ठाण्यावर येते.

त्याखेरीज त्या काळात दादर पोलिस ठाण्यामध्ये दादा, गुंडे वावरत असत आणि अशा त्या सहा महिन्यांच्या कालावधीत NSA खाली पाच जणांच्या मुसक्या बांधल्या व दोघांना मुंबई पोलिस कायदा ५६ खाली तडीपार केले.



लूटमारविरोधी खास पोलीस पथकाबरोबर प्रभादेवी येथे झालेल्या चकमकीत कुविख्यात गुंड प्रकाश मिसाळ उर्फ शेंडी हा जागीच ठार झाला.
शेंडी ने वापरलेल्या फियाट गाडीची पाहणी करताना पेडणेकर साहेब.

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

जानेवारी १९९२ मध्ये पुन्हा माझी बदली जनरल ब्रांच, क्राईम ब्रांच, सी.आय.डी. येथे वरीष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून झाली व तेथे मी एक वर्ष कार्यरत होतो. तेथील कार्यपध्दती मी तेथे पूर्वी आठ वर्ष कार्यरत असल्याने परिचित होती. अल्पकाळातच मी माझी पकड घट्ट केली. मद्रासच्या एका व्यापा-याला एक करोड पंचवीस लाख रुपयांना ठगविणा-या प्रताप कुमार या आरोपीस जेरबंद केले तो स्वतःला बिकाणेरच्या उच्च घराण्यातील (Royal Family)सदस्य म्हणून मिरवीत असे. त्याच्याकडून वरील काही मालमत्ता परत मिळविण्यासाठी पुष्कळ युक्त्या व काबाड कष्ट करावे लागले. त्यासाठी पुणे, बँगलोर वगैरे ठिकाणी भ्रमंती करावी लागली. तपासात एका प्रख्यात बँकेत मॅनेजर म्हणून काम करत असणा-या त्याच्या पत्नीचादेखील सहभाग आढळला म्हणून तिला देखील अटक करणे भाग पडले.

या शाखेत कार्यरत असताना महाराष्ट्र दिन १ मे, १९९२ रोजी शिवाजी पार्क येथील भव्य सोहळयात मला राष्ट्रपतीचे पोलिस पदक बहाल करण्यात आले होते. माझे पूज्य आई-वडिल, पत्नी, दोन मुली व इतर नातेवाईक व मित्रपरिवारांच्या साक्षीने तो सोहळा पार पडला व पोलिस खात्यात पदार्पण करुन आयुष्याचे सार्थक झाल्याचे समाधान मला मिळाले. समाधानाबरोबरच माझ्या मनातील जबाबदारीची जाणीवदेखील अधिकच प्रखर झाली.

त्याचबरोबर पोलिस महासंचालकांचे मानचिन्ह बहाल करुन मला सन्मानित करण्यात आले. मला माझ्या आयुष्यात आणि पेशात घडवणा-या सर्वांपुढे नतमस्तक व्हावेसे तर वाटलेच, पण या पेशाने मला वेगवेगळे अनुभवही दिले. माणुसकी टिकवायची भिस्त दिली, जीवनाची शिस्त दिली. त्यामुळे पोलिसी अभिमानाने माझी मान ताठ झाली हेही कबूल केले पाहिजे.



राष्ट्रपती पोलिस पदक स्विकारताना

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी



जनरल ब्रँच सी.आय.डी. येथून माझी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिस ठाणे येथे ७ डिसेंबर १९९२ रोजी बदली झाली. तो दिवस मी माझ्या आयुष्याचा अतिमहत्वाचा दिवस समजतो व तो मी कधीच विसरु शकणार नाही.

जेव्हा पोलिस ठाणे प्रमुख (In-charge) म्हणून पहिल्यांदा बदली होते तेव्हा चार्ज (charge) घेतल्यानंतर सर्व वरीष्ठांना भेटून अगदी पोलिस आयुक्तांपर्यंत (Call on) त्यांच्या शुभेच्छा घ्यावयाच्या असतात, असा पोलिस खात्याचा रिवाज आहे. मी सकाळी प्रथम सेरीमेनीयलड्रेस परिधान करुन मेडल वगैरे लावून चार्ज (charge) घेण्यासाठी पोलिस ठाण्यास जाण्यास निघालो.



६ डिसेंबर रोजी बाबरी मशिद पाडली गेली होती व मुंबईमध्ये ७ तारखेच्या सकाळीच काही संवेदनशील भागात दंगली घडण्यास सुरुवात झाली होती. मी गणवेषात माझ्या स्कुटरवरुन मेनरोडने भायखळा ब्रिजवरुन पुढे आलो असता ब-याच लोकांनी मला सांगितले की, ‘पुढे जाऊ नका, भेंडी बाजारामध्ये दंगल सुरु झाली आहे.



मी गणवेषात होतो व मला कसली आली आहे दंगलीची भिती ? या तो-यात मी पुढे गेलो असता, रस्ता तर सामसूम होताच, पण वाहतूक शाखेचा एक शिपाई समोरुन धावत येताना दिसला व त्याने मला अडविले व सांगितले की, 'पुढे जोरात दंगल सुरु झाली आहे व दंगलखोरांनी त्याची पाठ काढली असल्यामुळे तो कसाबसा जीव वाचवून त्यांच्या तावडीतून निसटला आहे.'

मी माझी गाडी मागे पळविली व माझगांव एस (S) ब्रिजवरुन पी.डिमेलो रोडवरुन कर्नाक ब्रिज क्रॉस करुन मुसाफिरखाना येथे पोहोचलो. पहातो तो तर काय ? सहाय्यक पोलिस आयुक्त (ए.सी.पी.) स्वतः तेथे हजर होते व इतर अधिकारी/कर्मचारी अगदी चोख बंदोबस्तामध्ये दिसले.

मी ए.सी.पी. साहेबांना रिपोर्ट करुन ताबडतोब पोलिस ठाण्यात जाऊन पोलिस स्टेशनचा चार्ज घेतला व बंदोबस्ताचा गणवेष परिधान करुन मुसाफिरखानाजवळ बंदोबस्तासाठी हजर झालो.

मुसाफिरखान्यासमोरच पायधुणी पोलिस ठाण्याची हद्द होती व तो संपूर्ण भाग कोळीवाडा म्हणून ओळखला जात होता व तो हिंदु वस्तीने व्यापलेला होता. पोलिस ठाण्यात प्रवेश केल्यानंतर पायधुणी पोलिसठाणे हे पहिले नेमणुकीचे ठिकाण, पायधुणी येथे मी चार वर्षे कार्यरत असल्याने तो संपूर्ण भाग तसेच मुसाफिरखान्याचा भाग माझ्या परिचियाचा होता व तेथील काही स्थानिक लोक ज्यांचा तेथील रहिवाशांवर प्रभाव होता, अशा अनेक लोकांशी माझे चांगले संबंध होते व त्यांच्याशी सुसंवाद साधून तेथे त्या विभागात शांतता टिकवण्यास मला यश आले.मुसाफिरखान्याचा परिसर जातीय दंगलीसाठी बदनामच होता व मुंबईतील बहुतांशी जातीय दंगलीचा संवेदनशील ठिकाण (Sparking Point) म्हणून ओळखला जात असे

सर्वसाधारणपणे स्थानिक लोकांना जातीय दंगलीत काडीमात्र रस नसतो. पण बाहेरचे लोक दंगल पेटवून निघून जातात व त्यात स्थानिक लोक उगिचच होरपळले जात असल्याचा माझा सखोल अभ्यास होता. मुसाफिरखाना हे चैनीच्या परदेशी वस्तूंचे मोठे मार्केट म्हणून ओळखले जात असे व त्या व्यापारात स्थानिक लोक व जोगेश्वरी, मुंब्रा येथील बरीच व्यापारी मुले कार्यरत असत. त्याबाहेरील लोकांचा दंगल पेटविण्यात कल असे म्हणून तेथील स्थानिक लोकांना योग्य त्या सूचना देऊन त्यांचा विश्वास आत्मसात केला. जेणेकरुन त्याठिकाणी कोणीतीही दंगलीची झळ पोहचू नये. त्याप्रमाणे त्या अतिसंवेदनशील ठिकाणी मी दंगलीची कोणतीही झळ पोहचू दिली नाही. परंतू हळूहळू का होई ना पण त्या दंगलीची झळ मुंबईत बहुतांश ठिकाणी पसरली.

दंगलीची झळ पोहोचलेले व बेघर झालेले अनेक मुसलमान वृध्द, स्त्रिया व मुले यांना मुसाफिरखान्यात आश्रय देण्यात आला होता व त्या सा-यांचा पोलिसांबद्दल गैरसमज होऊन सुरुवातीला ते पोलिसांकडे आकसाने पहात. स्थानिक मुसलमानांचा माझ्यावर खूप विश्वास होता व त्यांच्या मदतीने मी त्या होरपळून निघालेल्या लोकांशी संपर्क साधून त्यांना लागेल ती मदत करुन त्यांचा गैरसमज दूर करुन पोलिसांवरचा विश्वास प्रस्थापित केला.

मी सलग आठ दिवस मुसाफिरखान्याच्या नाक्यावर ठाण मांडून बसलो होतो. आमचा विभाग जरी शांत होता तरी समोरच पायधुणी विभागात छोटया-मोठया घटना घडत असत. तेव्हा पायधुणी पोलिसांच्या मदतीला जावे लागत असे.

जरी आमच्या विभागात दंगली पेटल्या नाहीत, तरी वर वर किरकोळ दिसणा-या परंतु अतिसंवेदनाशील घटना घडल्या होत्या व त्याचा वेळीच शहानिशा करुन त्या मुळासकट निपटून काढल्यामुळे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले नाहीत.

# सुलेमान बेकरी

दंगलीच्या काळात मातोश्री वर कुणीतरी खोडसाळपणे धमकीचा फोन केला. त्या आय.डी.वरुन मिळालेल्या नंबराची चौकशी केली असता मातोश्रीवरील संबंधितांना असे कळले की, तो फोन सुलेमान बेकरी, फोर्ट विभाग येथून केला गेला होता. त्यानुसार सदरचे प्रकरण मला हाताळावे लागले. तोपर्यंत स्थानिक शिवसैनिकांच्या कानावर ती गोष्ट गेली व सुलेमान बेकरीचे अस्तित्व धोक्यात आले. चौकशीअंती असे लक्षात आले की, सुलेमान बेकरीचा मालक हा गुजराती असून त्याने ती बेकरी टायटल सकट घेतली असल्यामुळे त्या बेकरीचे नाव सुलेमान बेकरी असे राहिले. त्यानंतर सुलेमान बेकरी त्या काळात बंद होती व मलबार हिलला राहणारा मालक सुट्टीच्या निमित्ताने परिवारासह बाहेर गावी गेला होता व दोन-तीन दिवसांनी परतणार होता. त्या दोन-तीन दिवसांच्या काळात सुलेमान बेकरीला संरक्षण देऊन स्थानिक शिवसैनिकांना सबुरीची आवर घालताना फार बिकट काम झाले. दोन दिवसांनी मालक आल्यावर कळले की, सदरचा टेलिफोन नंबर हा पूर्वी एकेकाळी सुलेमान बेकरीचा होता. म्हणून पुन्हा एम.टी.एन.एल. शी संपर्क साधला असता कळले की, सदरचा नंबर हा चर्चगेट स्टेशनजवळ अस्तित्वात असलेल्या एका पब्लिक टेलिफोन बुथचा होता. यावरुन सिध्द झाले की, कोणीतरी खोडसाळपणे मातोश्रीवर फोन केला होता. सदर प्रकार स्थानिक शिवसैनिकांना कळविले असता त्यावर पडदा पडला.



# संशय

मी याच विभागात काम करीत असताना एक मराठी तरुण जो बी. एड. चा विद्यार्थी होता व तो मुंबईच्या बाहेर वसतिगृहात राहत होता. त्याचे वडिल फार गरीब होते व तो वस्तिगृहातून सुट्‌टी काढून ठाण्याला आपल्या वडिलांकडे पैसे मागण्यासाठी गेला होता. परंतु त्यांच्या वडिलांनी आर्थिक मदत न केल्याने तो थोडासा नाराज झाला होता व वसतिगृहात परतण्याऐवजी तो आगगाडीने थेट सी.एस.टी स्टेशनला आला. तेव्हा दंगल थोडी शमलेली होती. नंतर गेटवे ऑफ इंडियाच्या परिसराचा फेरफटका मारुन परत जाण्याचा त्याचा विचार असता तो फिरत फिरत मुसाफिरखान्याच्या परिसरात आला. त्याच्या खिशात एक दमडी देखील नव्हती व त्यास कडकडून भूक लागली होती. त्यावेळेस त्याने खादीचा लेंगा परिधान केला होता व खांदयाला झोळी लटकवलेली होती. त्याने विचारपूस केले असता त्याला कळले की, मुसाफिरखाना येथे मोफत अन्नदान केले जाते म्हणून तेथे जाऊन त्याने पोटपूजा केली. तिथपर्यंत तो हिंदू असल्याचे कुणाच्याही लक्षात आले नव्हते. परंतु जेवल्यानंतर हात धुण्यासाठी जागा शोधत असताना तेथील स्थानिक स्वयंसेवकाच्या लक्षात आले की, तो हिंदू असून संशयास्पद स्थितीत तेथे वावरत आहे. म्हणून तेथे त्याची चौकशी केली असता त्याच्या झोळीत शाहिस्तेखानाच्या वधाचे एक गुंडाळलेले चित्र सापडले. तेथील स्थानिक स्वयंसेवकावर माझी चांगली पकड होती. त्यांना तो मुलगा हिंदू असून तेथे अन्नग्रहण केले म्हणून आक्षेप नव्हता, परंतु त्याच्याजवळ सापडलेल्या चित्रावरुन त्यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. वास्तविक तेथे फार गोंधळाची स्थिती झाली होती. परंतु स्वयंसेवकाने वेळीच हस्तक्षेप केल्याने अनर्थ टळला. मग ते स्वयंसेवक त्याला माझ्यासमोर घेऊन आले व झाल्या घटनेची मला कल्पना दिली. ‘त्यांची अशी अपेक्षा होती की, सदरच्या व्यक्तीबद्‌दल सखोल चौकशी करुन त्याचा कुठल्याही राजकारणी पार्टीशी संबंध आहे, वा हस्तक्षेप आहे की नाही? याची चौकशी करुन त्याची शहानिशा व्हावी.’ आम्ही त्या मुलास चौकशीसाठी ताब्यात घेतले. आम्ही आमच्यापरीने स्थानिक चौकशी करुन नंतर त्यास सी.आय.डी. व आय.बी. यांच्या स्वाधीन केले गेले व त्याची सखोल चौकशी केली असता तो कुठल्याही राजकारणी पार्टीशी वा इतर कोणाशी संलग्न नसून एक बी.एड. चा विद्यार्थी होता व त्याच्याकडे सापडलेले चित्र हे विद्यार्थ्यांचा पाठ घेण्यासाठी बनवलेले होते व तो एक अभ्यासाचा भाग होता. त्यानंतर त्याच्या वडिलांना बोलावून त्यांना योग्य ती समज देऊन त्या मुलास त्यांच्या स्वाधीन केले. आपला मुलगा ‘बावळट ध्यान’ असल्याचे त्यांनी कबूल केले.



तेथील स्थानिक स्वयंसेवकाशी माझे घनिष्ठ संबंध असल्यामुळे अनर्थ टळला. त्याक्षणी कदाचित त्याच्यावर मृत्युदेखील ओढवला असता, अशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. वस्तुस्थितीची वेळीच शहानिशा करुन सर्व सबंधितांचा गैरसमज दूर केला गेला.

# गैरसमज

या तिस-या घटनेत तर चक्क पोलिस खात्यात कार्यरत असलेल्या शिपायाचाच सहभाग होता. एम. आर. ए. मार्ग पोलिस ठाण्याच्या परिसरात मोठी पोलिस वसाहत असून त्यात बरेच शिपाई हवालदार कुटूंबासह राहतात. त्या वस्तीत राहणारा एक हवालदार तेव्हा स्पेशल ब्रँचमध्ये कार्यरत होता. ही ब्रँच राजकीय पक्षांच्या हालचालींवर लक्ष ठेवून असते व त्या हवालदारावर मुसाफिरखान्यातील हालचालीचे काम सुपूर्द केले गेले होते. या हवालदाराचा आठवी इयत्तेत शिकत असलेला मुलगा मुसाफिरखान्याजवळ असलेल्या शाळेत शिकत होता. तो घरुन शाळेत वार्षिक परीक्षेचा निकाल आणण्यासाठी म्हणून गेला तो बराच काळ घरी परतलेला नव्हता. त्याच्या हवालदार वडिलांनी शाळेत चौकशी केली. मूले आपापली निकालपत्र घेऊन गेल्याचे समजले. तेव्हा व्यथित होऊन हा हवालदार पोलिस ठाण्यात येऊन त्याने असा तक्रारीचा सूर लावला की, ‘तो मुसाफिरखान्यातील लोकांच्या हालचालींवर नजर ठेवून असतो म्हणून आकसापोटी त्याच्या मुलास तेथील लोकांनी गायब केले असावे.’ तसे पाहिले तर ही एक चिंता करण्यासारखी तक्रार होती म्हणून ती फार शिताफीने हाताळावी लागली.

गुप्त चौकशीअंती असे समजले की, तो मुलगा अभ्यासात फारच कच्चा होता. तेव्हा कदाचित अनुत्तीर्ण झाल्यामुळे भितीपोटी व लज्जेपोटी तो घरी परतला नसावा, असा आमचा कयास होता. मुसाफिरखान्यातील बहुतांशी स्वयंसेवक व कर्मचा-यांचे आमच्याशी फार सलोख्याचे संबंध असल्याकारणाने असा काही प्रकार घडला असावा हे आम्हांस मान्य नव्हतेच. त्यांची आम्ही शहानिशाही केली. त्या मुलाला ओळखणा-या व्यक्तीस बरोबर घेऊन पोलिस ठाण्याच्या कंपाऊंडच्या मुख्य दारावरच पाळत ठेवली असता अखेर दुपारनंतर तो घरी परतत असताना दिसला. तो वडिल व इतरांना भेटण्याआधीच आम्ही त्याची शिताफीने चौकशी केली असता तो वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाला होता असे कळले. त्याने देखील प्रांजळपणे कबूल केले. लज्जा व भितीपोटी नेहमीच्या वेळी घरी न येता तो बाहेर वेळ काढत राहिला व जेव्हा भूक आवरेनाशी झाली तेव्हा घरी परतला.



# अफवा

त्या दंगलीच्या काळात अफवांचे तर पिकच आले होते. दंगलीच्या काळात स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी तणावाची परिस्थिती तशीच रहावी म्हणून खतपाणी घालणारे बरेच समाजकंटक कार्यरत असतात. असेच एकदा बंदोबस्ताला तैनात असताना एक अतिकार्यक्षम अधिकारी माझ्याकडे आला व त्याने मला गुपचूप सांगितले की, मुस्लिम वस्तीत असलेल्या पोलिसांच्या वस्तींमध्ये घुसून काही समाजकंटकांनी पोलिसांच्या लहान मुलांच्या जिभा कापल्या व स्त्रियांना देखील इजा केली असे कानावर आले आहे.

पोलिसांचे मनोधैर्य खचावे व संतुलन बिघडावे जेणेकरुन एका विशिष्ट जातीवर अत्याचार करण्यावर प्रवृत्त होतील या उद्देशानेच ही अफवा उठवली असणार हे जाणून मी त्या अधिका-यांस तोंडातून 'ब्र' न काढण्यास फर्मविले व त्यास सांगितले की, दाढी करताना जर ब्लेड लागली किंवा शिवताना सूई टोचली तर किती असहय वेदना होतात असे जर काही खरेच घडले असेल तर लाल औषध लावून घरीच उपचार करता येतील अशी बाब नव्हे. तर संबंधित रुग्णाचा दवाखान्यातच उपचार होऊ शकतो. त्या परिसरात जे.जे., जिटी आणि सेंट जॉर्ज इस्पितळे आहेत तेव्हा त्यास अशा प्रकारच्या केसेस कोणत्यातरी इस्पितळात दाखल झाल्या आहेत का? त्यांची शहानिशा करण्यास सांगितले व चौकशी अंती असे समजले की, ती अफवाच होती हे सिध्द झाले.



निवृत्त पोलिस कमिशनर श्री. सतीश सहानी यांच्यातर्फे प्रशस्ती पत्रक स्विकारताना

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

## जातीय सलोख्याची भावना ही स्वतःच्या अंतःकरणातून बळावली पाहिजे, तर ती वर्तनात डोकावते असे माझे प्रांजळ मत आहे.

त्यानंतर थोडया दिवसांनी मुंबईत चालू असलेली दंगल आटोक्यात येऊन निवळली. परंतु एक प्रकारचे भयाण वातावरण जाणवायचे व पोलिसांना देखील दंगल निवळल्यावर थोडा उसासा घेण्यास वेळ मिळत होता. त्या काळात परप्रातांतून आलेले खास करुन यु.पी., केरळमधून आलेले मुसलमान जे फेरीचा धंदा करत असत ते हजारोंने मुंबई सोडून निघून गेले होते. असाच एक परप्रांतीय म्हातारा मुसलमान मी राहतो त्या परेल भोईवाडा परिसरात रविवारचा ट्रंक डोक्यावर घेऊन बेकरीतील खाण्याच्या वस्तु-खारी, बटर वगैरे विकण्यास येत असे, तो देखील यायचा बंद झाला होता. बहुधा मुंबई सोडून आपल्या प्रातांत गेला असावा. त्या नंतर एक दोन महिन्याचा काळ लोटला व तो रविवारचा दिवस होता व योगायोगाने मी घरी होतो. सकाळी ९ च्या सुमाराम अचानक तो बिस्कीटवाला आमच्या दारी आला. त्याकाळात माझ्या पत्नीचे स्वास्थ बिघडल्यामुळे डॉक्टरांनी तिला बेकरीत तयार झालेल्या वस्तू खाण्यास मनाई केली होती. मुलीने दरवाजा उघडला असता बिस्कीटवाला आला असल्याचे सांगून तिने त्यास 'बिस्कीट नको' असल्याचे सांगून परत पाठविल्याचे माझ्या वेळीच ध्यानात आणून दिले. लालबाग, परळ ही वस्ती हिंदूची वस्ती म्हणून ओळखली जाते व आपण मुसलमान असल्यामुळे एका हिंदू पोलिस अधिका-याच्या घरातल्यांनी आपल्याकडील बिस्कीटे घेण्यास नकार दिला असा त्याचा गैरसमज होऊन तो परतविला जाऊ नये म्हणून मी माझ्या मुलीला त्यास परत बोलविण्यास व त्याच्याकडून अर्धा किलो बिस्कीटे घेण्यास सांगितले. जर ती बिस्कीटे घरी खायावयाची नसतील तर दुसऱ्या कोणास तरी देऊन टाकण्यास सांगितले व त्याच्याकडून बिस्कीटे खरेदी केली. तो गेल्यानंतर वर नमुद केलेल्या खुलाश्याबद्दल पत्नी व मुलांना नीट समजावून सांगितले. "Charity begins from the Home" अशी म्हण आहे. जातीय सलोख्याचे देखील असेच आहे असे मी म्हणेन. जातीय सलोख्याची भावना ही स्वतःच्या अंतःकरणातून बळावली पाहिजे तर ती वर्तनात डोकावते असे माझे प्रांजळ मत आहे



इफ्तार समारंभात मुस्लिम बांधवां समवेत

# आठवणीतून साकारलेल्या साठवणी

## माझे सारे अधिकारी व कर्मचारी कामसुवृत्तीचे असल्याकारणाने त्या संवेदनशील विभागात माझा दोन वर्षे अकरा महिन्यांचा काळ कसा निघून गेला हे मला समजलेच नाही.

त्यानंतर दंगल शमून मुंबई शहरातील वातावरण पूर्ववत होते ना होते तोच ८ मार्च रोजी मुंबईत बॉम्बस्फोटाची साखळीच सुरु झाली. पहिला बॉम्बस्फोट शेअरबाजारच्या बिल्डींगमध्ये झाला. तो शुक्रवारचा दिवस होता व दुपारचा शेवटचा नमाज संपल्यानंतर पहिला बॉम्बस्फोट शेअर बाजार बिल्डींगमध्ये झाला व त्यानंतर एअर इंडिया बिल्डींग येथे झाला व ते सत्र तसेच इतरत्र सुरु राहिले व पुन्हा एकदा मुंबईत तणावाचे वातावरण सुरु झाले. पोलिसांवर खूप ताण पडला परंतु कर्मधर्म संयोगाने बॉम्बस्फोट घडवून आणणा-या व्यक्तींना वेळीच अटक झाली व मुंबईतील रहिवाश्यांनी संयम बाळगून वातावरण बिघडू दिले नाही. पोलिसांना देखील चोख बंदोबस्त ठेवून शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळाले

त्यानंतर थोडयाच दिवसांनी शेअर बाजार परिसरात लोकांची तूरळक ये-जा चालू झाली. या परिस्थितीचा फायदा घेऊन त्या परिसरात असलेले कॉमर्स हाऊस या बिल्डिंगमध्ये घरफोडयांनी प्रवेश करुन पाच-सहा ऑफिसांची कुलपे तोडून ऑफिसात घुसून पैसे व इतर किंमती सामान चोरुन पोबारा केला होता. तेव्हा स्थानिक लोकांनी अशी अफवा उठवली होती की, काही अतिरेकी पोलिसांचा गणवेष घालून आले होते व त्यांनी दहशतीचा भाग म्हणून ती चोरीची घटना घडवून आणली होती. त्याला वृत्तपत्रांनी देखील छापून दुजोरा दिला होता आणि मुंबईच्या पोलिस कमिशनर व इतर वरीष्ठ अधिका-यांनी जागेला भेट देखिल दिली होती.

चोरी झालेल्या ऑफिसांची पाहणी केल्यानंतर आम्ही तेव्हाच निष्कर्षाला पोहचलो की, ते सराईत घरफोडयांचे काम असून दहशतवादयांचे काम नसावे. पण त्या वस्तीत रहाणा-या लोकांच्या झालेल्या गैरसमजाचे गांभिर्य लक्षात घेऊन आम्ही चोख तपास केला व त्यातील एका घरफोडयास त्याच रात्री आझादमैदान पोलिस ठाण्यांत केलेल्या नाकाबंदीत मालासकट पकडून अटक केली होती. त्यानंतर इतर तिघांसही अटक करण्यात आली. त्यांनी खार व सांताक्रूझ परिसरातही पाच-सहा घरफोडयांचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले की ज्यात राजेश खन्नाच्या ऑफिसमध्ये झालेल्या रॅाबरीचा गुन्हा देखील उघडकीस आला व पोलिसांच्या चिंतेची बाब दूर झाली.



एम. आर. ए. मार्ग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संवेदनशील ठिकाणे म्हणजे व्हि.टी. रेल्वे स्टेशन परिसर, जनरल पोस्ट ऑफिस, ओल्ड कस्टम हाऊस, न्यू कस्टम हाऊस, आर.बी.आय., टांकसाळ, सेंट्रल लायब्ररी, नेवल कमांड मुख्यालय व बहुतांश बँकांची मुख्यालये असल्याने व तसेच हुतात्मा चौक व काळा घोडा येथे सातत्याने येणारे मोर्चे, उपोषणास बसणारे राजकीय व्यक्ती हे सारे सांभाळताना फार जिकरीचे व्हायचे. परंतु माझे सारे अधिकारी व कर्मचारी कामसुवृत्तीचे असल्याकारणाने त्या संवेदनशील विभागात माझा दोन वर्षे अकरा महिन्यांचा काळ कसा निघून गेला हे मला समजलेच नाही.

दंगलीनंतर एक वर्षाचा काळ लोटला. तेव्हाचे पोलिस आयुक्त श्री. सतीश सहानी यांनी सर्व पोलिस ठाण्याच्या प्रमुखांस वैयक्तिकरित्या पत्र लिहून त्यांच्या व त्यांच्या इतर कर्मचा-यांच्या कामाबद्दल प्रशंसा केली होती. त्यांच्या पत्राला उत्तर म्हणून आम्ही मा. सहानी साहेबांना पत्र लिहून मानवंदना केली.

'सन १९९२ च्या दंगलीनंतर गोवंडी येथे शिवाजी नगर पोलिस स्टेशन स्थापित करण्यात आले. दोन जाती जमातीत वैमनस्य असलेल्या त्या विभागात अनुभवी, कार्यकुशल व चतुर पोलिस अधिका-यांची गरज आहे. तेव्हा एम.आर.ए. मार्ग पोलिस ठाण्यात दंगलीच्या काळात दंगलीची झळ पोहचू न देण्यास यश मिळविल्यामुळे तुमची निवड करुन शिवाजी नगर पोलिस ठाण्यात नियुक्त करण्यात येत आहे.' असे तेव्हाचे पोलिस आयुक्त श्री. सतीश सहानी यांनी मला आपल्या कार्यालयात बोलवून सांगितले व मला शुभेच्छा दिल्या.



सिने अभिनेता राजेश खन्ना यांच्या लग्न समारंभ समयी

# लाडात वाढलेला एकुलता एक मुलगा त्याच्या आईच्या स्वाधीन केला तेव्हांचा तो हृदयद्रावक प्रसंग अजून ही माझ्या नजरेसमोर येतो.

शिवाजीनगर पोलिस ठाण्याचा चार्ज घेतल्यानंतर एक शाळेची बिल्डिंग वगळता संपूर्ण परिसर, चाळी झोपडपट्टीचा होता. बरेच गुंडप्रवृत्तीचे लोक तिथे राहत व तेथे छोटे मोठे कारखाने देखील पुष्कळ होते. तुरळक हिंदू वस्ती सोडता बहुतांशी परिसर हा मुसलमानांनी व्यापलेला होता. दंगलीच्या काळात दोन पोलिसांची हत्या करण्यात आली होती. तेथील परिस्थितीचा अभ्यास करुन तेथील स्थानिक व्यक्ती, ज्यांचा परिसरातील लोकांवर प्रभाव होता अशा लोकांशी संबंध व सलोखा वाढवून शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळविले. खंडणीसाठी लहान मुलांना पळविलेल्या दोन गुन्हयांच्या नोंदी माझ्या दहा महिन्यांच्या काळात घडल्या होत्या. त्या दोन्ही गुन्हयाचा शिताफीने तपास करुन गुन्हेगारांना पकडण्यात यश मिळविले. सद्दाम नाव असलेल्या चार वर्षाच्या मुलाला तर कानपूरहून आणून त्याच्या वडिलांना सुपूर्द केले गेले.



# खंडणी

## आम्ही त्या मुलीस दर्ग्यात नेऊन नवस पूरा केला ही बाब नंतर शिवाजी नगर पोलिस ठाण्याच्या परिसरात हळूहळू पसरली व त्यानंतर मोहल्ला कमीटीच्या सभेमध्ये तर लोक मला 'फरिश्ता (देवदूत)' म्हणून संबोधित करु लागले.

### असा पोलीस अधिकारी होणे नाही

अजून एका केसमध्ये त्याच परिसरात राहणा-या मुलांनी एका सहा-सात वर्षाच्या मुलीस खंडणीसाठी पळविले होते. तेव्हा ती मुलगी सुखरुपपणे मिळावी यासाठी तर आम्ही चक्क बॉम्बे हॉस्पिटल बाजूस असलेल्या दर्ग्यावर नवस केला होता. हि केस तर मोठया शिताफीने हाताळावी लागली होती. खंडणी खोरांनी फोन करुन तीन वेळा मुलीच्या वडिलांना पैसे घेऊन निरनिराळ्या ठिकाणी बोलाविले होते व आम्ही देखील वेश पालटून योग्य ती पावले उचलली होती. परंतु पैसे घेण्यास कोणीच पुढे आले नव्हते. तोपर्यंत तीन दिवसांचा काळ लोटला. मुलगी शाबूत असेल की नाही या नुसत्या चिंतेने आम्ही फार व्यथित झालो होतो. तिस-या वेळेस कुर्ला येथील सिनेमा थिएटरजवळ पैसे घेऊन मुलीच्या वडिलांना बोलावले असता आम्ही योग्य ती पाळत ठेवली होती. तेव्हा देखील कुणीही पैसे घेण्यास पुढे सरसावले नव्हते. परंतु एका चाणाक्ष पोलिसाने मला येऊन सांगितले की, मागील दोन वेळेस दिसलेला एक इसम यावेळी देखील तेथे घुटमळताना दिसत आहे. आम्ही लगेचच त्या इसमास ताब्यात घेतले व थिएटरच्या मॅनेजरला चौकशीसाठी त्यांचे ऑफिस उपलब्ध करुन देण्याची विनंती केली जेणेकरुन जर मध्ये काही काळ लोटला तर मुलीस डांबून ठेवलेले ठिकाण बदलू शकते किंवा तिच्या जिवास धोका पोहचू शकतो. म्हणून सदर इसमाची पोलिसी खाक्याने चौकशी केल्यानंतर काही क्षणातच त्याने गुन्हयात सहभागी असल्याचे कबूल केले व सदरची पळवून नेलेली मुलगी घाटकोपर परिसरात दडवून ठेवल्याचे कबूल केले. आम्ही लगेचच मुलीच्या वडिलांना समवेत घेऊन या इसमाबरोबर त्या जागी जात असताना वाटेतच ती मुलगी दोन इसमाबरोबर समोरुन येत असल्याचे दिसून आले. त्या दोन इसमांना पकडून आम्ही तिन्ही गुन्हेगारांना अटक करण्यात यश मिळविले. त्यानंतर कायदेशीर योग्य ते सोपस्कार करुन मुलीला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यापूर्वी आम्ही त्यांच्या पूर्ण परिवारांसह बॉम्बे हॉस्पिटल नजीक दर्ग्यात नेऊन तेथे चादर चढवून आम्ही केलेला नवस फेडला.

तेथून घरी परतताना भायखळा राणीची बाग येथे जीप थांबवून त्या भांबावलेल्या मुलीस झालेल्या घटनेचा विसर पडावा म्हणून तिच्या आई-वडिलांना त्या मुलीस राणीच्या बागेत घेऊन जाण्यास व तेथे तीन-चार तास घालविण्यास सांगितले. जेणेकरुन ती त्या धक्क्यातून पूर्ववत होईल.



पोलिस अधिका-यांबरोबर वैचारिक चर्चा करताना

# मी शिपायांना समजावून सांगत असे की जर हे लोक येथे वर्षानुवर्षे राहून लहानाची मोठी होतात, त्याची निष्पाप बालके येथे जन्म घेतात तर आपणांस फक्त नोकरीचा २ वर्षाचा काळ आनंदाने का काढता येऊ नये?

शिवाजी नगर पोलिस ठाणे म्हणजे संपूर्ण झोपडपट्टी व पोलिस स्टेशनच्या काही अंतरावर मुंबईचा सर्व कचरा टाकण्याचे स्थान (Dumping Yard) होते. रोज जवळ जवळ ९०० ट्रकच्या वर कचरा पोलिस ठाण्याच्या दाराच्या काही अंतरावरच डंपिंग यार्ड मध्ये नेऊन त्याचा निचरा व्हायचा. पावसाळ्यात इतकी दुर्गंधी पसरायची की त्यामुळे कर्मचारी वर्ग तेथे नोकरी करण्यास नाराज असत. त्यामुळे गैरहजेरी, सिक रिपोर्ट याला खूप उत आलेला असे व त्यामुळे कमी पोलिस बळामध्ये नोकरी करण्याचे काम जिकिरीचे व्हायचे. पोलिस स्टेशनच्या बाजूला असलेल्या जागेत शुक्रवारी साप्ताहिक कवायत होत असे व तेथे मी जातीने हजर असायचो व सकाळची ७.०० वाजताची कवायत पाहण्यासाठी बाजूला असलेल्या झोपडपट्टीतील काही कुटुंबे कुतूहलाने जमत असत. मग कवायत संपल्यानंतर एखादया कुटुंबास बोलावून ते त्या परिसरात किती वर्षेराहतात त्याची जातीने विचारपूस करत असे व त्यातून काही कुटूंबे तर वर्षानुवर्षे राहत असल्याचे निष्पन्न होत असे. त्यावर त्यांच्या खांद्यावर असलेली लहान लहान बालके, हे सर्व ध्यानात ठेवून मी नंतर शिपायांना समजावून सांगत असे की जर हे लोक येथे वर्षानुवर्षे राहून लहानाची मोठी होतात, त्याची निष्पाप बालके येथे जन्म घेतात तर आपणांस फक्त नोकरीचा २ वर्षाचा काळ आनंदाने का काढता येऊ नये? कुठल्याही पोलिस ठाण्याचा नेमणूकीचा काळ ५ वर्षाचा असतो परंतु शिवाजी नगर पोलिस ठाण्याचा नेमणूकीचा काळ प्रशासनाने तेथील अनैसर्गिक परिस्थितीमुळे खास शिफारसीवरुन दोन वर्षाचा केला होता हे सारे त्यांना पटवून दिल्यानंतर ते त्यांच्या पचनी पडले व कर्मचारी वर्ग नंतर समजुतीने काम करु लागले.



# आधुनिक धर्मराज



घराण्यातील पहिलाच मी मुंबई पोलीस
दलात झालो भरती,
प्रशिक्षणाला निघताना घरातल्या सर्वांना
आली प्रेम दुःखाची भरती,
आई बोलली,
''जीवाला जप, हयगय करु नको
खाण्या-पिण्याची'',
वडिलांनी उपदेश केला,
''या खात्यात संगत नको बाई-बाटलीची'',
आईचा प्रेमळ व वडिलांचा नैतिक सल्ला
मी मानला सर्व आयूष्यभर,
डयूटीवर असताना कुणी शितपेय मागवलं,
तर बाटली ऐवजी घेई पेलाभर,
बाटली प्रश्न मिटला, पण फिर्यादी बाई आली की,
मी माझी जागा सोडे,
हया बाबतीत अनेक वेळा खरं कारण
न सांगितल्याने वरिष्ठांचे घेतले जोडे,
मी माझ्या कामात हुशार असूनही,
स्त्रीच्या बाबतीत कधी मम वाणी न सत्य बदली,
वरिष्ठांनी आयुक्तांना वार्षिक गुप्त अहवाल लिहून
माझी सशस्त्र विभागात केली बदली.

– सौ. भावना पेडणेकर चोरगे

# शिफारस
## (POLICE MEDAL DISTINGUISHED SERVICE)

त्यानंतर वर्षभरात माझी नायगांव येथील सशस्त्र पोलिस मुख्यालयात बदली झाली व मला शस्त्रालयाचा प्रमुख इन्स्पेक्टर म्हणून काम देण्यात आले. त्यात समस्त मुंबई पोलिसमध्ये नेमणूकीस असलेल्या पोलिस शिपाई व अधिका-यांचा नेमबाजीचा वार्षिक सराव, शस्त्राची डागडूजी व नवीन प्रशिक्षितांचे ट्रेनिंग इत्यादी कामाचा समावेश होता. तसेच स्वातंत्रदिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन या सर्व दिवसांच्या कवायत सोहळ्याचे काम तसेच नवीन शिपायांची भरती या सर्वांचा समावेश असे व हे सारे काम करत असताना मला सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून बढती मिळून याच सा-या कामाची निगराणी अधिकारी म्हणून री ओढावी लागली. व तेथे सहाय्यक पोलिस आयुक्त (ए.सी.पी.) म्हणून नेमणुकीस असताना माझ्या तीस वर्षापेक्षा जास्त कार्यकाळाची गुणवत्ता व कामगिरी पाहून तेव्हाचे पोलिस आयुक्त श्री. मेंन्डोंझा यांनी १९९९ च्या गणतंत्र दिनी देण्यात येणा-या (POLICE MEDAL DISTINGUISHED SERVICE) साठी देखील शिफारस केली होती.



## जातीय सलोखा हा खास करुन पोलिस कर्मचा-यांच्या अंतःकरणातून व्यक्त होणे जरुरीचे आहे आणि कायदा व सुव्यवस्था सांभाळताना ते कुणासही इजा न करता किंवा कुणाच्याही भावना न दुखवता सांभाळणे हे एक अत्यंत उपयोगी असे शस्त्र आहे.

त्या काळात माझ्या दोन्ही मुलीं थोरली भारती विजय पेडणेकर आणि धाकटी भावना विजय पेडणेकर यांची लग्न होऊन त्यांना अपत्य देखील प्राप्त झाली व जातीय सलोख्याचा भाग म्हणून मी माझ्या पहिल्या नातीचे नांव 'खुशबू' असे ठेवले होते. जी आजतारखेस हयात नाही. आता मला ऐश्वर्या, गौरव व अक्षय अशी ३ नातवंड आहेत.


निवृत्तीनंतरचा काळ मी माझ्या चेल्यांच्या संपर्कात राहून व त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात घालवत आहे व त्यांनाही गंभीर गुन्हयाच्या तपासात काही अडचण आल्यास ते जातीने माझ्याशी संपर्क साधतात व मी त्यांना योग्य तेच मार्गदर्शन करतो. तसेच पोलिस खात्यात नोकरीत असताना ज्यांच्याशी घनिष्ठ संबंध आले अशा सर्व जाती जमातीतील लोकांशी आजदेखील संपर्क साधून आहे.




दिनांक ७ जानेवारी २०१२ रोजी माझी पत्नी सौ. मंजू विजय पेडणेकर दिवंगत झाली. दुर्दैवाने, तो माझा वाढदिवस होता. माझा आणि माझ्या पत्नीचा प्रेमविवाह दिनांक १७ नोव्हेंबर, १९७१ साली झाला. ती जैन धर्मातील असून सुध्दा तिने माझ्या महाराष्ट्रीयन कुटूंबातील सर्व चालीरिती, खान-पान, आवडी-निवडी गुणदोषांसकट आनंदाने स्विकारल्या. मी माझ्या दैनंदिन कामकाजात इतका व्यस्त असायचो की मला माझ्या कुटूंबाकडे लक्ष दयायला देखील वेळ नव्हता. अशा परिस्थितीतही माझ्या पत्नीने मला उत्तम साथ दिली. माझ्या दोन्ही मुलींचे पालनपोषण तिने उत्तमरित्या केले. त्यांची लग्नकार्ये देखील सुरळीत पार पाडली. तिचा मला फार मोठा आधार होता. तिचे जाणे हा माझ्यासाठी फार मोठा आघात होता. तो आधार हरपला तेव्हा तिच्या अंतयात्रेत तसेच तेराव्यास सर्व जाती-धर्माचे बांधव जातीने हजर होते व त्यांनी तेराव्याच्या जेवणाचा लाभ देखील घेतला. तेव्हा सरतेशेवटी मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, जातीय सलोखा हा खास करुन पोलिस कर्मचा-यांच्या अंतःकरणातून व्यक्त होणे जरुरीचे आहे आणि कायदा व सुव्यवस्था सांभाळताना ते कुणासही इजा न करता किंवा कुणाच्याही भावना न दुखवता सांभाळणे हे एक अत्यंत उपयोगी असे शस्त्र आहे असे मला वाटते.

# पोलिस खात्यात असताना मिळालेली प्रशस्ती पत्रके
















# पोलिस खात्यात असताना मिळालेली प्रशस्ती पत्रके


महाराष्ट्र पोलीस

Certificate

The Commissioner of Police Greater Bombay

acknowledges with thanks the assistance rendered to the Greater Bombay Police by

in connection with


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in


महाराष्ट्र पोलीस

Commendatory Note

The Commissioner of Police Greater Bombay, grants this Commendatory Note to

In appreciation of the good work done in

# पोलिस खात्यात असताना मिळालेली प्रशस्ती पत्रके


Commendatory Note


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN


Certificate
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY
ACKNOWLEDGES WITH THANKS
THE ASSISTANCE RENDERED TO
THE GREATER BOMBAY POLICE
BY
IN CONNECTION WITH



Commendatory Note


Commendatory Note



Commendatory Note



Commendatory Note



Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN



Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN



Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN



Commendatory Note



Commendatory Note


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
GREATER BOMBAY, GRANTS THIS
COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF
THE GOOD WORK DONE IN


# पोलिस खात्यात असताना मिळालेली प्रशस्ती पत्रके


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE GREATER BOMBAY, GRANTS THIS COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN



Commendatory Note


Commendatory Note


Commendatory Note


Commendatory Note
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE GREATER BOMBAY, GRANTS THIS COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note


Commendatory Note


Commendatory Note


Commendatory Note


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN



Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE GREATER BOMBAY, GRANTS THIS COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note



Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE


Commendatory Note
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note


Commendatory Note
THE COMMISSIONER OF POLICE GREATER BOMBAY, GRANTS THIS COMMENDATORY NOTE TO
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN


Commendatory Note
IN APPRECIATION OF THE GOOD WORK DONE IN



# विश्वासघात

## (राष्ट्रपतीपदक विजेते सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विजय पेडणेकर यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित.)

१९७३ ची गोष्ट. मी तेव्हा बांद्रा पोलीस ठाण्यात पोलीस सब-इन्स्पेक्टर होतो. रात्री साडेआठ-नऊचा सुमार असेल. हवालदार राणे घाईघाईत आतं आला आणि म्हणाला 'चला साहेब केईएममधून मेसेज आहे 'फूड पॉयझनिंग'।'

आम्ही ताबडतोब निघालो आणि केईएम हॉस्पिटलमध्ये आलो. केईएममध्येच तिथला हवालदार आम्हांला सामोरा आला आणि स्त्रियांच्या वॉर्डकडे घेऊन आला.


ज्या स्त्रीला अन्नातून विषबाधा झाली होती ती ७५-७६ वर्षाची असावी. पण ती बेशुध्दावस्थेत होती. तिच्याकडून काहीही माहिती मिळणं त्या क्षणी तरी शक्य नव्हतं. तिचं नाव खैरुन्निसा होतं. हे केसपेपर पाहिल्यावर समजलं. तिथे एक हवालदार तैनात होताच. तिथून मग आम्ही पुरुषांच्या वॉर्डमध्ये आलो. पुरुषांच्या वॉर्डमध्ये खैरुन्निसाचा मुलगा सलीम हा अक्षरशः तळमळत होता. त्याच्याजवळच त्याचे वृध्द वडील भयंकर काळजीग्रस्त होऊन बसले होते. साहजिकच होतं. उतारवयात झालेला एकुलता एक मुलगा त्यांची ही अवस्था पाहिल्यावर बापाचं काळीज तुटलं नाही तरच नवल.

'क्या नाम है आपका चाचाजी ?'

'रमझान'

'क्या काम करते है?'

'हम गरीब व्यापारी है साब, कोयले की वखार है हम लोगोकी।'



रमझानभाईकडून जी माहिती मिळाली ती अशी, बांद्रा (पश्चिम) इथल्या तलावाजवळच्या पत्र्याच्या चाळीत रमझानभाईची कोळशाची वखार होती. रमझान आणि त्याची पत्नी खैरुन्निसा, मुलगा सलीम, दोन नोकर इजाक आणि महंमद हे सगळे तिथेच एकत्र रहात होते. त्यांचं जेवणही एकत्रच बनवलं जात असे. माझ्या मनात पहिलं प्रश्नचिन्ह उभं राहिलं. जेवण जर सगळ्यांच बनवलं होतं तर फक्त हे दोघेच आज जेवले. असं कसे?

'रमझानभाई, आपने आज खाना नही खाया?'

'नही... सुबह से मेरा पेट ठीक नही था।'

मी वॉर्डमधून बाहेर आलो. बाहेरच्या बाकडयावर त्यांचे दोन नोकर एवढेसे चेहरे करुन बसले होते. इजाक हा जुना नोकर असावा. सत्तरीचा तरी तो होता. महंमद पोरगा होता. विसेक वर्षाचा असेल. तो गोरटेला होता. नुकतंच त्यानं पान खाल्लं असावं. त्यानं पॅन्ट-शर्ट घातलं होत आणि केसांची स्टाईल फिल्मी होती. इजाकने पारंपारिक वेष घातला होता. सदरा-लेंगा आणि डोक्यावर गोल टोपी.

मी जवळ जाताच दोघंही उभे राहिले.

'इजाकभाई, आपने खाना नही खाया?'

हम तो हमेशा आखिरमें खाते है साब... नौकर आदमी हूँ... सेठ तो कहते है, खाने को, लेकिन अच्छा नही लगता...

'और तुम? तुम भी नौकर हो....

आखिरमें खाना खाते हो क्या?

'नही साब यह तो जब चाहे खा लेता है ।' इजाकच म्हणाला

'साब मै तो पिक्चर देखने गया था । बांद्रा टॉकीज में ।' महंमद म्हणाला.

'टिकट है ।'

'हा साब' महंमदन बांद्रा टॉकीजच अर्ध फाडलेल तिकीट दाखवलं.

'अकेला गया था?'

'हा साब ... अकेलाही देखता हुँ ।'

मी पुन्हा आत जाऊन रमझानभाईकडून इजाक आणि महंमदनं दिलेल्या माहितीची खात्री करुन घेतली. इजाक खरोखरचं रोज शेवटी जेवत असे. महंमद रोज आधीच जेवत असे पण आज तो खरोखरच पिक्चरला गेला असावा... पिक्चरला जाण्यासाठी त्यानं दुपारी रमझानभाईची परवनगीही घेतली होती.

रमझानभाईचा कोणावरही संशय नव्हता.

'अपघाती विषबाधा' म्हणून या प्रकरणाची नोंद झाली. जेवणात पालीचं किंवा एखाद्या कीटकाचं विष पडलं असावं. विषबाधेची केस असल्यामुळे आम्ही उरलेली वांग्याची भाजी आणि रोटी पंचनामा करुन ताब्यात घेतली आणि केमिकल ॲनालिसिसकरता पाठवून दिली.

केमिकल ॲनालिसिसचा रिपोर्ट मिळाला तेव्हा त्या उरलेल्या अन्नात विषाचा अंश मिळाला नाही.

तिस-याच दिवशी या अपघाती विषबाधेमुळे सलीमचा मृत्यु झाला. त्याची वृध्द आई मात्र वाचली. या केसमध्ये काहीतरी काळंबेरं असावं असा मला मात्र संशय येत होता. पण रमझानभाईचा कोणावरही संशय नव्हता. जर सलीमचा मृत्यू हा 'खून' असेल तर तो का केला असेल याचा मी विचार करता होतो. पण उत्तर सापडत नव्हतं. घरातला एकही पैसा चोरीला गेला नव्हता.

वास्तविक रमझानभाई हे तेवढया भागातले एक प्रतिष्ठित गृहस्थ होते. लोक स्वतःचे बचतीचे पैसे बँकेत न ठेवता रमझानभाईकडे ठेवायला देत. एवढा त्यांचा त्यांच्यावर विश्वास होता. लोकांकडून ठेवायला म्हणून रमझान भाईंनी जवळजवळ दोन लाख रुपये घेतले होते. पण ही दोन लाखांची रोकड त्यांच्या घरात सुरक्षित होती. सलीम हा त्या भागातला अतिशय लोकप्रिय तरुण होता. त्याचं कोणाशीही शत्रुत्व नव्हतं. ही विषबाधा कोणी 'मुद्दाम' केली असेल असा संशय घेण्यास जागा नव्हती.

त्यानंतर मी दोन-तीन दिवसांनी रमझानभाईच्या कोळशाच्या वखारीत गेलो तेव्हा त्यांचा जुना नोकर इजाक माझ्या जवळपास घोटाळत होता. त्याला काहीतरी बोलायचं असावं पण तो बोलत नसावा असं मला वाटत होतं.

'रमझानभाई, सलीम गेला हे फारच वाईट झालं. पण मला वाटतं हे कोणीतरी मुद्दाम केलंय.'

'नही साब, ऐसा नही है । खुदाकी मर्जी... और क्या?'

'या घटनेनंतर तुमच्या एरियातून कोणी माणूस गायब झाला आहे का?'

'नही तो....'

'महंमद कहाँ है?'

'पता नही, असेल इथेच कुठेतरी. सलीम गेल्यापासून ते पोरगं बेचैन आहे. गावाला जाईन म्हणतोय.'

'आता कुठे आहे.'

असेल इथेच... हा विसरलोच... मीच पाठवलंय त्याला. समोरच चार दुकानं सोडल्यावर अन्वरभाईचं कापडाचं दुकान आहे. तिथ एक हजार रुपये मागायला पाठवलय. येईल एवढयात.'

मी दहा एक मिनीटे महंमदची वाट पाहिली पण महंमद आला नाही. मी रमझानभाईच्या वखारीतून उठून बाहेर उभा राहिलो तेव्हा इजाक माझ्या पाठोपाठ आला.

'साब, सेठ के घर में आज दो लाख रुपये पडे है... लेकिन उस को हाथ नही लगाते.

'क्यों?'

'दूसरें की अमानत है न..... । लेकीन साब उस लडके की नियत ठीक नही है?'

'किस की?'

'महंमद की ।'

मग इजाकनं मला एक किस्सा सांगितला.

रमझानला हज यात्रेला जायचं होत. जाण्यापूर्वी ज्यांचे ज्यांचे पैसे ठेवायला घेतले होते त्यांचे परत द्यायचे

होते. सलीमला बरोबर घेऊन ते लोकांचे पैसे मोजत होते. बरोबर आहेत की नाहीत ते तपासून पाहात होते. नोकर इजाक आणि महंमद... दोघंही लांबून पाहात होते. तेव्हा महंमद इजाकच्या कानात म्हणला होता, 'सेठ के पास बहूत माल है यार ।' यावर इजाकनं त्याला खडसावलं होतं की, 'हे दुस-यांचे पैसे आहेत. सेठ स्वतः त्याला हात लावत नाही आणि असं दुस-याच्या पैशांकडे लालची नजरेनं पाहणं बरं नव्हे.' पण हे सांगितल्यावरही तो त्या पैशांकडे हाव-या नजरेनं पाहात राहिला होता. हे ऐकल्यावर मी ताबडतोब अन्वरभाईकडे गेलो. मी महंमद आला होता का विचारलं. अन्वरभाई हो म्हणाला.

'पैसे मागायला आला होता?'

'हो... त्याच्या शेठला पायजे होते ना. त्याचा शेठ म्हंजे लाख मानूस. नाय कसं म्हननार.. खरं म्हंजे साब एवढी रोकड ठेवत नाय.. पनं होते आज.

'किती मागितले होते?'

'वीस हजार.'

मी चमकलो. रमझानभाईनी एक हजारच रुपये मागायला पाठवले होते हे मला चांगलं आठवलं. मी पुन्हा रमझानभाईकडे आलो. त्यांनी तर खरोखरंच फक्त एक हजार रुपये आणायला महंमदला पाठवलं होतं.

मी वेगानं हालचाल करायला आता सुरुवात केली. मी रमझानभाईकडे त्यांच्या ओळखीच्या आणखी आठ-दहा व्यापा-यांची नावे घेतली आणि चौकशी केली. रमझानभाईचं नांव सांगून महंमदनं चार जणांकडून दहा-दहा, पंधरा-पंधरा हजार उचलले होते. आता महंमद पुन्हा वखारीत येणार नाही याची मला खात्री होती.

मी धडाधड महंमदच्या मित्रांशी संपर्क साधला पण महंमद कुठेही सापडेना. मी त्यांच्याविरुध्द विश्वासघाताचा गुन्हा नोंदविला. त्याच्या गावचा पत्ता मिळवला आणि पोलीस उत्तर प्रदेशच्या दिशेनं निघाले.

पोलीस तिथे पोहोचल्यावर थोडयाच वेळाने मला पोलीस स्टेशनला उत्तर प्रदेशमधून फोन आला. मला खात्री होती, महंमद मिळाला असणार.

'साहेब, राणे बोलतोय... तो पोरगा इथं नाही म्हणतात.'

'आख्खं गांव शोधलं?'

'हो साहेब.'

मी विचारात पडलो. अचानक एक युक्ती सुचली.

'राणे, घरच्यांच्या समोर आजच रात्री पोलीसपार्टी पुन्हा मुंबईला जातेय वगैरे आपापसात चर्चा करा. गाडीतसुध्दा बसा. पण पुढच्या स्टेशनला उतरुन पुन्हा मध्यरात्री धाड घाला.'

ही युक्ती उपयोगी पडली. पोलीस पार्टी मुंबईला निघून गेली असं समजून महंमद गाफील राहिला. अगदी स्वतःच्या घराच्या अंगणात खाटेवर झोपला असताना त्याला पकडला.

दुस-या दिवशी महंमद माझ्यासमोर होता.

'महंमद, ज्या दिवशी सलीमला आणि त्याच्या आईल विषबाधा झाली त्या दिवशी तू तिथे त्यांच्याबरोबर जेवला का नाहीस?'

महंमदला माझा हा प्रश्न अनपेक्षित होता. त्याला वाटलं होतं, मी विश्वासघाताच्या प्रकरणाविषयी विचारेन, तो गांगरला.

.. मग आठवायचा प्रयत्न करत म्हणाला,

'मै पिक्चर देखने गया था नंदी में ।'

'बांद्रा टॉकीजमें की नंदी में?'

तो पुन्हा गोंधळला.

'शायद बांद्रा टॉकीजमें ।'

'महंमद, नक्की सांग.. हे बघ कुठल्याही थिएटरबाहेर कितीतरी अर्धी फाडलेली तिकिटं पडलेली असतात. त्यापैकी एखादं तिकीट उचललं म्हणजे तो पिक्चर पाहिलास असं होत नाही. काय नाव होतं पिक्चरचं ?' पण त्याला नावही आठवेना.

'बरं ते जाऊ दे. त्याचं जेवणं तूच वाढलं होतंस?

'नाही'

'तू खोटं बोलतोस..वांग्याच्या भाजीच्या आणि रोटीच्या भांडयाच्या झाकणावर तुझ्या बोटांचे ठसे कसे काय?

वास्तविक असे काही ठसे मिळाले नव्हते. पण तो खात्रीपूर्वक नाकारतोय की काय ते मला पाहायचं होतं. तो मात्र आता घाबरला, पोलिसांना ठसे मिळालेले असतील असं त्याला वाटलं. आपण 'ट्रॅप' झालोय असं तो समजला.

'बोल, सलीमचा खून तू केलास की नाही?'

त्यानं नजर वर उचलली नाही.

'का केलास तू खून... का केलास?'

आणि मग त्याने गुन्हा कबुल केला. ज्या दोन लाख रुपयांसाठी त्यानं हे केलं ते पैसे मात्र तो चोरु शकला नाही. कारण रमझानभाई आणि इजाक त्या

दिवशी जेवलेच नाहीत. विषबाधेमुळे सलीम, त्याचे आई-वडील आणि इजाक हे बेशुध्द पडतील किंवा मरुन जातील आणि मग ते पैसे घेऊन आपण पळून जाऊ अशी त्याची योजना होती. रमझानभाई आणि इजाक न जेवल्यामुळे ती यशस्वी झाली नाही. आता पुराव्यांची जमवाजमव करायला हवी होती.

'तु विष कुठून आणलंस?'

महंमदनं तेही सांगितलं. बांद्रयाच्या तळयाजवळ तो एका ठिकाणी लघुशंकेसाठी जात असे. तिथं त्यानं एक दिवस एक धोत्र्याचं झुडूप पाहिलं. धोत्रयाच्या बिया कुस्करल्या तर जालीम विष तयार होतं हे त्याला माहीत होतं. तो आम्हांला त्या ठिकाणी घेवून गेला. आम्ही ते झुडूप ताब्यात घेतलं आणि केमिकल ॲनालिसिस करता पाठवलं.

पोलीस कोठडीत महंमद उताणा पडून छातीवर हात ठेवून छताकडे पाहात बसे. तो पश्चातापानं ग्रासला होता. त्यानं विश्वासघाताचेही सर्व गुन्हे कबूल केले. त्याच्यावर चार्जशीट लावण्यात आली आणि केस सत्र न्यायालयात कमिट झाली.

महंमदची रवानगी पोलीस कोठडीतून न्यायालयीन कोठडीत झाली.

एक केस पूर्ण झाल्याच्या समाधानात मी होतो. पण न्यायालयात साक्षीपुराव्यांच्या वेळी मला धक्काच बसला.

आरोपीच्या पिंज-यात उभा असलेला महंमद खुनाच्या आरोपाचा स्पष्ट इन्कार करत होता. धोत्र्याच्या बिया, ते झुडुप वगैरे पोलीसांनी 'बनवलेले' पुरावे आहेत असं त्यानं सांगितलं. आणि पोलीस काहीही करु शकत नव्हते. कारण उरलेल्या वांग्याच्या भाजीत आणि रोटीमध्ये विषाचा अंश सापडला नव्हता. आणि सुरुवातीला ही केस 'अपघाती विषबाधा' असावी असं गृहीत धरल्यामुळे मृताच्या पोटातून धुऊन काढलेला द्रव साठवून ठेवण्यात आला नव्हता. सत्र न्यायालयाला खात्री झाली होती की, सलीमच्या मृत्यूस महंमद कारणीभूत झाला होता पण -

पण महंमदच्या विरुध्द सबळ पुरावे नसल्यामुळे त्याला विश्वासघात केल्याच्या गुन्हयाबद्दलच फक्त सजा ठोठावण्यात आली. खुनाच्या आरोपातून तो सहीसलामत सुटला. त्याने रमझानभाईचाही विश्वासघात केला होता आणि पोलिसांचाही. पोलीस कोठडीत गुन्हा कबूल करणारा गुन्हेगार न्यायालयात गुन्हा नाकारतो, तेव्हा निराश व्हायला होतं. पण ही निराशा झटकून नव्या उमेदीनं नवी केस तर घ्यावीच लागते.

(नावे तसेच बिनमहत्वाचे तपशील काल्पनिक आहेत.)



निवृत्त पोलिस कमिशनर श्री. आर. डी. त्यागी (IPS) यांच्या समवेत

# पोस्टर

## मोठमोठया राजकीय तत्वप्रणालींचा टेंभा मिरवणारे हे राजकीय पक्ष या चुकलेल्या तरुणांना काही विधायक मार्ग का दाखवत नाहीत ? की त्यांना आपल्या शक्तिप्रदर्शनासाठी अशा बळी जाणा-या निगरगट्ट तरुणांची गरज असते?

(राष्ट्रपतीपदक विजेते सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विजय पेडणेकर यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित.)

पश्चिम उपनगरातल्या त्या पोलीस स्टेशनवर मी त्यावेळी निरीक्षक म्हणून डयुटीवर होतो. जूनच्या उत्तरार्धातली ती रात्र होती. पावसाची रिपरिप चालू होती आणि त्यामुळेच की काय, पोलीस स्टेशन शांत होतं. जुन्या प्रकरणांमध्ये काय काय प्रगती झाली आहे याचा फाइल्स चाळून मी अंदाज घेत होतो. एवढयात फोन खणखणला.

''साहेब हवालदार जाधव बोलतोय..स्टॅबिंग झालंय्. डी. एस. रोडवर.. उडीपी हॉटेलसमोर''

''जगण्याची शक्यता आहे का?''

''सीरीयस केस दिसते साहेब.''

''ताबडतोब हॉस्पिटलमध्ये हलवायचं बघा. मी येतोच.''

मी घडयाळात पाहिलं. सव्वाबारा झाले होते. मी ताबडतोब निघालो.

मी घटनास्थळी पोहोचलो तेव्हा जाधव काही माणसांच्या मदतीनं त्या इसमाला ॲम्ब्युलन्स मध्ये ठेवत होता. तो इसम काहीही बोलण्याच्या परिस्थितीत नव्हता. त्याच्या छातीवर डाव्या बाजूला बरीच खोलवर जखम झाली होती. मी ॲम्ब्युलन्स हॉस्पिटलकडे जाऊ दिली आणि तिथे हजर असलेल्या माणसांकडे वळलो. पण एकतर पावसाची रिपरिप होत असल्यामुळे माणसंच









रस्त्यावर कमी होती आणि पोलीस पार्टी आल्यावर बघ्यांचे जे होतं तेच इथेही होत होतं. जी थोडी माणंसं होती ती हळूच काढता पाय घेत निघून गेली. तरीही मी पटापट माझ्या बरोबरच्या हवालदारांना दोन-तीन माणसांना थांबवायला सांगितलं. तिघंजण थांबले. त्यातले दोघं तर भीतीनं थरथर कापत होते. त्यांना काही प्रश्न विचारल्यावर माझ्या लक्षात आलं की, खुनी इसम पळून गेल्यानंतर हे दोघं आले होते आणि त्यामुळे मला त्यांचा उपयोग होणार नव्हता.

मला तर प्रत्यक्ष घटना पाहणारा साक्षीदार हवा होता. आय विटनेस.

मी त्या दोघांनाही जाऊ दिलं आणि रात्री पाऊण वाजता आता निर्मनुष्य झालेल्या रस्त्यावर उरलेल्या त्या एकमेव माणसांवर माझं लक्ष केंद्रित केले.

समोरच्याच घरात राहणारा तो एक सतरा-अठरा वर्षाचा मुलगा होता.

''हं बोल रे ... अटॅक झाला त्याला ओळखतोस?'' तो काहीच बोलला नाही. खुळ्यासारखा बघत राहिला.

''साहेब...लफडं तर नाय होनार?''

''काहीही नाही... बिनधास्त बोल...ओळखतोस ना?''

''हो....त्यांचे नाव राजाराम, साहेब....राजाराम साळुंके''

''तो रोज इथे रस्त्यावर झोपतो''

''होय साहेब.''

''आज तो लवकर झोपला?''

''आज सगळेच लवकर झोपले होते. आजकाल पाऊस आसतो ना साहेब''

''बरं... तुझं नाव काय?''

''रमेश... रमेश पांचाळ.''

रमेशचा एफ.आय.आर. (प्राथमिक महिती अहवाल) मी रेकॉर्ड करुन घेतला आणि इंडियन पीनल कोडच्या कलम ३०७, R/W ३४ खाली गुन्हा नोंदवून घेतला.

आरोपी होते तीन अज्ञात इसम।

ज्या ठिकाणी गुन्हा घडला होता तिथे रक्तांचे डाग पडलेली एक चादर आणि एक फुटलेली सोडयाची बाटली मिळाली. पंचनाम्यात याची नोंद झाली. पंचानामा करुन मी हॉस्पिटलमध्ये आलो आणि आम्हांला ओपीडीचे डॉक्टरचं सामोरे आले.

''येस डॉक्टर...वाचला का?''

''सॉरी ... कलम ३०७ काढून ३०२ लावावं लागणार साहेब''

मी समजलो. राजाराम साळुंके या हल्ल्यात ठार झाला होता. आता ही खुनी हल्ल्याची केस न राहता खुनाची केस झाली होती. मयत राजाराम विषयी आधी जास्तीत जास्त माहिती मिळवणं क्रमप्राप्त होतं.

मी आजूबाजूला पाहिलं. हॉस्पिटलच्या पोर्चमध्ये ॲम्ब्युलन्सचा ड्रायव्हर आपल्या दोन मित्रांसह उभा होता. त्याला गणेश या नावानं हाक मारताना त्यांच्या या मित्रांना मी पाहिलं होतं. मी सुध्दा त्याला गणेशऽऽ नावाने हाक मारली. अपेक्षित परिणाम झाला होता. पोलीस इन्स्पेक्टर साहेबांनी नावानं हाक मारल्यामुळे 'गणेश सुखावला होता हे त्याच्या चेह-यावरुन समजत होतं. 'आलो रे'' असं मित्रांना सांगून तो माझ्याकडे आला.

'गणेश तू याच एरियातला..राजारामला ओळखत असशीलच.'

'ओळखणार कसा नाही साहेब. आमचा कार्यकर्ता होता तो..मोठा धडाडीचा कार्यकर्ता..साधासुधा चार आणे मेंबर नाही'

'इलेक्शनचं काम करायला राजाराम होता?'

'होता तर । उंच उंच जागांवर पोस्टर लावण्यात राजाराम एक नंबर होता. गेल्याच आठवडयात तर--'

आपण जास्त बोलतोय हे गणेशच्या लक्षात आलं पण आता मी त्याला सोडणार नव्हतो. मी त्याच्या खांद्यावर सलगीनं हात ठेवला आणि त्याला म्हणालो.

'गणेश, गेल्या आठवडयात काय झालं ते शांतपणे बसून सांग. चल आपण पोलीस स्टेशनवर जाऊ'

'सांगायला हरकत नाही साहेब. तसा मी काय डरपोक नाही, पण नाव आउट नाय केलं तर..'

'त्याची तू काळजी करु नकोस. ज्या पक्षाचा राजाराम होता त्याच पक्षाचा तू आहेत. तू आम्हांला मदत केली पाहिजेस. बरोबर?' मी त्याच्या डोळ्याला डोळा भिडवत म्हटलं.

मी मग गणेशचं स्टेटमेंट घेतलं. गेल्या आठवडयात काय झाले होतं ते गणेशनं सांगितले. निवडणुकीची पोस्टर्स लावण्यावरुन राजारामचा पक्ष आणि विरुध्द राजकीय पक्ष यांच्यात तुफान मारामारी झाली होती. राजाराम, त्याचा भाऊ विठ्ठल आणि इतर कार्यकर्त्यांनी विरुध्द राजकीय पक्षाच्या 'पोरांना'चांगलंच 'धुतलं' होतं. विशेषतः विरुध्द पार्टीच्या चंद्रकांत जगतापला.

'या चंद्रकांत जगतापलाच जास्त का धुतलं?'

'त्याला लई चरबी आहे साहेब.'

'गणेश काल ही घटना घडली तेव्हा तू कुठे होतास?'

'साहेब मी पक्षाच्या कार्यालयात झोपलो होतो. आरडा-ओरडा झाला म्हणून धावत आलो. तर स्टॅब करुन ते लोक पळून जाताना मी पाहिले. पण साहेब नीट दिसलं नाही. शप्पथ साहेब, नीट दिसलं नाही. नाहीतर आपल्याला सांगायला काय भिती वाटत नाही'

गणेश खंर बोलत असावा याविषयी मला शंका नव्हती. कारण तो आणि राजाराम एकाच राजकीय पक्षाचे कार्यकर्ते होते. राजारामचे खुनी पकडले जावेत, अशी त्यांची प्रामाणिक इच्छा असणारच, तरीही मी त्याला विचारलंच.

'त्या तिघांमध्ये चंद्रकांत जगताप नव्हता?'

'नीट दिसलं नाही साहेब..पण नसेल..ते तिघंही काही सेकंदातच दिसेनासे झाले.

पावसाची चिकचिक, काळोख आणि मी सुध्दा झोपेतूनच उठलो होतो'

'मग चंद्रकांत जगताप त्यांच्यात नसेल असं तू का म्हणालास?'

'चंद्रकांत चांगलाच लंबू आहे. सहा फूट तरी असेल. हया लोकांच्यात तेवढा लंबू कोणी नव्हता.'

'ठीक आहे गणेश. तू जा आता...'

गणेश निघून गेला. राजारामला भोसकणारे तिघेजण होते. रमेश पांचाळनंही या गोष्टीला दुजोरा दिला होता. गणेशच्या स्टेटमेंटप्रमाणे मुख्य संशयित चंद्रकांत जगताप होता. पण तो या तिघांच्यात नव्हता.

मग हे तिघं कोण होते? पण या तिघांपर्यंत पोहाचण्याचा मार्ग चंद्रकांत जगतापच्या घरातूनच जाईल. असा मला विश्वास वाटत होता.

मी चंद्रकांत जगतापच्या घरात प्रवेश केला तेव्हा चंद्रकांत घरात होता. आम्हांला पाहून तो किंचित चमकला, पण खुप घाबरला वगैरे नाही. त्याला आमचं येणं अपेक्षित तर नव्हतं?

चंद्रकांत खरोखरचं सहा फूट उंच होता. तो बारीक होता. पण त्याचे मसल्स चांगले टणक होते. तो व्यायाम करत असावा. त्यानं मिशा ठेवल्या होत्या. तो वीस-बावीस वर्षाचा असावा.

''चंद्रकांत, राजाराम साळुंकेच्या खुनाच्या बाबतीत आम्हांला तुला काही प्रश्न विचारायचेत''

''कोण राजाराम साळुंके?'' चंद्रकांतने साळसूदपणे विचारले.

''चंद्रकांत, उगाच वेड पांघरु नकोस तू त्याला ओळखतोस.''

''खरंच नाही ओळखत साहेब''

''गेल्या आठवडयात तुम्हांला ज्या लोकांनी..''

''रात्रीच्या वेळी काळोखात सात-आठजण आले होते साहेब. आम्ही नीट पाहिलसुध्दा नाही''

''पण त्याच्या आधी पोस्टर्स लावण्यावरुन जो झगडा झाला तो आठवतोय?'' चंद्रकांतन आता आठवल्यासारखं केलं.

''हां... त्यांच्यात एक राजाराम होता खरा. त्याचा मर्डर झाला होय.''

चंद्रकांत आपण त्या गावचाच नाही असं दाखवत होता. मी त्याचं घर न्याहाळत होतो. घरात बाई माणूस कोणी नसावं.

''तुझ्या घरी कोण कोण असतं?''

''मी एकटाच साहेब.''

माझं लक्ष समोरच खुंटीवर टांगलेल्या दोन पॅण्टस्कडे गेलं. एक लांबीला चांगली मोठी होती. ती चंद्रकांतची असेल. पण दुसरी कमी लांबीची पॅंट कोणाची असेल?

''ती दुसरी पॅण्ट कोणाची?''

माझ्या या अनपेक्षित प्रश्नानं चंद्रकांत दचकलाच.

''ती दुसरी पॅण्ट कोणाची?'' मी पुन्हा विचारलं.

''भावाची.''

''भाऊ कुठे आहे ?''

''बाहेर गेलाय्.''

''मग एकटाच राहतो'' असं खोटं का बोललास? मी जरा दरडावणीचाच सूर लावला.

''साहेब... म्हणजे... तसा मी एकटाच असतो. भाऊ कधी असतो कधी नसतो.''

''इथे नसतो तेव्हा कुठे असतो?''

''पक्ष कार्यालयात''

''काल मर्डर झाला तेव्हा तू कुठे होतास?''

''इथेच.''

''पुरावा?''

''माझे मित्र होते ना इथे।''

''कोण होते ते?''

''अरुण सावंत, उदय गोरे आणि श्याम शिर्के.''

''हे तिघे इथे का आले होते.''

''इथे पूजा होणार होती म्हणून बॅंन्जो पार्टीत वाजवायला मी त्यांना बोलावलं होते. पण पूजा कॅन्सल झाली म्हणून बॅंन्जो पार्टी कॅन्सल झाली. मग दीडशे रुपयांत पटवले. मग ते गेले''

''किती वाजता?''

''साडेबारा-एकला असेल साहेब.''

''ठीक आहे. हवालदार, त्या तिघांचे पत्ते लिहून घ्या.''

चंद्रकांतच्या घरातून आम्ही बाहेर पडलो. मी चंद्रकांतवर वॉच ठेवायला मात्र सांगितलं. संध्याकाळी ते तिघंजण माझ्यासमोर पोलीस स्टेशनवर बसले होते. अरुण सावंत, उदय गोरे आणि श्याम शिर्के. बॅंजो पार्टीत वाजवणारे ते कलाकार आहेत हे त्यांच्याकडे पाहिल्यावरच समजत होतं. अरुणनं केस भरपूर वाढवले होते. उदयनं पूर्ण टक्कल केलं होतं आणि श्यामचा मल्टिकलर शर्ट तो कलाकार असल्याची जाणीव करुन देत होता. पण ते तिघंही कसल्या तरी दडपणाखाली वाटत होते.

''तुम्हांला इथे का बोलावलं याची तुम्हांला कल्पना आहे?''

''नाही'' तिघांनीही नकारार्थी माना हलवल्या. पण त्यांना घाम फुटू लागला होता.

''एका केसच्या बाबतीत आम्हांला चंद्रकांत जगतापचे व्हेअर अबाउट्स चेक करायचे आहेत'' तिघंही गोंधळात पडले.

''काल रात्री अकरा ते एक वाजेपर्यंत चंद्रकांत तुमच्याबरोबर होता?''

''हो साहेब.''

''एवढा वेळ तुम्ही काय करत होतात''

''बॅंन्जो पार्टी कॅन्सल झाली... मग चंद्रकांतनं दीडशे रुपये दिले. म्हणाला, तुम्हांला खायला मागवा आणि जा.''

''मग खायचं आणायला तो स्वतः गेला?''

''नाही साहब... श्याम आणि उदय गेले. पंजाबी समोसे, ढोकळे, वडापाव वगैरे घेऊन आले.'' अरुण सावंत म्हणाला.

''मग?''

''आम्ही खाल्लं आणि दादरला परत गेलो.''

''एवढंच?''

''हो साहेब.''

ते तिघं काहीतरी लपवतं आहेत, असा मला संशय येत होता.

''दोन तास तुम्ही समोसे खात होतात?'' त्यांचे चेहरे गोरेमोरे झाले.

''हे बघा... खरं सांगा काय करत होतात तुम्ही?'' मी आवाज जरासा चढवला आणि श्याम पटकन म्हणाला.

''खात होतो म्हणजे. साहेब सुभाषनं व्हिस्की आणली होती, म्हणाला 'मारा थोडी थोडी......' मग घेतली.''

''सुभाष कोण?''

''सुभाष जगताप... चंद्रकांतचा भाऊ''

''तो सुध्दा तुमच्याबरोबर एवढा वेळ पीत होता'' तिघं उत्तर देण्याऐवजी गप्पच झाले. काय बोलावं काय बोलू नये याचा विचार ते करत असणार. मी त्यांना विश्वासात घेतलं. म्हटलं की काय झालं ते नीट सांगा आणि मग घाबरत घाबरत त्यांनी हकीकत सांगितली.

''समोसे वगैरे आणून हे तिघं आणि चंद्रकांत खात असतानाच चंद्रकांतचा भाऊ सुभाष आणि अशोक पाटील नावाचा मुलगा व्हिस्की घेऊन आले. दारुपार्टी सुरु झाली. मध्येच श्यामचा मल्टिकलर शर्ट खूप आवडतो, असे म्हणून अशोक पाटीलनं शर्टाची अदलाबदलही केली''

''साधारण बाराच्या सुमारास ते दोघं बाहेर जाऊन येतो म्हणाले आणि उठले. त्यांचे आणखी दोन मित्रही तेवढयात आले आणि ते सगळे निघून गेले. पाऊणच्या सुमारास अशोक पाटील घाईघाईनं परत आला. त्यानं श्यामचा शर्ट परत दिला आणि म्हणाला, आम्ही एकाला पोहाचवून आलोय. पोलीस केव्हाही येतील. तुम्ही ताबडतोब निघून जा''

सगळं सांगून झालं तेव्हा ते तिघंही थरथर कापत होते.

''नंतर आलेल्या त्या दोघांची नावं काय होती?'' मी शेवटचा प्रश्न विचारला.

''नरेश आणि पक्या अशा हाका मारल्याचं आठवतं साहेब, कारण नरेश एक पेग मार, पक्या तू मार, असा आग्रह सुभाष जगताप त्यांना करत होता.

या कलाकारांनी फारच महत्वाची माहिती दिली होती. आता आरोपी चार होते त्यांचे पत्ते आणि फोटो मिळायला त्रास पडला नाही. कारण हे सगळे राजकीय आणि सामाजिक (?) कार्यकर्ते होते.''

सुभाष जगताप, चंद्रकांत जगतापचा मोठ भाऊ पण त्याच्याहून बुटका... सरळ नाकाचा .. घा-या डोळ्याचा, वय २५, अशोक पाटील नेहमी पांढरे कपडे घालणारा, खून करताना मुद्दाम मल्टिकलर शर्ट उधार मागणारा, वय २१.

नरेश दरणे.. या आधीच्या स्टॅबिंग केसमध्ये हवा असलेला. दाढीसुध्दा पुरती न फुटलेला, गोरा, वय १९.

आणि प्रकाश राऊळ उर्फ पक्या, शिडशिडीत, काळा, मध्यम उंचीचा, वय २०.

चारही आरोपी फरारी घोषित. चंद्रकांत मात्र यामध्ये कुठेही फसलेला नव्हता. त्यामुळे तो मोकळाच होता. हे चारजणं कुठे लपले असतील ते शोधणं तसं कठीणच होते. त्यांचे जे जे संभाव्य अड्डे होते, तिथं पोलिसांनी धडका मारल्या. पण यश येत नव्हतं. सुरुवातीला तीन आरोपी नोंदवले होते. गणेश आणि रमेशनं दोघांनीही तिघांना पळताना पाहिलं होते. मग चौथा कुठे होता?

तो बहुधा पळण्यासाठी एखादं वाहन आणणार असेल असा तर्क बांधण्यास जागा होती.

आता माझ्यापुढे हेच एक मांठं आव्हान होत, फरारी आरोपींना शोधायचं कुठं?

चारही आरोपींना अनेक मित्र होते. या मित्रांकडून माहिती मिळाली. ते परेरा आंटीकडे दारु प्यायला जात असतं. परेरा आंटीकडे येणा-या माणसांवर मी वॉच ठेवला. पण एकही आरोपी चार दिवस तरी फिरकाला नाही. आरोपी आयडेंटीफाय झाले होते. पण सापडत मात्र नव्हते.

परेरा आंटीकडे एक नऊ वर्षाची पोरगी नोकरीला होती. तिचं नाव रेखा. रेखा चुणचुणीत होती आणि गि-हाईक तिची मस्करी करत टाईमपास करायचे.

मी सुध्दा गोड गोड बोलून या छोटया मुलीशी दोस्ती केली आणि तिला एका बाजूला घेऊन हळूच ते चार फोटो दाखवले तिनं पटकन त्या चौघांना ओळखलं.

''रेखा, नीट आठवं.... सात-आठ दिवसापूर्वी हे लोक आले होते?''

''आले होते सायेब.''

''काय बोलत होते?''

''सायेब लय हळूहळू बोलत होते, मी काय नाय आइकलं।''

''नीट आठव, बघ''

''हो कल्याण जाएंगे, कल्याण जाएंगे असे बोलत होते.'' एवढं मला पुरेसं होतं. कल्याणमधले प्रमुख बार आम्ही पिंजून काढले आणि दुस-याच दिवशी रात्री ९ वाजता सुभाष जगताप आणि अशोक पाटीलला अटक केली. मग नरेश आणि पक्या सापडायला वेळ लागला नाही.

सुभाषचे बोटाचे ठसे आणि खुनाच्या जागेच्या जरा पुढे असलेल्या सिग्नलच्या खांबावरचे रक्तातले ठसे तंतोतंत जुळले, अशोक पाटील, सुभाष आणि नरेशला दहा लोकांमधून रमेश पांचाळनं बरोबर ओळखलं. मयत राजारामचा भाऊ विठ्ठल यानं चंद्रकांत आणि सुभाष जगताप यांच्याविरुध्द आधीचं एन.सी. केल्यामुळे त्यांच्यातलं शत्रुत्वही सिध्द झालं. ज्या चाकूचे वार करण्यात आले तो चाकू शेवटी अशोक पाटीलनंच लपवलेल्या ठिकाणी नेऊन काढून दिला.

कोर्टात केसवर सुनावणी दरम्यान उलटसुलट चर्चा होऊन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली. निकालपत्रामध्ये न्यायाधीश महोदयांनी माझी भरपूर स्तुती केली होती. या प्रशंसेचा मला अभिमान निश्चित वाटला. पण.....

शिक्षा झालेले ते चारही कोवळे तरुण मी जेव्हा पाहिले तेव्हा मला वाटलं, मोठमोठया राजकीय तत्वप्रणालींचा टेंभा मिरवणारे हे राजकीय पक्ष या चुकलेल्या तरुणांना काही विधायक मार्ग का दाखवत नाहीत ? की त्यांना आपल्या शक्तिप्रदर्शनासाठी अशा बळी जाणा-या निगरगट्ट तरुणांची गरज असते?



सिने अभिनेता व खासदार श्री. सुनील दत्त यांच्याबरोबर हस्तांदोलन करताना

# चोरीचे चेक

**ब-याच लोकांना चेकवर आधीच सही करुन ठेवायची वाईट सवय असते. ही सवय केवढी घातक असते याची कल्पनाही त्यांना नसते.**

कथा रुपांतर - रवि भगवते

सकाळी अकराचा सुमार, नळबाजार सारख्या गर्दीच्या भागातल्या एका राष्ट्रीयकृत बँकेत नेहमीचीच वर्दळ होती. अनेक माणसं येत होती. काउंटर्सपाशी जात होती. कोणी पासबुक्समध्ये एन्ट्री करुन घेत होते, कोणी कॅश भरत होते, कोणी चेक्स भरत होते, कोणी पेमेन्ट्स घेत होते. ग्राहकांना 'अटेन्ड' करता करता क्लार्क मंडळींची धांदल उडत होती. ग्राहकही नेहमीचेच आणि क्लार्कही नेहमीचे त्यामुळे अगदी सहजगत्या सगळे व्यवहार होत होते. पाठी बसलेले अधिकारी सराईतपणे अनेक पेमेन्ट्स पास करत होते. पास करण्याआधी लेजर्सची पानं सराईतपणेच नजरेखालून घालत होते. आणि अशा वर्दळीतच काउंटर क्लार्कच्या हातात एक चेक आला. त्यानं चेक देणा-यानं मागे सही केली आहे का पाहिलं. तर सही केलेली होती. पण त्या सहीवरुन सही करणा-याच्या नावाचा अंदाज येत नव्हता. त्यानं चेक देणा-याकडे पाहिलं. तो एक एकवीस-बावीस वर्षाचा तरुण होता. त्यानं आपलं नांव आणि पत्ता लिहिला. लिहिताना तो पुटपुटला ''चेक तर बेअरर आहे मग हे सगळं कशाला?''

''कशाला म्हणजे? पैसे नेणा-याचं नांव आणि पत्ता बँकेकडे नको?'' क्लार्कनं खडसावलं. चेकची रक्कम खूप मोठी नव्हती. फक्त पंचवीस हजार. क्लार्कने चेक मागे अधिका-याकडे पाठवला. अधिकारी श्री. साठे हे एक अनुभवी अधिकारी होते. सहया पहाणं आणि त्या अस्सल आहेत का हे ठरवणं हे त्यांचं रोजचंच सरावाचं काम. साठयांनी सही पाहिली. त्यांना जणू त्यांच्या



'सिक्स्थ सेन्स' ला काहीतरी जाणवलं. त्यांनी त्या अकाउंट स्पेसिमन सिग्नेचरचे (नमुना सही) बाईंडर काढून पाहिले. चेकवरची सही आणि सिग्नेचर बाईंडरमधील नमुना सही यांच्यात साम्य होतं. पण चेकवरही सही सहज केल्यासारखी वाटत नव्हती. शिवाय एक दोन अक्षरांच्या स्वरुपात फरक वाटत होता. साठयांनी सिग्नेचर बाईंडरमधला खातेदाराचा फोन नंबर पाहिला, लक्षात ठेवला आणि ते क्लार्कला म्हणाले.

''मकरंद, मी जरा टॉयलेटला जाऊन येतो रे.'' चेकच्या मागे लिहिलेलं बेअररचं नावही त्यांनी लक्षात ठेवलं होतं. ते पहिल्या मजल्यावर आले आणि त्यांनी खातेदाराला फोन केला.

''मि. लकडावाला, आपने किसी अशोक राव को पेमेंट के लिए भेजा है?''

''नही ेतो, मै ऐसे किसी को नही जानता. दरअसल मैं अभी बँकमेंही आनेवाला था, मेरा चेकबुक चोरी हो गया है। स्टॉप पेमेंट देने के लिए मैं आ रहा हूँ।''

''ओ.के. थँक्स''

साठयांनी मग इंटरकॉमवरुन एका शिपायाला सूचना दिल्या आणि मुख्य दरवाजाचे कोलॅप्सिबल गेट धरुन बँकेचा वॉचमन उभा राहिला. काउंटरपाशी उभा असलेला अशोक राव हा तरुण आता पळून जाऊ शकला नसता. साठे पुन्हा खाली आले आणि आपल्या जागेवरच बसले. अशोक रावचा चेक त्यांनी पेमेंटसाठी पुढे ओढला आणि त्याचा टोकन नंबर पुकारला.

हातात टोकन घेऊन अशोक राव समोर उभा राहिला. त्याच्या डोळ्यात तरळलेली भीती साठयांना स्पष्ट दिसली.

''हा चेक तुला कोणी दिला?''

''लकडावालासेठनं''

''पण ते तर म्हणतात त्यांनी दिलेला नाही.''

आपण पकडले गेलोय हे अशोक रावच्या लक्षात आले. त्याने गेटकडे पाहिलं. जेमतेम एकच माणूस जाऊ शकेल एवढया जागेत बँकेचा वॉचमन उभा होता. पळून जाणं अशक्य होतं.

अशोक राव भितीनं गर्भगळीत झाला. तरीही तो सांगू लागला.

''मला लकडावाला सेठनं दिला. समोरच्या इराण्याच्या हॉटेलमध्ये.''

''आता तुला जे सांगायचं ते पोलिसांपुढे सांग.''

''प्लीऽऽज पोलिसांना सांगू नका..माझा यात काहीच दोष नाही.'' तो अगदी रडकुंडीला आला होता. पण साठयांनी ऐकलं नाही. त्यांनी पायधुणी पोलीस स्टेशनला फोन केला.

१९६८ साली मी पायुधणी पोलीस स्टेशन येथे पीएसआय म्हणून नेमणुकीस होतो. फोर्जड् सिग्नेचर (नकली सही) असलेला चेक देणारा एक मनुष्य आम्ही बँकेत बसवून ठेवला आहे. तरी त्वरित पोलिसांनी येऊन प्रकरणाचा ताबा घ्यावा असा फोन एका राष्ट्रीयकृत बँकेच्या व्यवस्थापकांनी केला. आम्ही ताबडतोब बँकेत आलो. चेक पास करणारे अधिकारी श्री. साठे यांच्यासमोर बसलेला एक गोरागोमटा एकवीस बावीस वर्षाचा तरुण मी पाहिला. तेव्हा हा तरुण गुन्हेगार प्रथमदर्शनीच वाटत नव्हता. आम्ही येताच श्री. साठे त्या तरुणाला घेऊन व्यवस्थापकाच्या केबिनमध्ये आले. व्यवस्थापक डिसूझा यांनी आमचं स्वागत केलं.

''नाव काय तुझं?''

''अशोक राव''

''चेक कोणी दिला?''

लकडावाला सेठ ने...

''तू त्यांच्याकडे काम करतोस का?''

''......''

''माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.''

''नाही.''

''मग तू त्यांना कसा ओळखतोस? तुमच्यात काय व्यवहार आहे?''

''त्यांनी चेक दिला. म्हणाले समोरच्या बँकेतून पैसे घेऊन ये.''

''लकडावालासेठ आहेत कसे? गोरे, काळे, जाडे, बारीक?''

''जाडे, गोरे आणि दाढीवाले''

एवढयात ''मे आय कम इन'' म्हणत एक गृहस्थ आत डोकावले.

'' आईये लकडावालासेठ'' असे साठयांनी म्हटले म्हणून मी वर पाहिलं तर अशोक रावने केलेल्या वर्णनाशी अजिबात न जुळणारं वर्णन असलेला हा गृहस्थ होता. लकडावाला बारीक अंगकाठीचे आणि सावळे होते. अशोक राव या तरुणाला ते ओळखतसुध्दा नव्हते. तोही त्यांना ओळखत नव्हता. चेकबुक चोरीला गेलं होतं आणि चेकवरची सही जरी लकडावालासारखी दिसत असली तरी ती लकडावालांची नव्हती.

फोर्जड् चेक देण्याच्या गुन्ह्याखाली मी अशोक रावला अटक केली. कारण तो रेडहॅण्डेड पकडला गेला होता.

अशोकचे कपडे व्यवस्थित होते. तो एखाद्या घरंदाज घराण्यातला वाटत होता.

त्याच्याविरुध्द केस तर उभी करायलाच हवी होती. पोलीस कस्टडीत असताना आम्ही त्याची अधिक चौकशी सुरु केली.

‘‘'तू राहतोस कुठे?’’

‘‘लॉजमध्ये?’’

‘‘मुंबईचा नाही का तू?’’

‘‘नाही. मुंबईत माझे घरच नाही.’’

‘‘घर कुठे आहे?’’

‘‘गोव्याला’’

‘‘वडील काय करतात?’’

‘‘डॉक्टर आहेत’’

‘‘शिक्षण?’’

‘‘बी.कॉम झालोय, नोकरी शोधतोय. त्यासाठीच मुंबईत आलो होतो.’’

अशोकला आम्ही बरेच प्रश्न विचारले. अशोकनं आपली कथा सांगायला सुरुवात केली.

‘‘माझे वडील गोव्यातले प्रख्यात डॉक्टर आहेत. माझी आई मी शाळेत सातवीत असताना वारली. आई गेल्यावर वर्षाच्या आतच माझ्या वडिलांनी दुसरं लग्न केलं. माझी सावत्र आई अतिशय देखणी होती पण बाहेरुन! तिचं मन मात्र काळं होतं. बाह्यरुप देखणं असल्यामुळे वडील तिच्या मुठीतच असत मला धाकटा भाऊ आणि बहिण आहे. आल्या दिवसापासून सावत्र आईनं आम्हां भावंडांचा छळ सुरु केला. पुरंस जेवण द्यायचं नाही. स्वस्तातले स्वस्त कपडे शिवायचे. एक सारखी घरातली कामं सांगायची. अभ्यास करुच द्यायची नाही आणि वडिलांकडे मात्र सतत तक्रार करायची की, ही मुलं अभ्यास करत नाहीत. मग वडील पुन्हा आम्हांला मारत आणि मग अभ्यासाला बसवत. आम्ही अभ्यास करावा असं वडिलांना मात्र मनापासून वाटते. सावत्र आई जवळपास नसताना ते आमचे लाडही करायचे. वडिलांचा ओलावा होता म्हणून माझं शिक्षण पूर्ण तरी झालं. माझं शिक्षण पूर्ण झाल्यावर आईचा जाच वाढला. सतत टोमणे मारत राहणं आणि घरातली जास्तीत जास्त काम सांगणं असं करुन तिनं मला हैराण करुन टाकलं. वडील एवढे मोठे डॉक्टर पण सावत्र आईपुढे त्यांचे काहीही चालत नसे. शेवटी मी घर सोडलं आणि नशीब काढण्यासाठी मुंबईत येऊन दाखल झालोय.. आज सकाळीच मी आलोय.’’

‘‘तुला लॉजमध्ये रहायला कसं परवडेल? पैसे आहेत तुझ्याकडे?’’

‘‘कॉलेजच्या वेळात वेळ काढून मी शिकवण्या केल्या. अर्थात सावत्र आईच्या आणि वडिलांच्या नकळत. ते पैसे मी साठवले. आज दोन हजार रुपये माझ्याकडे आहेत. मी जमा केलेत ते पोलीस स्टेशनला’’

अशोक खरं बोलत असावा असं आम्हांला वाटत होतं. आपली कहाणी सांगताना तो रडत होता. ते रडणंही खरं वाटत होतं. म्हंटल आता ‘चेक’च्या बाबतीत विचारुया.

‘‘बरं... आता सांग हा चेक तुझ्याकडे कसा आला?’’

‘‘आजच सकाळी मी गोव्याहून मुंबईला आलो. आल्यावर चहा घेण्यासाठी म्हणून बँकेच्या समोरच एक इराणी हॉटेल आहे. तिथे गेलो. एका टेबलावर एकटाच बसलो. आपलं पुढलं भवितव्य काय असेल? नोकरी मिळेल का? असे प्रश्न डोक्यात उद्‌भवत होते. ती काळजी माझ्या चेह-यावर स्पष्ट दिसली असावी. कारण माझ्या बाजूच्या टेबलाशी बसलेला एक गृहस्थ उठून माझ्याजवळ येऊन बसत म्हणाला, ‘‘तुम्ही खूप काळजीत दिसता, सुशिक्षित आणि घरंदाजही दिसता. मी तुम्हांला काही मदत करु शकतो का?’’

‘‘'मी मुंबईत नोकरी शोधायला आलोय. मला योग्य नोकरी मिळाली तर तीच खरी मदत ठरेल’’ मी म्हटलं. मग मी त्याला माझी कहाणी सांगितली. ती ऐकून त्याचेही डोळे पाणावले.

‘‘'तो माणूस दिसायला कसा होता?’’ मध्येच मी विचारलं.

अशोक राव पुढे सांगू लावला.

‘‘तो माणूस पांढरी पॅंट, पांढरा बुशशर्ट या वेषात होता. त्याच्या चपलाही शुभ्र पांढ-या होत्या. तो गोरा, जाडा आणि दाढीवाला होता. तो अतिशय श्रीमंत वाटत होता.’’ तो म्हणाला.

''माझं नाव इब्राहिम लकडावाला. माझा प्लायवुडचा मोठा बिझनेस आहे. खरं तर माझ्याच ऑफिसमध्ये मला एका कॉमर्स ग्रॅज्युएट क्लार्कची जरुर आहे. मी तुला महिना पाच हजार पगार देऊ शकतो.''

मी मनातल्या मनात भलताच खुश झालो होतो. केवढी सहजपणे मला नोकरी मिळत होती.

''पण माझी एक अट आहे. मला तुझ्या व्यवहार कुशलतेची आणि प्रामाणिकपणाची परीक्षा घ्यावी लागेल.''

माझ्या चेह-यावर प्रश्नचिन्ह उमटलं. लकडावाला माझी परीक्षा कोणत्या पध्दतीनं घेणार होता?

आमच्या दोघांसाठी लकडावालानं केक्स, पुडिंग असे पदार्थ मागवले. मग त्यानं आपली ब्रिफकेस उघडली आणि त्यातून एक चेकबुक काढलं. त्यातला एक चेक त्यानं फाडला आणि मला दिला.

''हा पंचवीस हजाराचा चेक आहे. समोरच्या बँकेत माझं खातं आहे. तू या बेअरर चेकचे पैसे घेऊन ये. मी इथेच या हॉटेलमध्ये बसतो. मला तीन-चार महत्वाचे फोन करायचेत ते करुन मी पुन्हा हॉटेलमध्ये येऊन बसतो.''

लकडावालानं माझ्यावर टाकलेल्या विश्वासामुळे मी हेलावून गेलो होतो. लकडावालानं लांबून मला बँकेची ब्रँचही दाखवली. मी बँकेत शिरलो... बँकेत कसला? मला बदनाम करणा-या एका सापळ्यात अडकलो.

अशोक रावची कथा इथे संपत होती. आम्ही त्याच्या वडिलांचा गोव्याचा पत्ता लिहून घेतला आणि त्यांना एक सविस्तर पत्र पाठवलं. एक तारही केली. एका सुशिक्षित तरुणाला एका चेक, फोर्जरी करणा-या सराईत गुन्हेगारांन बहुधा फसवलं असावं. स्वतःला 'लकडावाला' म्हणून घेणारा हा जाडा, गोरा, दाढीवाला शुभ्र कपडे परिधान करणारा मनुष्यच खरा गुन्हेगार असणार, असा आमचा तर्क होता. तसा माणूस शोधण्याचा आम्ही प्रयत्न केला. पायधुणी, नळबाजार, भेंडीबाजार विभागात जाडा, गोरा, दाढीवाला हे वर्णन असलेल्या असंख्य व्यक्ती आहेत. त्यातला एखादा शोधणं म्हणजे महाकठीण. कारण या विभागात बहुसंख्यंने असलेल्या मुस्लीम समाजात अशा वर्णनाची माणसं अनेक असतात. तशा वर्णनाचा एकही माणूस आम्हांला संशयास्पदरीत्या फिरताना दिसला नाही. अशोक राव पकडला गेल्याचं समजताच तो इसम फरारी झाला असणार याचा तर्क मी बांधला. खरा गुन्हेगार हा माणून असला तरी प्रत्यक्ष गुन्हा करताना अशोक रावच पकडला गेला असल्यामुळे त्याला अटक करणं हे तर क्रमप्राप्त कर्तव्य होते. त्याला अटक करुन पोलीस लॉकअपमध्ये टाकण्याची सूचना मी दिली.

पोलीस लॉकअप मध्ये टाकण्याआधी गुन्हेगारांची अंगझडती घेतली जाते. तशी ती अशोक रावची घेतली गेली आणि इथे आम्हांला आश्चर्य वाटेल असं घडलं.

त्यांच्या मोज्यामध्ये चारशे रुपये सापडले.

भोळेपणाचा मूर्तिमंत पुतळा वाटू शकेल असा हा सुशिक्षित तरुण मोज्यात पैसे लपवतो हे विसंगत होत.

त्याला याबाबतीत विचारलं तर तो म्हणाला.

''नवख्या शहरात आलो. मी स्वतः नवखा. पाकिट वगैरे मारले तर पैसे असावेत म्हणून मोज्यात ठेवले.''

त्याचं स्पष्टीकरण पटण्यासारखं असलं तरी एक विचार मनात येत राहिला. 'हा पोरगा वाटतो तेवढा भोळा नक्कीच नाही.'

दुस-या दिवशी अशोकला रिमांडसाठी कोर्टात उभं केलं. तेव्हा आम्हांला दुसरा आश्चर्याचा धक्का बसला.

अशोकची बाजू मांडणारा एक हुशार, तरतरीत वकील त्याच्यासाठी परस्पर न्यायालयीन कोठडी मागत होता. या ॲडव्होकेट गावंडला मी याआधी या कोर्टात कधीही पाहिलं नव्हतं. ज्या पध्दतीनं तो अशोकची बाजू मांडत होता ते पाहिल्यावर हा

ॲडव्होकेट गावंडसुध्दा अशा प्रकारच्या अनेक केसेस हाताळलेला एक निष्णांत वकील आहे, हे लक्षात येत होतं. अशोकला परस्पर न्यायालयीन कोठडीत तर त्यानं घेतलंच, शिवाय तीन हजार रुपयांच्या जामिनावर मुक्त केलं.

कोर्टाच्या कॉरिडॉरमध्ये मी या ॲडव्होकेट गावंडला गाठून विचाले ''ईफ यू डोंट माइंड, तुम्हांला केस कोणी दिली ते सांगू शकाल?'' गालातल्या गालात छद्‌मी हसत ॲडव्होकेट गावंड उत्तरला.

''डॉ. रावांनी... अशोकच्या वडिलांनी'' आणि तो निघून गेला.

मी पुन्हा पोलीस ठाण्यात आलो. काल गोव्याला जी तार केली होती ती पत्ता खोटा असल्यामुळे पोहोचलीच नसल्याचं कळलं होतं.

म्हणजे अशोकच्या तथाकथित वडिलांना डॉ. रावांना तर अजून प्रकरणाची माहिती कळलीच नव्हती.

दुस-या दिवशी डॉ. रावना लिहिलेलं सविस्तर पत्रही पत्ता खोटा असल्यामुळे परत आले. म्हणजे अशोक राव हा भोळाभाबडा, निरागस वगैरे नव्हता. त्यानं सांगितलेली कहाणी कपोलकल्पित होती. बेमालूम अभिनयानं त्यानं फसवलं होतं. तो एखाद्या टोळीचा सभासद असावा, कारण कपोलकल्पित हृदयद्रावक कहाणी सांगून त्यानं पोलिसांना गाफील ठेवले आणि अचानक एक निष्णात वकील कोर्टात पाठवून स्वतःची सुटका करुन घेतली.

आम्ही त्यांच्या अंगुलीमुद्रा तर घेतल्याच होत्या. एका स्पेशल शिपायाबरोबर त्या पाठवून M.O.B. मधून त्याचा रिपोर्ट मागवला आणि हा रिपोर्टही धक्कादायक होता.

'अशोक राव' हा दुसरा तिसरा कोणीही नसून खोटे चेक वटवण्यात निष्णात असलेला दिनेश कुलकर्णी नावाचा कुप्रसिध्द गुन्हेगार होता. कुविख्यात सद्रुद्‌दीन नसाअल्ली यांच्या गॅंगमधला तो एक महत्वाचा सभासद होता.

कोर्टातून जामिनावर सुटलेला दिनेश तपासासाठी पुन्हा कधीच उपलब्ध झाला नाही. आम्ही त्याच्या अभावी जो काही गुन्ह्याचा तपास केला होता तो पूर्ण करुन केस अ-वर्ग म्हणून बंद केली.

रक्ताची चटक लागलेला वाघ नवीन नवीन भक्ष्य शोधतच राहतो. तसाच फसवणुकीची सवय लागलेला आणि कमीत कमी श्रमात जातीत जास्त पैसे मिळवायची सवय लागलेला गुन्हेगार पुन्हा पुन्हा गुन्हे करीतच राहतो.

दिनेश कुलकर्णीही स्वस्थ बसणारा नव्हता. दिनेश कुलकर्णीचा फोटो आम्ही सगळ्याच बॅंकांना पाठवला होता. त्यांच्या फोटोसकट बॅंकांनी आपापल्या सगळ्या शाखांना तशा प्रकारची परिपत्रक पाठवून सावध केलेलंच होतं.

पण अशा प्रकारची स्टेप पोलीस घेतील हेही दिनेश कुलकर्णीला माहीत असावं.

एक दिवस सामान्य शाखा, क्राईम ब्रॅंचचे फौजदार भास्करराव चौधरी यांना एका बॅंकेतून फोन आला की, एका संशयास्पद खातेदाराला बॅंकेत बसवून ठेवलं असून, पोलिसांनी चौकशीला यावं, कारण या खातेदारानं आपल्या खात्यात भरलेला तीस हजारांचा चेक सिग्नेचर फोर्जड् असल्यामुळे परत आला आहे. चेक रिटर्न करणा-या बॅंकेतील अधिका-यानं चेक जमा करणा-या बॅंकेतील अधिका-याला मुद्‌दाम फोन करुन आपला संशय व्यक्त केला होता. कारण नुसती 'सही जुळत नाही' या कारणास्तव रिटर्न होणारे अनेक चेक्स असतात.

भास्कररावांचा या क्षेत्रातला अनुभव मोठा. त्यांनी आपल्या पोलीस खात्यातील नोकरीचा तीन चतुर्थांशपेक्षाही जास्त काळ अशा त-हेचे म्हणजे खोटे चेक्स, खोटे दस्तावेज असलेले गुन्हे शोधण्यात घालवला. फोर्जड् चेक डिपॉझिट करणा-या खातेदाराचा अकाउंट ओपनिंग फॉर्म जेव्हा त्यांनी पाहिला तेव्हा त्यांना ते हस्ताक्षर कुठे तरी पाहिल्यासारखं वाटलं.

त्यांचा अंदाज खरा ठरला. दिनेश कुलकर्णीने आतापर्यंत दिलेल्या फोर्जड् चेक्सवरच हस्ताक्षर या अकाउंट ओपनिंग फॉर्मवरच्या हस्ताक्षरांशी जुळणारे होते. तो खातेदार त्यांच्याच टोळीतला होता.

या खातेदाराला 'बोलतं' करायला फार वेळ लागला नाही. दिनेश कुलकर्णीचा ठावठिकाणा पोलिसांना समजला आणि जवळच्याच लॉजमध्ये आरामात बसलेल्या अशोक राव उर्फ दिनेश कुलकर्णीला पोलिसांनी अत्यंत सहजगत्या पकडलं. आता मात्र तो निरागस, भोळाभाबडा वाटत नव्हता. अजूनपर्यंत त्यानं न सांगितलेला एक प्रश्न मी त्याला विचारला.

''इब्राहिम लकडावालांचे चेकबुक तुला कसं मिळालं आणि त्यांची सही तुला कशी समजली''

दिनेश कुलकर्णीने आधी सांगावं, न सांगावं असा विचार केला आणि म्हणाला,''ते मला रस्त्यात पडलेलं मिळाले आणि त्या मुर्ख माणसानं पहिल्या चेकवर आधीच सही करुन ठेवली होती.''

''मग तू तोच चेक का नाही वटवलास?''

''रस्त्यातल्या पाण्यात चेकबुक पडल्यामुळे सुरुवातीचे चार-पाच चेक्स खराब झाले होते, सही व्यवस्थित होती.''

ब-याच लोकांना चेकवर आधीच सही करुन ठेवायची वाईट सवय असते. ही सवय केवढी घातक असते याची त्यांना कल्पनाही नसते.

दिनेश कुलकर्णीला आता मात्र सुटता आलं नाही. निरनिराळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या अठरा गुन्ह्यामध्ये त्याचा सहभाग असल्याचं उघडकीस आलं आणि त्याच्यावरचा गुन्हा सिध्द होऊन त्याला तुरुंगाची हवा खात बसावं लागलं .



# दागिन्यांची चोरी

## एका उच्चविद्याविभूषित मुलीला कौटूंबिक रहाटगाडयात तिच्या इच्छेविरुध्द डांबून ठेवणं म्हणजे एक अप्रत्यक्ष गुन्हा आहे. ज्यामुळे तिला चोरी करावीशी वाटली.

(राष्ट्रपतीपदक विजेते सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विजय पेडणेकर यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित.)

एकोणीसशे पंच्याहत्तर सालची गोष्ट. मी त्यावेळी वरळी पोलीस ठाण्यात गुन्हे प्रकटीकरण विभागात पोलीस उप-निरीक्षक होतो.

वरळी सी फेसजवळ हंस अपार्टमेंटस् म्हणून एक उच्चभ्रू लोकांची टाउनशिप होती. एकोणीस मजल्यांच्या ७ ते ८ इमारतींमधून राहणा-या या व्यापारी कारखानदारांमध्ये बहुसंख्य लोक सिंधी होते. त्यापैकीच एक केशवानी कुटूंब.

केशवानी कुटूंबाचा पोलिसांशी संबंध आला तो त्यांच्या घरात झालेल्या सहा लाख रुपयांच्या दागिन्यांच्या चोरीमुळे.

चोरीची वर्दी त्या दिवशी संध्याकाळी पाचच्या सुमारास आली. आम्ही आमच्या लवाजम्यासह तात्काळ घटनास्थळी पोहोचलो. निघण्यापूर्वी सगळ्या वस्तु जशाच्या जशा ठेवण्याच्या सूचना आम्ही त्यांना फोनवरच दिल्या होत्या.

केशवानींचं घर अत्यंत सुंदर पध्दतीनं सजवलेले होतं. एखाद्या बडया इंटिरीअर डेकोरेटरनं त्या गृहसजावटीचं डिझाइन केलं असणार याची आत पाऊल टाकताच खात्री पटत होती. आम्ही आत शिरलो तेव्हा एखादा माणूस गेल्यावर शोक करायला बसावं तशी एक वृध्द म्हणजे साधारण साठीची स्त्री मधोमध खाली मान घालून बसली होती. आणि तिच्याभोवती पाच-सहा जण उभे होते. ती स्त्री बहुधा मालकीण असावी असा अंदाज आम्ही बांधला. आम्ही येताच तीसुध्दा उभी राहिली.

''आपको कब मालूम पडा की चोरी हुई है?''

''अभी मालूम पडा. मैं बाहरसे आयी. सत्संग में गयी थी... देखा तो दरवाजा खुला था...मुझे लगा बहु आयी होगी... लेकिन अंदर आके देखा तो घर में कोई नही था..बस यह कबोर्ड खुला था...'' आणि ती रडायला लागली.

''देखो बेटा..हम लोक लूट गये.''

''किसी ने कुछ चीज हिलायी तो नही ?''

''नही बेटा.''

आम्ही दरवाजचं लॉक न्याहाळलं. लॉक तोडलेलं नव्हतं. बहुतेक डयुप्लिकेट चावीन किंवा मास्टर की नं उघडलं होत. आतल्या वस्तु व्यवस्थित होत्या. साधी बेडवरची चादरसुध्दा अगदी नीट अंथरलेली होती. घरात तीन कपाट होती. ज्या कपाटाकडे त्या मालकिणीनं बोट दाखवलं होतं ते उघडं होतं. दुसरी दोन कपाटं बंद होती.

''इन दो कपबोर्डो में भी गहने रहते है?''



''नही...सिर्फ उस खुले कपबोर्ड में.''

त्या उघडया कपाटांच्या लॉकच निरीक्षण केलं. तिथेही कोणत्याही प्रकारची झटापट केलेली दिसत नव्हती.

म्हणजे ते कपाटही डयुप्लिकेट चावीनं उघडलेलं होते आणि ज्या दोन कपाटात दागिने नव्हते. त्यांना हातही लावण्यात आला नव्हता.

कुठल्या कपाटात दागिने असतात ते चोराला माहित होतं. म्हणजे हे काम नक्कीच एखाद्या माहितगार माणसाचं होतं. माझी नजर झर्रकन तिथे हजर असलेल्या माणसांवरुन फिरली. ते कोणकोण आहे याची चौकशी करणं क्रमप्राप्त होतं.

''मॉंजी, आपके घर में किंतने मेंबर्स है?'' मी विचारलं.

''मैं, मेरा बेटा नीलेश और मेरी बहु पूनम...''

''बहुऽऽ जरा आगे आओ तो बेटा..''

तिथे हजर असलेल्यापैकी डोक्यावरुन पदर घेतलेली एक स्त्री पुढे आली.

''हमारे खानदान में बडों के सामने या पराये लोगों के सामने घूंघट लेते है।''

ती तशीच उभी राहिली. पदराआडून तिचा चेहरा ओझरता दिसत होता. ती अतिशय सुंदर असावी.

''आप भी दोपहर को बाहर गयी थी ?''

''यस सर। मी सकाळी अकराच्या सुमारास बाहेर पडले होते. चार वाजता परत आले, तर सासूबाई नर्व्हस होऊन बसल्या होत्या.''

आश्चर्य म्हणजे डोक्यावरुन पदर घेतलेली ती सून हे शुध्द सफाईदार इंग्रजीतच म्हणाली. ती इंग्रजी माध्यमात शिकलेली असावी.

''याने, मॉंजी जाने के बाद।''

''नही.... पहले.... और मॉंजी आने के बाद मैं वापस आ गयी।''

सकाळी अकरा वाजता सून तिच्या माहेरी गेली. त्यानंतर सासू सत्संगात भजनकीर्तनाला गेली. साडेतीनच्या सुमारास सासू परत आली. तेव्हा दागिन्यांच कपाट उघडलेलं होतं आणि दागिने पळवलेले होते. चारच्या सुमारास सूनही परत आली होती. म्हणजे साडेअकरा ते तीन या मधल्या वेळात डुप्लिकेट चावीनं दार उघडून कोणीतरी हा कारभार केला होता.

तिथे हजर असलेल्या तरुण माणसाकडे माझं लक्ष गेलं. चोरीची वर्दी द्यायला. हाच आला होता. घरात तो सहजपणे वावरत होता. तो त्या बाईचा मुलगा असावा असे समजून मी विचारलं.

''आपका नाम नीलेश है?''

''नही, नीलेश तो इनका बेटा मै। मैं निलेश का दोस्त हूँ अनिल मीरचंदानी.''

माझ्याशी हस्तांदोलन करत तो म्हणाला. मी त्याला काही प्रश्न विचारले. तो हंस अपार्टमेंटमध्येच राहणारा होता. नीलेशची आणि त्याची शाळेपासूनची मैत्री होती. आज प्रकृती ठीक नसल्यामुळे तो आपल्या कपडाच्या दुकानातून लवकर घरी आला होता. ताप आल्यासारखं त्याला वाटत होत. मॉंजीनं त्याला चोरी झाल्याचं सर्वप्रथम कळवलं. पोलिसात तक्रार करावी हा निर्णय त्यानंच नीलेशशी फॅक्टरीत फोन करुन चर्चा केल्यानंतर घेतला. नीलेशही घरी यायला निघाला होता आणि कोणत्याही क्षणी येऊ शकत होता. अनिल हा स्मार्ट, अत्याधुनिक राहणी असलेला तरुण होता. मी त्याला धंदा कसा चाललाय असं विचारलं तेव्हा 'मंदी आहे, मोठया मुश्किलीनं चालवतो आहे', असे तो म्हणाला.

एवढयात आतल्या खोलीतून लहान मुलाच्या रडण्याचा आवाज आला. मूल चांगल मोठ्ठयानं रडत होतं. पण घ्यायला कोणीच जाईना.

मॉंजी म्हणाल्या,'बहूऽऽ जा ले उसे' सून तिथेच उभी राहिली.

''जाऽऽ ले उसे, बच्ची रो रही है ना?''

सून गेली. मुलीचे लाड करण्याऐवजी ती तिच्यावर वैतागली.

''चूप..चूप..नहीं तो मैं मारुंगी..I will beat you .. . चूप..चूप.. अभी चूप रहती है या.. '' पण मुलगी आणखी रडू लागली. शेवटी मॉंजी गेल्या आणि त्यांनी लाडेलाडे बोलून त्या मुलीला शांत केलं आणि बाहेर आणलं.

वर्षभराची ती गोड मुलगी होती. सुनेचं ते वागणं मला काही आवडलं नाही.

मुलीच्या रडण्यामुळे अर्धवट राहिलेलं संभाषण अपूर्ण राहिल्यामुळे मी पुन्हा अनिल मीरचंदानीकडे वळलो.

''याच कपाटात दागिने होते हे तुला माहीत होते?' मी अनिलला हा प्रश्न विचारल्यावर तो हसला.

''म्हंजे तुमी पुलिसवाले माझ्यावरच डाऊट खाणार,'' तो मोडक्या तोडक्या मराठीत म्हणाला. ''पण खरा सांगायचा तर साहेब, मला माहीत होतां. आज १७-२० वर्ष मी घरात येतो. मला माहीत होता. पन माहीत होता म्हंजे मी चोरले असतील असं जर...''

''चूप कर, तुझपे कौन डाउट लेगा? मॉंजी म्हणाल्या.''

''यह तो मुझे मेरे नीलेश जैसा है।''

मी आता माझा मोहरा तिथे आलेल्या एका मध्यमवर्गीय जोडप्याकडे वळवला. हे रोहिरा पती-पत्नी शेजारच्याच फ्लॅटमध्ये राहत होते. केशवानी कुटूंबाचा त्यांच्यावर गाढ विश्वास त्यामुळे केशवानींची घराची चावी रोहिरांकडे आणि रोहिरांची केशवानीकडे असे. केशवानींची चावी आपल्याकडे असते हे सांगितल्यावर मिसेस रोहिरा जरा घाबरल्यासारखी वाटली. पण पोलीस आपल्यावर उगाचच संशय तर घेणार नाहीत अशी भीती वाटल्यामुळेही हे घाबरणं शक्य असतं. रोहिरांना प्रश्न करताना एक गोष्ट समजली. सून आणि सासू ब-याचदा दुपारी बाहेर जात आणि त्यावेळी धुणी-भांडीला असलेली सुमन ही कामवाली रोहिरांकडून चावी घेऊन केशवानीचं घर उघडत असे. धुणी-भांडी झाल्यावर पुन्हा चावी देऊन निघून जात असे. पण आज या सुमननं दांडी मारली होती. केशवानींकडे स्वयंपाकालाही एक मणिबेन नावाची गुजराती बाई होती. पण ती सकाळी आणि संध्याकाळी मॉंजी असतानाच येऊन जात असे. त्यामुळे तिच्यावर संशय घेण्यास जागा नव्हती.

मी ताबडतोब अंगुली मुद्रा तपासनिसाना पाचारण केलं. मॉंजींना खात्रीपुर्वक सांगितलं की, मी त्यांचे दागिने परत मिळवेन आणि चोरांला सजा मिळेल. फिंगर प्रिंटस् एक्सपर्टस् येण्याआगेदर मी अनिलशी, रोहिरांशी आणखी गप्पा मारल्या. सून पुनम मात्र गप्पात सामील होत नव्हती. ती डोक्यावरुन पदर घेऊन एका कोप-यात अवघडल्यासारखी उभी होती.

एवढयात एक देखणा तरुण आत आला. मी अंदाज केला हाच नीलेश असावा. तो अतिशय शांतपणे आत आला.

''बेटा... यह मेरा बेटा नीलेश आया.'' मॉंजी म्हणाल्या.

''हॅलो...'' मी त्याच्याशी हस्तांदोलन करुन म्हणालो.

''हॅलो इन्स्पेक्टरसाहेब. जरा एका बाजूला या.''

मी त्याच्याबरोबर एका बाजूला गेलो. इथून कोणीही आमचं संभाषण ऐकू शकतं नव्हतं.

''साहेब,'' माझ्या नजरेला नजर भिडवत तो शांतपणे म्हणाला,''सहा लाख ही माझ्या दृष्टीनं मोठी रक्कम नाही. तसेच जास्त नाही, पण महिन्याला लाखभर कमवतो मी. पण तरीही तुम्ही प्रयत्नांची शिकस्त करा. गुन्हेगार कोणीही असो, त्याला सजा झालीच पाहिजे. माझ्या घरात चोरी?... जो कोणी चोर असेल त्याला सोडणार नाही मी.''

''तुला कोणावर संशय आहे?''

''नाही.'' मग थोडासा हसत तो म्हणाला.

''चोर शोधणं हे तुमचं काम आहे. तुम्हांला काय वाटतं?''

''आम्हांला वाटतं की हे एखाद्या माहीतगार माणसाचं काम आहे.''

''तुम्हाला जी काही मदत लागेल ती मी देईन.''

''मग ठीक आहे''

त्याच्या आणखी जवळ जाऊन आणि त्याला विश्वासात घेत मी विचारलं. या रोहिरांविषयी तुझं काय मत आहे?''

''रोहिरा असं करणं अशक्य आहे..'' मग थांबून विचार करत तो म्हणाला, ''पण काय सांगावं? कोणाची नियत कधी फिरेल?''

''अनिलचीही फिरु शकते?''

''नाही. I don't think.''

''मग रोहिरांच्या बाबतीत तुला असं का वाटतं?''

''कारण रविवारी मी घरी असताना ब-याचदा माझ्या आईनं नविन केलेला दागिना मिसेस रोहिराला दाखवलाय. प्रत्येक वेळी मिसेस रोहिराचे डोळे हे एवढे मोठे व्हायचे. मला वाटतं मिस्टर रोहिरा मिसेस रोहिरांसाठी कधी दागिने घेत नाहीत. त्याचा सोन्यात पैसे घालवण्यावर विश्वास नाही.''

नीलेश हा विश्वासात घेण्यासारखा माणूस होता. मराठी तो फारच शुध्द बोलत होता. शेवटी मी त्याविषयी विचारलंच.

''माझे दोन खास मित्र मराठी आहेत आणि त्यांच्या घरी माझं लहानपणापासून जाणं येणं आहे.''

एवढयात फिंगर प्रिंटस् एक्सपर्ट आले. दरवाजे, दरवाजाचं हॅण्डल, कपाटाची दारं, हॅंडल्स, अनेक ठिकाणचे ठसे घेण्यात आले. तिथे उपस्थित असलेल्या सगळ्यांचे ठसेही घेण्यात आले.

कामवाल्या सुमनला पोलीस स्टेशनला बोलावण्याचा निरोप ठेवला. कारण तिचा घरचा पत्ता कोणालाच माहीत नव्हता. आम्ही तिथून निघालो.

अशा प्रकारच्या चो-या ब-याचदा नोकर माणसं करतात आणि फरारी होतात. असा अनुभव असल्यामुळे कामवाल्या सुमनला ताबडतोब गाठणं जरुरीचं होतं. आम्ही त्या इमारतीच्या कंपाऊंडमध्ये आलो तेव्हा एक कामवाली आत येताना पाहिली.

''ए बाई, तूच सुमन का?''

''न्हाय... मी केशर.. सुमन न्हाय आली आज''

''काय झालं तिला?''

''तिची तब्येत बरी न्हाय''

''चल तिचं घर दाखव..बस गाडीत''

''केशरबरोबर आम्ही जवळच्याच एका झोपडपट्टीत गेलो. बोळाबोळातून उभे आडवे फिरत. केशर आम्हांला एका झोपडीजवळ घेऊन आली.

पण त्या झोपडीच्या दाराला कुलूप होतं.

कुलूप पाहून केशरलाही आश्चर्य वाटलं.

''सकाळी तर होती.'' ती म्हणाली. शेजारच्या झोपडीत चौकशी केल्यावर समजलं की सुमन आणि तिचा आजारी नवरा दोघंही जनरल हॉस्पिटलमध्ये दवापाण्यासाठी गेलेत. आम्ही केशरला बरोबर घेऊन पोद्दार हॉस्पिटलच्या ओपीडीत पाहिलं. के.ई.एम., वाडिया वगैरे परळ एरियातल्या हॉस्पिटलच्या ओपीडीतही पाहिलं, पण सुमन सापडली नाही. ही फरारी तर झाली नाही? संशय येऊ नये म्हणून आज दांडी मारायची आणि रोहिरांकडच्या चावीची आधीच डुप्लिकेट चावी बनवून घेऊन गुपचूप येऊन चोरी करायची असा तर हिचा बेत नसेल?

सुमनचा थांगपत्ता न लागल्यानं तिच्यावरचा संशय बळावत होता.

फिंगर प्रिंटस् एक्सपर्टस्चे रिपोर्टस् आले. घरात कोणाही बाहेरच्या माणसाचे ठसे सापडले नाही. श्वानपथकातला कुत्राही कंपाऊंडच्या बाहेर जाईना. अनिल मीरचंदानीची आम्ही माहिती काढली. त्याचा धंदा नुकसानीचा होता. गेल्या महिन्यातच त्याला पंधरा-वीस लाखांचा फटका बसला होता. अधिक चौकशीसाठी पुन्हा त्या घरात मी एकदा गेलो असताना हॉलमधल्या टेबलवरच चावीसकट कुलूप ठेवलेले दिसलं. तसं ते नेहमीच पडलेलं असतं, असे मॉजी म्हणाल्या. म्हणजेच मॉजी आतल्या खोलीत असताना हॉलमध्ये बसलेला अनिल त्या चावीचा ठसा घेवून डुप्लिकेट चावी बनवू शकत होता. कपाटाची चावी तर त्याच्यावर विश्वास असल्यामुळे त्याच्यासमोरच एका प्लास्टिकच्या डब्यात ठेवली जायची. म्हणजे अनिलची 'नियतही' फिरु शकत होती. केशवानींच्या घरात आलेला प्रत्येक दागिना पाहून मिसेस रोहिरांचे डोळे विस्फारले जायचे. त्यांचा नवरा कधी दागिनेच करीत नसे. स्त्रीसुलभ हेवा आणि दागिन्यांची हौस यामुळे मिसेस रोहिरानं हे कृत्य केलं असण्याची शक्यताही नाकारता येत नव्हती. आणि उरलेली तीन घरची माणसं मॉजी, पूनम आणि नीलेश.. या तिघांनी चोरी करणं शक्य नव्हतं. तसा काहीच हेतू (Motive) सापडत नव्हता. मग ही चोरी केली कोणी?

अजूनही न सापडलेल्या कामवाल्या सुमननं?

की नुकसानीत धंदा करणा-या अनिल मीरचंदानीनं?

की दागिन्यांची इच्छा अतृप्त राहिलेल्या मिसेस रोहिरानं?

की आणखी कुणी?

केशवानी चोरी केसचाच विचार करीत मी पोलीस स्टेशनवर बसलो होतो. एवढयात हवालदार सांगत आला. ''साहेब दोन बाया येताहेत भेटायला.''

पाहतो तर केशर आणि तिच्याबरोबर एक बाई. तीही कामवालीच. तिचं वर्णन जे आम्हांला आधीच मिळालं होतं त्यावरुन ओळखलं....हीच सुमन.

''हीच सुमन का?''

''होय सायेब, हीच, चार दिवस भयनीकडे रायली होती.''

''तिला बोलू दे की !''

''सायेब, नव-याची तब्येत लई खराब होती. जे. जे. हॉस्पिटलात नेलं होतं. ॲडमिट कराया सांगितलं. मग जे.जे. जवळ भईन -हाते तिथे रायले. आन् ही चोरी एवढयात झाली बगा. पन सायेब..चार पैसे मागून घीन पन चोरी करनार न्हाई..ते बी सा लाक..सायेब आई शप्पत..या कुंकवाची शप्पत.. मी न्हाई केली चोरी.''

जेवढा वेळ सुमन बोलत होती तेवढा वेळ मी तिला न्याहाळत होतो. ती डोळ्याला डोळा देऊन बोलत होती आणि एकंदरीत तिचा आविर्भाव असा होता की ती प्रामाणिक वाटली.

''पण चोरी झाली आणि ती सुध्दा सहा लाखांची हे तुला कोणी सांगितलं''

''आक्क्या हंस अपार्टमेंटला म्हाइतीए सायेब,'' केशर म्हणाली.

तरीसुध्दा एक फॉर्मलिटी म्हणून मी हवालदार पाठवून तिच्या झोपडीची झडती घेतली. वस्तू गहाण ठेवणा-या, चोरीचा माल घेणा-या व्यापा-याकडे चौकशी केली... पण उपयोग झाला नाही. अनिल मीरचंदानीची फार मोठी रेडिमेड गार्मेन्टची ऑर्डर रिजेक्ट झाल्यामुळे त्यांचे नुकसान झालं होतं. पण त्याच्यावर नजर ठेवल्यावर तो कुठेही संशयास्पद वागत नव्हता. ज्या दिवशी चोरी झाली होती. त्यादिवशी तो खरोखरंच तब्येत बरी नसल्यामुळे चारच्या सुमारास घरी आला होता आणि आल्या आल्या त्याला चोरीची खबर मिळाली होती. या गोष्टीलाही सबळ पुरावा मिळाला होता. अकरा ते साडेतीन या वेळात तो चोरी करणं शक्य नव्हतं.

मिसेस रोहिरांवरही आम्ही बारीक नजर ठेवली होती. जर तिनं सहा लाखांची दागिन्यांची चोरी केली असेल तर ती आणि नव-याची साथ असेल तर तो असे दोघंही त्या दागिन्यांचे पुढे काहीतरी करण्यासाठी एखाद्या सोने-चांदीच्या व्यापा-याकडे गेलेच असते. कारण दागिन्यांची चोरी करणारे आहे त्या स्थितीत दागिने स्वतःकडे ठेवत नसतात. लवकरात लवकर त्यांचे स्वरुप बदलतात किंवा विकून टाकतात. पण रोहिरा पती-पत्नी तसं काहीएक करताना दिसले नाहीत. तेव्हा प्रमुख संशयितांवरचे संशयाचे ढग विरले होते. जवळजवळ डेड एण्ड झाल्यासारखं वाटत होतं. पण असा डेड एण्ड कधीच होऊ द्यायचा नसतो. तसा तो नसतोच. जवळपास एखादी पायवाट असतेच.

याच पायवाटेवर लक्ष ठेवायला मी माझ्या सहका-यांना सांगितलं.

दुस-या दिवशी सकाळी साडेअकरा वाजता केशवानीच्या घरातून एक व्यक्ती बाहेर पडली. कम्पाऊंण्डच्या बाहेर आल्यावर त्या व्यक्तीनं टॅक्सीला हात केला. ती व्यक्ती टॅक्सीत बसली. टॅक्सी हाजीअलीवरुन ताडदेवच्या दिशेनं निघाली. आम्ही मागे असल्यामुळे चेहरा स्पष्ट दिसला नव्हता. तरी ती 'तीच' व्यक्ती आहे, याविषयी आम्हांला खात्री होती. तिच्या कडेवर एक छोटं मूल होतं आणि ते तिनं कसंतरी धरलं होतं. डोक्यावरुन पदर आणि सफाईदार इंग्रजी. इतर सगळे हिंदी बोलतानाही इंग्रजी बोलणारी. चेहरा लपवता लपवता हळूच क्षणभर दाखवून आपल्या अप्रतिम सौंदर्याची जाणीव देणारी. केशवानींची सून पूनम होती ती. ती रोज सकाळी कुठे जाते ते आम्हांला पाहायचं होतं. नीलेश सकाळी फॅक्टरीत जाई तो रात्री येई. त्या दिवशीही तो केवळ चोरी झाल्यामुळे लवकर निघून आला होता. नीलेश चोरी करणं शक्यच नव्हतं.

मॉजी त्या दागिन्यांच्या मालक होत्या. त्यांचे हवं ते करायचा अधिकार त्यांचा होता. त्यांना काही कारण नव्हतं. सूनबाईंनी असं काही करावं असे वाटायला काही कारण नव्हतं. पण अनेकदा सासू बाहेर पडल्यानंतर बाहेर पडणारी सून चोरीच्या दिवशी आधी बाहेर पडली होती. हे संशय येऊ नये म्हणून तर नसेल? सासू परत यायच्या आत दुपारी घरी येऊन, कारभार करुन पुन्हा साळसूदपणे सासूच्या नंतर घरी यायचं अशी तिची योजना तर नसेल?

पण तसं करायचा हेतूच सापडत नव्हता. तरीही आम्ही लक्ष ठेवलं होते. ताडदेवच्या जरा पुढे गेल्यावर एका इमारतीजवळ तिची टॅक्सी थांबली. टॅक्सीतून उतरुन तिनं पुन्हा डोक्यावरुन पदर घेतला आणि ती त्या

इमारतीत शिरली. ती खूबचंदानी अशी पार्टी लावलेल्या घरात शिरली.

आमची पार निराशा झाली. नीलेशशी बोलता बोलता त्यांच्या सासुरवाडीचं नाव आम्हांला समजलं होतं. म्हणजे घरी सांगितल्याप्रमाणे ती खरोखरंच माहेरी येते तर ! आम्ही लक्ष ठेवलंच होतं. संध्याकाळी चारच्या सुमारास ती खूबचंदानीकडून निघाली आणि घरी आली. एक दिवस मी मॉजींना विचारलं. ''ज्या दिवशी त्यांना दागिन्यांचा खण रिकामा दिसला त्याच्या अगोदर त्यांनी दागिने कधी पाहिले होते?'' तेव्हा त्यांनी पंधरा दिवस अगोदर असं उत्तर दिलं होतं.

म्हणजे ही चोरी सतत पंधरा दिवस किंवा हप्त्या हप्त्यानंही केली असेल. म्हणून चोरीच्या अगोदर पंधरा दिवस केशवानींकडे कोण कोण येऊन गेलं याचा तपास केला.

नीलेशचा परदेशी स्टेटसमध्ये राहणारा भाऊ तीनचार दिवस नीलेशकडे राहून गेला होता.

तो तर चांगलाच well to do असणांर नाही?

माझ्या प्रश्नाचा रोख बघून नीलेश भडकून उठला.

''इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही आता frustrated झालाय. माझ्या भावानं दागिने चोरले असं म्हणयचंय तुम्हांला''

''नीलेश शांत हो. आम्हांला सगळ्याच शक्यतांचा विचार करावा लागतो. परिस्थितीजन्य पुरावे सांगत आहेत की ही चोरी घरच्याच माणसानं केली आहे. I mean it. नीलेश.. घरच्याच, तू सुध्दा ही चोरी केली असशील.''

''ओह माय गॉड..मी ? It is absurd.'' तो वेडयासारखा हसू लागला. मी मात्र शांत होतो.

''हे बघ नीलेश. अतिश्रीमंत माणसं मोठयामोठया दुकानातून वस्तु लांबवतात. क्लेप्टोमॅनिआ या मनोविकारानं ते पछाडलेले असतात. स्वतःच्याच घरात चो-या करणारेही असतात. तसाही एखादा मनोविकार असू शकतो.''

''म्हणजे मी... मी सायकीक आहे? मी स्वतःचेच दागिने चोरले? नीलेश पुन्हा खुळ्यासारखा हसू लागला.

एवढयात चहाचा ट्रे घेऊन पूनम आली. तिनं नेहमीप्रमाणे डोक्यावरुन पदर घेतला होता. ट्रे ठेवून ती शुध्द इंग्रजीत म्हणाली.

सर तुमचा आरोप भयंकर गंभीर आहे. तुमच्याकडे काहीही पुरावा नसतानाही तुम्ही असा आरोप कसा करु शकता?

ती हे वाक्य पूर्ण करते न करते तोच नीलेश एकदम तिच्यावर वैतागला, रागानं त्याचं शरीर थरथरतं होतं.

''हे बघ आम्ही दोघं बोलतोय ना? तू मध्ये कशाला तोंड घालतेस. आपल्या घरच्या लेकीसुनांनी असं मध्ये बोललं तर माँ वैतागते हे काय तुला माहीत नाही?.. यूजलेस।''

तिनं पुन्हा पदर घट्ट केला आणि फणका-यानंच ती आत गेली. ती गेली त्या दिशेला पाहात मी म्हंटलं.

''माझ्याकडे पुरावे नाहीत हे तर खरंच आहे. नीलेश रिलॅक्स हो..मी फक्त शक्यता सांगितल्या. तुम्हां कोणावरही आमचा आरोप याक्षणी तरी नाही.''

''थॅंक्स'' नीलेश खरोखरंच मोकळा होत म्हणाला. नंतर तो हलक्या आवाजात बोलू लागला. इन्स्पेक्टर साहेब..मी तुमच्यासमोर माझ्या बायकोवर ओरडलो. याबद्दल दिलगीर आहे. पण माझी आई खूप जुन्या मताची आहे. सुनेनं माझ्याशिवाय आणि तिच्याशिवाय कोणाशीही..तिची माहेरची माणसं सोडून..बोलायचं नाही असा कडक नियम आहे. माहेरच्या माणसांशीही जेवढयास तेवढंच बोलायचं. आज आई आतच्या खोलीत पोथी वाचत बसलीय्, म्हणून हिला चहा आणावा लागला. खरंतर चहा वगैरे पाहुण्यांना देण्यासाठी आमच्या घरी एक नोकर होता. पण महिन्यापूर्वी तो सोडून गावी निघून गेला आणि आता दुसरा नोकर मिळत नाही म्हणून हिला आणावं लागतं. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. पण नंतर आईला खूप मनःस्ताप होतो आणि ती पूनमला वाट्टेल ते बोलते. ते टळावं म्हणून मी तिच्यावर ओरडलो.

‘‘आय डोंट माइंड..’’ मी म्हणालो. ‘‘सासू-सून भांडणे प्रत्येक घरात असतातच’’

‘‘भांडण?... आमच्या घरी भांडण नसतंच फक्त आई बोलते. आई बोलताना पूनमनं काय, मी जरी एक शब्द उच्चारला तरी या हंस अपार्टमेंटमध्ये जबरदस्त तमाशा होऊ शकतो. आईला मग भान राहात नाही. एकदा राग आला की तिचा संयम राहात नाही. तेव्हा प्लीज ट्राय टु अंडरस्टॅंड’’

तिथून निघता निघता मी विचारलं.

‘‘पूनमभाभीचं शिक्षण किती झालंय्?’’

नीलेश स्मित करत म्हणाला,

‘‘ती चार्टर्ड अकाऊंटंट आहे... पण प्रॅक्टिस करत नाही, बायकांनी काहीही कमवायचं नाही असा या घराचा नियम आहे.’’

हे आश्चर्यकारक होतं. चार्टर्ड अकाऊंटंटसारखं उच्च शिक्षण घेतलेली मुलगी अशी डोक्यावरुन पदर घेऊन वावरत स्वतःची कुचंबणा करुन घेत जगू शकते? चोरीचा शोध संपल्यात जमा होता. मी मनाशी काही अंदाज बांधले होते. ते खरे का खोटे तेच फक्त ठरायचं होतं.

सकाळी अकराच्या सुमारास मॉंजी बाहेर जायच्या. कधी देवळात, कधी मैत्रिणीकडे साडेअकरा बाराच्या सुमारास माहेरी चक्कर मारण्यासाठी पूनमभाभी निघत असे. आम्ही सतत आठ दिवस तिच्यावर पाळत ठेवली. आणि आम्हांला काही गोष्टी समजत गेल्या. नीलेश तर सकाळी नऊलाच घराबाहेर पडत असे. म्हणजे अकरा ते साडेअकराच्या दरम्यान पूनमभाभी घरात एकटी असते.

याच वेळेला तिच्याशी मोकळेपणी बोलता आलं असतं.

मी सव्वाअकराला केशवानींकडे पोहोचलो तेव्हा पूनमभाभी एकटीच होती. मला पाहून ती चरकली हे माझ्या लक्षात आलं.

तिनं डोक्यावरुन पदर घेताच मी म्हणालो,

‘‘मला भावासारखा समज आणि रिलॅक्स हो, शिवाय आता मॉंजीही नाहीत.’’

तरीही तिनं पदर डोक्यावरुन घेतलाच.

“Sir please come when my mother-in-law or my husband is there.”

“No madam I think I will be able to speak frankly in their absence” मी ठासून म्हणालो.

तिनं मला आत येऊ दिलं आणि ती जरा लांब जाऊन खाली पाहात उभी राहिली.

‘‘खरंतर मला चोरीविषयी बोलायचंच नाही.’’

तिनं आश्चर्यानं वर पाहिलं. पहिल्यांदा तिनं माझ्याकडे पाहिलं. पण क्षणभरच.

‘‘मला पर्सनल बोलायचंय्. त्या दिवशी समजलं तुम्ही चार्टर्ड अकाऊंटंटचा अभ्यासक्रम पूर्ण केलाय.’’

‘‘हो’’.. ती म्हणाली, अतिशय हळू आवाजात!

‘‘मग तुम्ही प्रॅक्टिस किंवा नोकरी का नाही करत?’’

‘‘बायकांनी एकही पैसा कमवायचा नाही असा या घराचा नियम आहे. माझं शिक्षण साफ फुकट गेलं इथे.’’

हे सांगताना तिचे डोळे पाण्याने भरले असणार, हे तिचा चेहरा न पाहताही तिच्या आवाजावरुन मी सांगू शकतो. पण मी म्हंटलं,

‘‘ही आणखी मोकळेपणी बोलेल तर बोलू दे, मग ती आणखी रडली तरी चालेल’’

‘‘पण तुम्ही हे स्थळ स्विकारलंच कसे?’’

‘‘वडिलांमुळे, वडील भयंकर कडक. मी कॉलेजमध्ये गेले तरी मला कॉलेजपर्यंत सोडायला यायचे. आणायला मोठा भाऊ यायचा.’’

‘‘मग सी.ए.कसं काय करु दिलं.’’

‘‘वडिलांच्या मित्रांमुळे..त्यांची सी.ए.ची फर्म होती. त्यानं वडिलांना समजावलं. खूप शिकली तर खूप शिकलेला नवरा मिळेल’’

‘‘नीलेश खूप शिकलाय?’’

‘‘जेमतेम ग्रॅज्युएट झालाय तो..पण भरपूर पैसेवाला. त्या लोकांची अट होती. मुलीनं नोकरी किंवा प्रॅक्टिस करायची नाही. घरकाम करायचं. मुलं सांभाळायची..वाचनसुध्दा करायचं नाही..वाचलंच तर

देवाचं वाचायचं. हे काय माझं वय आहे? देवाचं वाचायचं?'' तिने पुन्हा वर पाहिलं. आतल्या खोलीतून एवढयात तिचं मूल रडायला लागलं. ती आत गेली आणि त्या मुलाला घेऊन बाहेर आली. तिनं ते मूल असं धरलं होतं की त्यात आईची मायाच नव्हती. त्या मुलाच्या तोंडात दुधाची बाटली कोंबत म्हणाली, ''हे कार्टसुध्दा अगदी वर्षाच्या आतच आलं'. अचानक तिला काहीतरी संशय आला असावा. ''हे सगळं तुम्ही मला का विचारताय?''

''कारण या घरातली सहा लाखांच्या दागिन्यांची चोरी तुम्ही केलीय, पूनमभाभी!''

ती सुन्न होऊन उभी राहिली. तिला हा अचानक झालेला आरोप अनपेक्षित होता.

''झवेरी बाजारातल्या ज्या ज्युवेलरकडे तुम्ही माल विकलात, त्याच्यापर्यंत पोलीस पोहोचलेत.''

तिच्या डोळ्यातला गुन्हेगार कावराबावरा झाला.

''ज्या बँकेत तुम्ही बेनामी खातं उघडलंय त्या बँकेच्या लेजरशीटची झेरॉक्स पोलिसांच्या फाईलमध्ये आहे.''

आता मात्र तिच्या डोळ्यातल्या त्या गुन्हेगारानं शरणागती पत्करली. मुलाला तिनं खाली ठेवलं आणि ती रडू लागली. हमसाहमशी रडू लागली.

''का केलंत तुम्ही हे?''

मला माहित नाही.I really don't know, पण नीलेशन आणलेल मासिकांमधल्या स्वतंत्र स्त्रिया बघितल्या की, मला भयंकर वैफल्य यायचं..मी बेचैन व्हायचे. वाटायचं काहीतरी केलंच पाहिजे... काहीतरी.. काहीही..मी मग ते दागिनेच पळवले,'' ती रडत राहिली. मी तिला रडू दिलं. ते ओसरल्यावर मी म्हटलं,

''मला माझं कर्तव्य केलंच पाहिजे. मला तुला अटक करावी लागेल''

''नो... असे काही करु नका...प्लीज, मी बहिणीसारखी आहे ना तुम्हांला?''

पण मी तिला अशीच सोडून देऊ शकत नव्हतो. मी नीलेशला फोन करुन बोलवून घेतलं. मॉंजींनाही बोलवून घेतलं. ती मान खाली घालून रडत बसली होती.

नीलेशला भयंकर धक्का बसला होता.

मॉंजीनाही.. एवढया खानदानी घरात आलेली घरंदाज मुलगी अशी चोरी करु शकते यावर त्यांचा विश्वास बसलाही नसता, पण गुन्हा तिनं कबूल केला असल्यामुळे त्यांना विश्वास ठेवावाचं लागला.

मात्र या धक्क्याची परिणती संतापात झाली.

संतापानं थरथरत नीलेश म्हणाला,

''इन्स्पेक्टरसाहेब तिला अटक करा. जाऊ दे जेलमध्ये, गेली तर गेली इज्जत. .I don't care!.....'' मॉंजीही म्हणाल्या. ''हिला जेलमध्ये जाऊ दे आणि तिथून बाहेर पडली की सरळ माहेरी. असली मुलगी आमच्या घरात नको.''

मला मग तिला अटक करावीच लागली. तिच्या वडिलांनाही बोलवून घेण्यात आलं. कोर्टात केस उभी राहिली. एवढी शिकलेली असूनही स्वतःच्या बुध्दीचा वापर करायला कुठेही वाव न मिळाल्यामुळे वैफल्यग्रस्त होऊन 'काहीतरी' करायचं म्हणून ही चोरी करण्यात आल्याचं आम्ही न्यायमूर्तींना पटवून दिलं. मानसिक कारणामुळेच ही चोरी झाली असल्यानं चांगल्या वर्तणुकीच्या बॉण्डवर त्यांनी तिला सोडलं. ती वडिलांकडे राहू लागली. पण आम्ही नीलेश आणि मॉंजीला हे समजावून सांगितलं की, एवढया उच्चविद्याविभूषित मुलीला कौटूंबिक रहाटगाडयात तिच्या इच्छेविरुध्द डांबून ठेवणं म्हणजे एक अप्रत्यक्ष गुन्हा आहे. ज्यामुळे तिला चोरी करावीशी वाटली. ती खरंतर चांगली मुलगी असून संधी मिळाली तर ती एक उत्कृष्ट व्यावसायिक स्त्री होऊ शकेल. नीलेशला ही गोष्ट पटली. त्यानं आपल्या आईलाही समजावलं आणि पूनमला सन्मानानं घरी आणलं..स्वतःच्या व्यवसायात सामील करुन घ्यायचंही त्यानं ठरवलं.

त्यानंतर दोन-तीन वर्षांनी एक दिवस नीलेशचा फोन आला. मला त्यानं घरी बोलावलं होतं. नुकत्याच क्लबमध्ये झालेल्या एका सोहळयात 'सर्वोत्कृष्ट उद्योजक दांम्पत्य' म्हणून असलेले पारितोषिक श्री. नीलेश केशवानी आणि सौ. पूनम केशवानी यांना मिळालं होतं. म्हणून सेलीब्रेशन करण्यासाठी त्यानं पार्टी आयोजित केली होती.

मी आवर्जून त्यांच्या घरी गेलो. खाद्यपदार्थाचा आस्वाद घेताना नीलेश बरोबर पूनमही गप्पात सामील झाली होती.

त्यावेळी तिच्या डोक्यावर पदर नव्हता.

# कुंपणाने शेत खाल्ले

**बँक आणि बँकांचा व्यवसाय हे उन्नतीचे साधन आहे. राष्ट्राच्या भरभराटीचे चिन्ह आहे. त्यांचे अस्तित्व त्यांच्या कारभारावर असलेल्या लोकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. परंतु अशा विश्वासाचा केसाने गळा कापणारे, बँक व्यवसायाला काळिमा फासणारे लोक आढळून येतातच.**

२८ फेब्रुवारी १९७८ रोजी श्रीनगरचे कंवल किशन धर यांची मुंबईतील जम्मू-काश्मीर बँकेच्या शाखेत व्यवस्थापक म्हणून नेमणूक झाली. बँकेचे दिल्लीतील विभागीय व्यवस्थापक खजुरिया यांनी धरने मुंबईहून पाठविलेले अहवाल अभ्यासले. खजुरियांना संशय आला की मंजू, राज, सिध्दि व अंबिका ही मुंबई शाखेतील चार खाती एकाच व्यक्तिमार्फत चालविली जात असावीत. दिल्लीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटले, कुंपणच तर शेत खात नाही ना? खजुरिया मुंबईस येताच धर बेपत्ता झाले.

खजुरियांनी अतिरिक्त पोलीस आयुक्त ज्युलिओ रिबेरो यांना १७ जून १९७९ रोजी बँकेतर्फे तक्रार अर्ज दिला. कंवल किशन धर, रुपमाला, खोसला आणि सनतकुमार यांनी संगनमताने बँकेचे दहा लक्ष त्रेपन्न हजार रुपये हडप केले होते.

पोलीस तपास कार्यान्वित झाला. जागतिक व्यापाराचे मुंबई शहर हे एक प्रमुख केंद्र आहे. बँकिंग व्यवसायाचे ते आगर आहे. अनेक बँका असलेले हे शहर नवीन कितीही बँका स्थापन झाल्या तरी लोकांच्या वाढत्या व्यापाराला, त्यांच्या मदतीला कमीच पडते.

जम्मू आणि काश्मीर राज्यातील श्रीनगर या राजधानीच्या शहरी रेसिडेन्सी रोड, करण नगर येथे जम्मू आणि काश्मीर बँकेचे प्रमुख मध्यवर्ती कार्यालय आहे. १९७८ पर्यंत मुंबई शहरात त्या बँकेची शाखा नव्हती. जम्मू आणि काश्मीर राज्याचा दिवसेदिवस वाढता पर्यटन व्यवसाय लक्षात घेता व पर्यटक या नात्याने भारतास भेट देणारे विदेशी नागरिक बहुतांशाने मुंबई मार्गाने येतात हे लक्षात घेता मुंबई शहरात जम्मू आणि काश्मीर बँकेची शाखा असणे फार जरुरीचे आहे हे ओळखून ३० जानेवारी १९७८ रोजी जम्मू आणि काश्मीर राज्याने त्यावेळचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते मुंबईतील फोर्ट भागात होमी मोदी क्रॉस लेन येथे जम्मू आणि काश्मीर बँकेची एक शाखा उघडण्यात आली.

बँकेची शाखा जरी मुंबईत उघडण्यात आली तरी त्या शाखेचे विभागीय कार्यालय दिल्ली शहरात होते. मुंबईतील शाखेच्या व्यवस्थापकांना त्यांच्या शाखेच्या व्यवसायाचा अहवाल नियमित दिल्लीतील त्यांच्या विभागीय कार्यालयात पाठवावा लागे.

२८ फेब्रुवारी १९७८ रोजी श्रीनगरचे एक रहिवासी कंवल किशन धर यांची मुंबईतील जम्मू आणि काश्मीर बँकेच्या शाखेत व्यवस्थापक म्हणून नेमणूक झाली. सर्वसाधारण व्यवस्थापकाशिवाय एक लेखा व्यवस्थापक, सहा लिपिक व पट्टेवाले, रक्षकाचे काम करणारे दोघेजण



असा एकूण दहा कर्मचाऱ्यांचा सरंजाम त्या बँकेतील शाखेत करण्यात आला.

बँकेचे कामकाज सुरळीतपणे चालू झाले. हळूहळू खातेदारांची संख्या वाढू लागली. बँकेच्या व्यवस्थापकांच्या मुंबईतील व्यापारीवर्ग व इतर लोकात ओळखी वाढू लागल्या. बँकेतील कामे करुन घेण्यासाठी व्यवस्थापकांकडे बँकेच्या खातेदारांकडून लहान सहान भेटी येऊ लागल्या. क्वचित प्रसंगी बडया व्यापारी धेंडामार्फत,एखाद्या वास्तूचे उद्‌घाटन, व्यवसायाचा वर्षदिन किंवा वाढदिवस अशा कार्यक्रमाच्या निमित्ताने बँकेच्या व्यवस्थापकांना मेजवानीची आमंत्रणे येऊ लागली.

मे महिन्याचा तिसरा शनिवार. बँकेचे व्यवस्थापक के. के. धर बँकेच्या वातानुकूलीत कार्यालयाच्या स्वतंत्र खोलीत कार्यमग्न असताना त्यांच्या खोलीत एक सडपातळ शरीरयष्टीचे पोक्त गृहस्थ शिरले. हातात विदेशी बनावटीची आकर्षक ब्रिफकेस, अंगात कडक इस्त्रीचे तलम रेशमी कपडे व डोळयावर सोनेरी काडयांचा चमकदार चष्मा, गृहस्थ मालदार आसामी असल्याचे दर्शवित होते.

स्वतःची ओळख करुन देत ते गृहस्थ म्हणाले, “मी सनतकुमार, सनराज ट्रेडर्सचा प्रोप्रायटर. लक्ष्मी बँकेच्या व्यवस्थापकांनी तुम्हाला फोन केलाच असेल. त्यांच्या बँकेत आमच्या कंपनीचे खाते आहे. तसे ते माझे चांगले मित्रही आहेत. दरवर्षी आमच्या कंपनीच्या कारभारचा नफा-तोटयांचा, खरे म्हणजे आतापर्यंत आम्ही कधी तोटयात गेलोच नाही, नेहमी नफा असतो, तर तो आढावा झाल्यानंतर आम्ही आमच्या मित्रांना, हितचिंतकांना, व्यापारी संबंध असलेल्यांना आमंत्रित करुन एखाद्या नामी हॉटेलात मेजवानी देतो. मेजवानीत आपल्यासारखे बँकेचे अधिकारी, म्युनिसिपल अधिकारी, काही सरकारी अधिकारी व स्थानिक राजकिय पुढारी यांनाही बोलवितो. वेगवेगळया खात्यांच्या सरकारी अधिकाऱ्यांना इतरांबरोबर एकत्र मेजवानीस बसणे आवडत नाही. म्हणून वेगवेगळया खात्याच्या अधिकाऱ्यांना वेगवेगळया ठिकाणी बसण्याची व्यवस्थाही आम्ही करतो.

आता थोडयावेळापूर्वी मेजवानीचे आमंत्रण द्यायला लक्ष्मी बँकेचे व्यवस्थापक प्रवीण शाह यांच्याकडे गेलो होतो. उद्या रविवार आहे. सुट्टी असल्यामुळे तुम्हां बँकेच्या अधिकाऱ्यांना यायला अडचण नाही. शाह साहेबांनी आनंदाने आमंत्रण स्वीकारले. त्यांनीच तुमचे नाव सुचविले म्हणाले, “धर साहेबांनाही बोलवा. मुंबईत त्यांचा नवीन व्यवसाय आहे, ओळखी वाढतील. तेव्हा साहेब उद्या आपण आठवणीने यायचे. नाही म्हणू नका. हा आमचा प्रेमाचा आग्रह आहे.”

सनतकुमारचे हे लांबलचक उपोद्‌घाताचे भाषण के. के. धर नुसतेच ऐकून घेत होते. त्यांना बोलण्याची संधीच मिळत नव्हती. सनतकुमार बोलायचे थांबला तेव्हाच त्यांना बोलायचा अवसर मिळाला. ते म्हणाले, “माझी अन् प्रवीण शाह साहेबांची प्रत्यक्ष ओळख नाही. मी फक्त त्यांचे नाव ऐकले आहे. लक्ष्मी बँकेचे ते व्यवस्थापक आहेत एवढेच मी जाणतो. त्यांची माझी कधी भेट झालेली नाही. त्यांनी कसे काय माझे नाव सुचविले?”

“ते मला माहीत नाही. तुम्ही समव्यवसायी आहात. शेजारी आहात. तुम्ही त्यांना भेटला नसलात तरी ते तुम्हाला चांगले ओळखतात. तुम्ही उद्या मेजवानीस याल तेव्हा तुमचीही ओळख होऊन जाईल. अशा भोजन समारंभांना जाण्याने तर ओळखी वाढतात.”

“पण मला त्यांचा फोनही आलेला नाही?”

“अजूनपर्यंत नसेल आला तर येईल आता आणि नाही आला म्हणून बिघडले कूठे? मेजवानी देणारा मीच समक्ष आमंत्रण द्यायला आल्यानंतर शंका कसली? त्यांनी फक्त तुमचे नाव सुचविले. बोलावणारा तर मीच आहे ना?”

“बरं बरं. ठीक आहे. येईन मी उद्या. पण कुठे यायचे?” के.के. धरनी विचारले.

“हॉटेल ऑस्कर. बांद्रयाला हॉटेल पाली हिलच्या बाजूला. बँकेच्या अधिकाऱ्यांसाठी तेथे वेगळी व्यवस्था केलेली आहे.”

दुसऱ्या दिवशी रात्री आठ वाजता धर ऑस्कर हॉटेलात गेले. तेथे मेजवानीला पाचजण हजर होते. त्यात एक पंचविशीच्या घरातील व दुसरी तिशीच्या घरातील अशा दोन तरुणी होत्या. वर्ण, उंची, पेहराव, पुष्ट शारीरिक अवयव व त्यांची भाषा यावरुन त्या तरुणी पंजाबी किंवा काश्मीरी असाव्यात असे भासत होते. एकीने पंजाबी ड्रेस परिधान केलेला होता. तर दुसरीने साडी व ब्लाऊज. परंतु ब्लाऊजच्या गळयाचा कट इतक्या खाली होता की तो आतील अवयव झाकण्याऐवजी दाखविण्याचेच काम अधिक करीत आहे असे वाटे.

सनतकुमारने धरला एकेकांच्या ओळखी करुन दिल्या, “हे मिस्टर एस्.एस्. खोसला. मंजू एंटरप्राइजचे प्रोप्रायटर. हया मिसेस रुपमाला. बिल्डिंग कन्स्ट्रक्शनच्या व्यवसायात त्या फार मोठया हस्ती आहेत. या मिस मधुबाला. मिसेस रुपाच्या सेक्रेटरी आणि खास मैत्रीण आणि हे मिस्टर कुमार खोसलांचे मित्र.”

“मिस्टर शाह आलेले नाहीत?” आलेल्या मंडळीत शाह दिसले नाहीत तेव्हा धरनी विचारले.

“आत्ताशी आठ वाजताहेत. येतील एवढयात. आपण त्यांची थोडी वाट पाहू या.” सनतकुमार म्हणाले.

लक्ष्मी बँकेच्या मॅनेजरांची धर, सनतकुमार व इतर मंडळींनी बराचवेळ वाट पाहिली. ते काही आले नाहीत. तेव्हा त्यांच्याशिवायच पार्टीला सुरुवात झाली. सनतकुमारने जॉनी वॉकरच्या स्कॉच व्हिस्कीची खास व्यवस्था ठेवली होती. सोबतीला चवदार खाद्यपदार्थही होतेच. हॉटेलातील खास तालबध्द विदेशी संगिताच्या नादात हळूहळू पार्टीला रंग चढू लागला. पेगवर पेग फस्त होऊ लागले. गप्पा विनोदात लाख आणि कोटीच्या व्यवहाराशिवाय गोष्टी होत नव्हत्या. आम्ही लाखो रुपये कसे कमविले, कसे उडविले आणि वैभव आमच्या पायाशी कसे लोळण घेत आहे याच्याच त्यांच्या गप्पागोष्टी चालू होत्या.

खाण्यापिण्यापेक्षाही घरचे लक्ष रूपमालाकडे आणि तिच्या शरीराच्या प्रत्येक हालचाली बरोबर लपाछपीचा खेळ करणाऱ्या तिच्या उरोभागाकडेच जास्त होते. तीही आग्रह करुन मद्याचे ग्लास त्याला भरुन देत होती. त्याच्या हाती ग्लास देताना मुद्दाम तिच्या हाताचा स्पर्श करीत होती. त्याच्यावर तिरक्या डोळयांचे तीर सोडून त्याला घायाळ करीत होती.

हळूहळू धरच्या डोळयात झिंग दिसू लागली. बोलतांना त्याची जीभ जड होऊ लागली. मध्येच थोडे हलके होण्यासाठी त्याला उठावे लागले तेव्हा त्याचे पाय डगमगू लागल्याचे सनतकुमारने पाहिले आणि मग मद्याचा हात आखडता घेतला. धर हलका होऊन परत आला तेव्हा खोसला त्याला म्हणाला, “धर साब, आपकी बँक में हमारी मंजू एंटरप्राइज कंपनीका खाता खोलना चाहता हूं.”

“बडी खुशीकी बात है खोसला साहब” आपकी सेवा करनेका हमे भी मौका मिलेगा. अगर पहलेसेही हमे मालूम होता तो अकौंट ओपनिंग फॉर्म यहांही साथ लेकर आता. खैर, कोई बात नाही. आप कल बँकमे आ जाइये, हम खाता खुलवा देंगे.”

रात्री अकरानंतर ऑस्कर हॉटेलातील नावाजलेला कॅब्रेडान्स धरला पहावयास मिळाला. पाश्चिमात्य राष्ट्रातील नाईटक्लबप्रमाणे. मुंबईतील रात्रीचे आयुष्य कसे असते याबद्दल मुंबईबाहेरुन मुंबईत येणाऱ्या लोकांना एक कुतुहल असते. त्याचे त्यांनी निरसन करुन घेतले.

नाचगाण्याची मेजवानी संपवून घरी पोहोचायला धरला रात्रीचा एक वाजला. सनतकुमारने त्याला टॅक्सीतून घरी पोहोचवण्याची व्यवस्था केली होती. त्या रात्री धुंद मनःस्थितीतही धर मनात म्हणत होता, “काय परमेश्वराचा न्याय तरी? ज्याच्याकडे मुबलक पैसा आहे त्यालाच तो आणखीन देतो. आम्ही मात्र नुसते पहात रहायचे. दुसऱ्यांच्या पैशाचा खणखणाट आम्ही नुसता ऐकायचा. आम्ही रोज लाखो रुपयाचे हिशोब ठेवतो पण ते दुसऱ्यांच्या व्यवहाराचे, आमच्या खिशात मात्र काहीच नाही.”

यानंतर २३ मेला खोसला जम्मू आणि काश्मीर बँकेच्या शाखेत जाऊन धरला भेटला. खोसला जणू काही आपल्या जन्मजन्मांतरीचा मित्र आहे या भावनेने धरने खोसलाचा नवीन खाते उघडण्यासाठी भरुन द्यावा लागतो


एका खाजगी बैठकीत रूपमाला, धर, सनतकुमार आणि खोसला

तो फॉर्म भरुन घेतला. मंजू एंटरप्राइज, मंजू महाल, पाली हिल, बांद्रा, मुंबई - ५० या नावाने खाते उघडले. नवीन खाते उघडताना खातेदाराला त्याला ओळखणाऱ्या दुसऱ्या खातेदाराने "मी याला ओळखतो" अशा अर्थाने फॉर्मवर सही करावयाची असते परंतु धरला ती अडचण आहे असे वाटलेच नाही. घेईन मी कोणाची तरी सही, म्हणून धरने कोणाच्या ओळखीशिवायच खाते उघडले. खाते उघडताना खातेदाराने पहिल्याच दिवशी काही रक्कम जमा करावी लागते. खोसलाने एक हजार एक रुपये रोख भरुन खाते उघडले.

खाते उघडल्यानंतर दोन महिने खात्यातील रकमेत विशेष चढउतार झाला नाही. त्यानंतर मात्र हळूहळू खोसला खात्यात शिल्लक आहे त्यापेक्षा जास्त रक्कम काढू लागले. धरने त्याला कधी नाही म्हटले नाही. दर आठवडयाला खोसला, रुपमाला, सनतकुमार आणि धर यांच्या वेगवेगळया हॉटेलात मेजवान्या झडू लागल्या. ऑस्कर नंदी, सीझर पॅलेस, हिल टॉप या हॉटेलातून ओल्या पार्ट्यांबरोबर कॅब्रे डान्सलाही हजेरी लागू लागली. आपली बँक मॅनेजरची नेमणूक म्हणजे आकंठ मद्यप्राशन करुन स्वर्गातील अप्सराप्रमाणे हॉटेलातील नाचगाण्यांची मौजमजा लुटण्याचा परवानाच मिळाला, असे धरला वाटू लागले.

वास्तविक बँकेचा व्यवस्थापक या नात्याने धरला जास्तीत जास्त पंधरा हजार रुपयापर्यंत एखाद्या खातेदारास "ओव्हरड्राफ्ट"ची सवलत देण्याचा अधिकार होता. परंतु खोसलाला ओव्हरड्राफ्टच्या रुपाने पंचवीस ऑगस्टपर्यंत, म्हणजे तीन महिन्याच्या काळातील दिलेली रक्कम दोन लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव रुपये इतकी झाली. तीन लाखाला फक्त एकच रुपया कमी.

जम्मू आणि काश्मीर बँकेच्या मुंबईतील शाखेचे मध्यवर्ती कार्यालय दिल्लीला असल्यामुळे बँकेतील व्यवसायातील व्यवसायासंबंधाने एकूण झालेली जमा आणि वेगवेगळया बाबींवरील खर्च याचा आढावा दरमहा दिल्लीच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवावा लागे. त्या आढाव्यात दर महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारपर्यंत कोणत्या खातेदाराला किती रक्कम ओव्हरड्राफ्टने दिली याची माहिती पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयात धरला त्यांच्या दिल्लीतील कार्यालयस पाठवावी लागे. पंधरा हजार रुपयापेक्षा जास्त रकमेचा ओव्हरड्राफ्ट मंजुर



करण्यासाठी बँकेच्या व्यवस्थापकाला त्यांच्या दिल्लीच्या कार्यालयाची मंजूरी घ्यावी लागे.

ऑगस्ट महिन्यात मंजू एटरप्राइजच्या खोसलांना तीन लाख रुपये ओव्हरड्राफ्टने दिले, हे धरने सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात त्यांच्या दिल्लीतील मध्यवर्ती कार्यालयास कळवावंयास पाहिजे होते. परंतु हे जेव्हा धरच्या लक्षात आले तेव्हा त्याचे धाबे दणाणले. एवढया मोठया रकमेचे ओव्हरड्राफ्ट मंजूर करण्याचे कोणते कारण द्यावे हे त्याला कळेना. यावर काहीतरी विचार करु आणि मार्ग काढू या विचाराने त्याने ओव्हरड्राफ्ट संबंधीचा सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयात पाठवावयाचा अहवाल दिल्लीस पाठवलाच नाही.

मंजू एंटरप्राइजच्या खात्यावर ओव्हरड्राफ्टची रक्कम वाढू लागली व खोसलाकडून त्याची भरपाई वेळीवेळी स्मरण करुनही होईना. तेव्हा धरने ही गोष्ट सनतकुमारच्या कानावर घातली. काही करुन त्यांच्या खात्यात ओव्हरड्राफ्टने दिलेली रक्कम जमा झालीच पाहिजे नाहीतर माझ्या नोकरीवर गदा येईल, हेही धरने त्यांना सागिंतले. यावर सतनकुमार धरला म्हणाला, "एवढया तातडीचा प्रसंग असेल तर मी एक मार्ग दाखवितो. त्यामुळे काही काळतरी तुमची अडचण पुढे ढकलली जाईल. मग पुन्हा पुढे दुसरा काहीतरी मार्ग काढू."

"कसला मार्ग?" अधीरतेने धरने विचारले.

"मिसेस रुपा उर्फ रुपामाला ही खूप धनवान बाई आहे. पन्नास लाखाच्यावर तिची प्रॉपर्टी आहे. तिच्या नावे बँकेत एक नवीन खाते उघडा. नंतर तिच्या खात्यावर ओव्हरड्राफ्ट देऊन पूर्वी घेतलेल्या मंजू एंटरप्राइज या खात्यावरील ओव्हरड्राफ्टची रक्कम त्या खात्यात जमा करुन टाका.

बुडत्याचा पाय खोलात त्याप्रमाणे झाले. दुसरा काही मार्ग दिसेना तेंव्हा धर या गोष्टीस तयार झाला. ऑगस्ट महिन्यातच सिध्दी एंटरप्राइज या नावाने रुपमालाचे खाते बँकेत उघडले. नवीन खाते उघडण्यासाठी जे सोपस्कर करावे लागतात ते सर्व धरनेच स्वतःत्याच्या वातानुकूलीत खोलीत बसूनच केले. खाते उघडण्यासाठी रुपमालाला कोणाची ओळख द्यावी लागली नाही. धर म्हणाला, “काही हरकत नाही. मी घेईन कोणाची तरी सही.”

नवीन खाते उघडतांना रूपमालाने तिच्या सिध्दी एंटरप्राइज या खात्यात पंचवीस हजार रुपये रोख भरून खाते उघडले. खात्याची सुरूवात जोरदार झाली. खाते धनवान व्यक्तीचे आहे हे आपोआपच सिध्द झाले. परंतु दुसऱ्याच दिवशी स्वतःच्याच नावे धनादेश देऊन सव्वीस हजार रुपये खात्यातून काढून घेतले. वास्तविक इतर कोणाच्या, खात्यात तेवढी रक्कम जमा नसल्याने तो धनादेश वटला नसता. धरने स्वतःच्या अखत्यारीत रुपमालाला एक हजार रुपयांचा ओव्हरड्राफ्ट मंजूर करून तिला तेवढी रक्कम काढू दिली. राजाच एवढा उदार झाल्यानंतर त्याला अडवणार कोण? धरला जाब विचारणारे अधिकारी मुंबईत होतेच कुठे?

त्यानंतर रुपमालाच्या बँकेच्या भेटी वाढत चालल्या. दर तीनचार दिवसात ती बँकेत येऊ लागली. धरच्या वातानुकूलीत खोलीत तासन्तास बसू लागली. बँकेतील वातावरणात सुगंध दरवळू लागला. बँकेतील कर्मचायाना धर आणि रुपमाला यांच्यातील घनिष्ठ संबंधाची कल्पना आली. धरच्याही बांद्रयाच्या भेटी वाढत चालल्या. बांद्रा, सांताक्रूज, जुहू भागात असे कोठले हॉटेल राहिले नाही. की जेथे रुपा व धरने भेट दिली नाही. ऑस्कर नंदी, हिलटॉप, सिझर पॅलेस अशा जेथे जेथे कॅब्रेनाच होई तेथील नोकरवर्गही रुपमाला व धर या जोडीला ओळखू लागले.

ऑक्टोबर महिन्यातही धरने त्यांच्या दिल्लीच्या विभागीय कार्यालयास ओव्हरड्राफ्ट संबंधीचा मासिक अहवाल पाठविला नाही. परंतु हे असे किती काळ चालणार? धरने अहवाल पाठविला नाही तरी दिल्ली कार्यालयाकडून विचारणा होणारच होती. अखेर ऑक्टोबरपर्यंतचा अहवाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयात पाठविला.

धरने पाठविलेला अहवाल दिल्लीच्या जम्मू आणि काश्मीर बँकेचे विभागीय व्यवस्थापक श्री. खजुरिया यांच्या मेजावर अकरा नोव्हेंबर रोजी आला. तो वाचून पहाताच धरने मंजू एंटरप्राइजच्या खातेदाराला दोन लाख नव्यण्णव हजार नऊशे नव्याण्णव रुपयाचा ओव्हरड्राफ्ट मजुर केल्याचे त्यांच्या लक्ष्यात आल्याशिवाय राहीले नाही. एका खातेदारास पंधरा हजार रुपयापेक्षा जास्त रक्कम ओव्हरड्राफ्टने देण्यास परवानगी नसताना धरने ती कशी दिली, याचा खजुरियांना राग आला. हा त्यांच्या अधिकाराचा गैरवापर होता. खजुरियाने ताबडतोब धरला या गोष्टीचा खुलासा विचारला.

असा जाब विचारला जाईल याची धरला कल्पना होतीच असा जाब विचारला तर त्याचे उत्तर कसे द्यावयाचे हेही त्याने ठरवून ठेवले होते. तशी तयारीही त्याने करुन ठेवली होती.

एक नोव्हेंबर रोजी धरने रुपमालाच्या सिध्दी एंटरप्राइज या खात्यात केवळ चारशे रुपये शिल्लक असताना रुपमालाला एक लाख नव्याण्णव हजार रुपये ओव्हरड्राफ्टने काढण्यास मंजूरी दिली. याशिवाय स्वतःच्याच अखत्यारीत “राज एंटरप्राइज” या नावाचे एक स्वतंत्र खाते उघडण्यात आले. खातेदार राजकुमार असल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले होते. तीन नोव्हेंबर रोजी राज एंटरप्राइज या खातेदारास एक लाख सहा हजार रुपये ओव्हरड्राफ्टची सुविधा वापरुन काढू देण्यात आले. या दोन्ही खात्यातील ओव्हरड्राफ्टची रक्कम म्हणजे सिध्दी एंटरप्राइजचे एक लाख नव्याण्णव हजार रुपये व राज एंटरप्राइजचे एक लाख सहा हजार रुपये असे मिळून एकूण तीन लाख पाच हजार रुपये चार नोव्हेंबर रोजी मंजू एंटरप्राइजच्या खात्यात जमा करुन घेतले. अशारितीने खोसलांच्या मंजू एंटरप्राइज या खात्यावर व्याजासहित ओव्हरड्राफ्टची येणे असलेली सर्व रक्कम बँकेने वसूल करुन घेतली. त्यानंतर मंजू एंटरप्राइज हे खातेच बंद करुन टाकले. शेवटी झाले काय की मंजू एंटरप्राइज या एका खात्यातील ओव्हरड्राफ्टची रक्कम सिध्दी एंटरप्राइज व राज एंटरप्राइज या दोन खात्यावर विभागून देण्यात आली.

विभागीय कार्यालयाची आधी परवानगी न घेता जवळजवळ तीन लाख रुपयांचा ओव्हरड्राफ्ट मंजू एंटरप्राइज या खातेदारास मंजूर केल्याबंद्दल खजुरिया साहेबांनी धरला जो जाब विचारला होता त्याचे उत्तर लगेच न देता त्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजे जानेवारी १९७९



नाच गाण्यात दंग केवल किशन धर

मध्ये धरने पाठविले. त्या उत्तरात ओव्हरड्राफ्ट का मंजूर केला याचे काहीच स्पष्टीकरण न करता अहवालाच्या शेवटच्या रकान्यात मंजू एंटरप्राइजची ओव्हरड्राफ्टची व्याजासहित सर्व रक्कम चार नोव्हेंबर रोजी बँकेला मिळाली आहे एवढेच लिहून कळविले.

जानेवारी १९७९ मध्ये जेव्हा ओव्हरड्राफ्ट संबंधीचा धरने पाठविलेला मासिक अहवाल खजुरियांनी वाचला तेव्हा खजुरियांच्या हेही लक्षात आले की धर केवळ मंजु एंटरप्राइजला ओव्हरड्राफ्ट देऊन थांबला नव्हता. त्याने सिध्दि एंटरप्राइज आणि राज एंटरप्राइज या खातेदारांनाही दिल्ली कार्यालयाची परवानगी न घेता, त्यांना न कळविता पुन्हा तीन लाखाहूनही जास्त रकमेचे ओव्हरड्राफ्ट मंजूर केलेले होते. हे पाहून खजूरिया बरेच चिडले. धरचा त्यांना खूप राग आला.

धरने पाठविलेला मासिक अहवाल थोडा बारकाईने पाहाता ओव्हरड्राफ्ट मंजूर केलेल्या तिन्ही खातेदारांच्या नावातील साम्य नजरेत भरले. मंजू एंटरप्राइज, सिध्दि एंटरप्राइज व राज एंटरप्राइज या नावातील साम्य पाहून ही तिन्ही खाती एकाच व्यक्तीची तर नाहीत ना? अशीही त्यांना शंका आली. ओव्हरड्राफ्ट मंजूर केल्याबद्दल त्यांनी धरला पुन्हा टेलेक्स पाठवून खडसावून जाब विचारला. त्याचबरोबर ते तिन्ही खातेदार कोण आहेत, त्यांचा व्यावसाय काय आहे याबद्दल सविस्तर माहिती विचारली.

खजुरियांनी विचारलेल्या जाबाला दिलेल्या उत्तरात धरने लिहिले, मेसर्स राज एंटरप्राइज ही फर्म राजकुमार यांच्या मालकीची आहे. परदेशात ड्रायफ्रूटची निर्यात करण्याचा त्यांचा व्यवसाय असून जवळ जवळ दीड कोटी भरतील एवढी त्यांची स्थावर व जंगम मिळकत आहे. त्याचबरोबर समाजात त्यांना चांगलेच आदराने स्थान आहे. राजकीय जगातही त्यांचा चांगलाच दबदबा आहे.

सिध्दी एंटरप्राइजबद्दल कळवितांना धरने पत्रात लिहिले होते की, ती कंपनी रुपमाला या मुंबईत दोन कोटी रुपयाहूनही जास्त किंमतीची मालमत्ता असलेल्या स्त्रीची आहे. ती फार मोठे रकमेचे आयकर व संपत्तीकर भरते. वेगवेगळया बँकांत पन्नास लाखाहून जास्त रक्कम तिने वेगवेगळया मुदतीच्या ठेवी म्हणून ठेवलेल्या आहेत. अनेक मजली इमारती बांधण्याचा तिचा व्यवसाय असून बांधकाम क्षेत्रात तिची उत्तम ख्याती आहे.

खातेदारांसंबंधी वरीलप्रमाणे माहिती देऊन धरने शेवटी त्यांच्या उत्तरात ठामपणे लिहिले होते की, खातेदारांची आर्थिक स्थिती मजबूत असल्याने त्यांना ओव्हरड्राफ्ट म्हणून मंजूर केलेली रक्कम नक्कीच बँकेला व्याजासहीत परत मिळेल याची त्यांना खात्री होती. या खातेदारांशी झालेल्या व्यवहारात मुळीत धोका नसून बँकेच्या इतर व्यवहारात त्यांचा उपयोगच होणार आहे.

दिल्लीच्या कार्यालयातून धरला ओव्हरड्राफ्ट देण्यासंबंधी अनुमती दिल्याचे जाहीर होत नव्हते, तरी त्याच खातेदारांना पुनःपुन्हा ओव्हरड्राफ्ट सुविधा दिली जात होती. आधीच्या ओव्हरड्राफ्टची परतफेड झालेली नसतानाही पुन्हा त्या खातेदारांना वाटेल तेवढया रकमा विनासायास मिळत होत्या. कारण मुंबईतील अनेक हॉटेलातून पाटर्या, मौजमजा आणि जिवाची मुंबई करण्याचे धर, रुपमाला, खोसला आणि सनतकुमार यांचे सत्र चालूच होते.

नोव्हेंबर महिन्यात धरने राज एंटरप्राइजच्या खात्यातून तीन लाख चौतीस हजार रुपये ओव्हरड्राफ्टच्या रुपात उचलले. त्याच महिन्यात सिध्दि एंटरप्राइजला तीन लाख एकोणीस हजार रुपये ओव्हरड्राफ्टने दिले. यासंबंधीचे अहवाल दिल्लीला मिळाले तेव्हा खजुरिया साहेबांनी पुन्हा धरला जाब विचारला. लगेच उत्तर गेले नाही. म्हणून पुनः पुन्हा स्मरण पत्रे पाठविली. परंतु त्यांची धरकडून उत्तरेच गेली नाहीत.

ओव्हरड्राफ्ट संबंधीचा खास अहवाल धरकडून त्यांच्या दिल्ली कार्यालयाला गेला नाही तरी बँकेच्या इतर बाबीसंबंधीच्या अहवालावरुन खजुरियांच्या लक्षात आले की मुंबईच्या जम्मू आणि काश्मीर बँकेच्या व्यवस्थापकांनी नऊ मार्चपर्यंत एकूण दहा लाख एकोणचाळीस हजार रुपये ओव्हरड्राफ्टच्या स्वरूपात खातेदारांना दिलेले होते. यासंबंधी पुनःपुन्हा पत्रे पाठवूनही धरकडून स्पष्टीकरणाचे उत्तर गेले नाही. तेव्हा खजुरियांनी धरला एक निर्वाणीचा संदेश पाठविला. त्यात म्हटले की, "उलट टपाली या जाबाचे उत्तर आले नाही तर तुमच्याविरुध्द योग्य ती खातेनिहाय चौकशी करण्यात येईल."

आता धरला उत्तर न देता गप्प बसणे शक्य नव्हते. काहीतरी मार्ग काढून खजुरियांना उत्तर देणे भागच होते. तीस मार्चला धरकडून दिल्ली कार्यालयाला उत्तर गेले. त्यात त्याने कळविले की, ज्यांना ओव्हरड्राफ्ट मंजूर केलेले होते त्या खातेदारांकडून ओ.डी.च्या रकमांचा भरणा होण्याची अपेक्षा होती. त्यासाठी वाट पहाण्यात थोडा अधिक वेळ गेला. म्हणून उत्तर पाठविण्यास उशीर होत आहे. धरने उत्तरात पुढे कळविले की या पूर्वीचे सर्व खातेदारांचे ओव्हरड्राफ्टस् वसूल झालेले आहेत. फक्त अंबिका ट्रेडर्स या एकाच खातेदाराकडून ओ.डी.ची रक्कम परत यावयाची राहिलेली आहे. अंबिका ट्रेडर्स ही फार म्हणजे फारच मोठी पार्टी असून त्यांचा फार मोठा कारभार आहे. त्यांच्यामुळे आपल्या बँकेत महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्ड, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी इत्यादीची खाती आपल्या बँकेला मिळण्याची शक्यता आहे. अंबिका ट्रेडर्सकडून बँकेची एक पैही बुडविली जाणार नाही याची धरला खात्री असल्याचे कळवून त्याने पत्रात लिहिले होते, "बँकेचा धंदा वाढविण्यासाठी काही वेळेस असे ओ.डी. देणे जरुरीचे असते. थोडा धीर धरा आणि पहा. इतर शेडयूल्ड बँकेच्या तोडीस तोड आपली बँक होईल, याबद्दल संशय नसावा."

राज एंटरप्राइज, सिध्दी एंटरप्राइज यांना दिलेल्या ओ.डी.ची सहा लाखाच्यावर रक्कम येणे असताना, कोणत्याच पार्टीकडून ओ.डी. ची रक्कम येणे बाकी नाही असे धरने दिल्लीला पाठविलेल्या उत्तरात कसे काय म्हटले? यावेळीही धरने मागचीच युक्ती नव्याने वापरली होती. त्याचे असे झाले होते-

आठ फेब्रुवारी रोजी धरने आपल्या बँकेत अंबिका ट्रेडर्स या नावाचे नवीन खाते उघडले. खाते उघडणारा खातेदार होता सनतकुमार सेठ. ज्याने नऊ महिन्यापूर्वी धरशी ओळख करुन ऑस्कर हॉटेलात मेजवानी देऊन भविष्यातील मेजवानीचा, मौजमजेचा प्रारंभ केला होता.

एकोणीस मार्च ७९ पर्यंत राज एंटरप्राइज खात्यात तीन लाख चौतीस हजार रुपयांचे ओ.डी. मंजूर झालेले होते. अंबिका ट्रेडर्स हे खाते उघडल्यानंतर वीस मार्च रोजी धरने अंबिका ट्रेडर्सला चार लाख रुपयाचा ओ.डी. मंजूर केला व ती सर्व रक्कम राज एंटरप्राइज या खात्यात जमा केली. त्यामुळे राज एंटरप्राइज या खात्यातील ओ. डी. चे सर्व देणे संपून खात्यात पंचावन्न हजार रुपये शिल्लक राहिले. ती शिल्लक राहिलेली रक्कम खत्यातून काढून घेतली व ते खाते बंद करुन टाकले.

त्याचप्रमाणे चोवीस फेब्रुवारी ७९ पर्यंत सिध्दि एंटरप्राइज खात्यात तीन लाख सत्याण्णव हजार रुपयांचे ओ. डी. धरने मंजूर केलेले होते. तेवढी रक्कम रुपमालाकडून बँकेला येणे होती. तिच्या कडून काही ती रक्कम येण्याची आशा नव्हती. तिची आता धरला पूर्ण ओळख झाली होती. चोवीस फेब्रुवारी रोजी अंबिका ट्रेडर्स या नवीन उघडलेल्या खात्यात तेवढया रकमेचा ओ.डी.मंजूर करुन ती सर्व रक्कम सिध्दि एंटरप्राइज या खात्यात जमा करुन त्या खातेदाराचे बँकेला असलेले सर्व देणे फेडून टाकले.

वरील दोन ओ. डी. शिवाय अंबिका ट्रेडर्स हे खाते उघडले तेव्हाच त्या खात्यावर लाखाचा ओ. डी. धरने मंजूर करुन ती रक्कम सनतकुमारने उचलली होती. अशाप्रकारे नऊ मार्च पर्यंत अंबिका ट्रेडर्स या खात्यावर तीन ड्राफ्टचे

व्याजासहित दहा लाख एकोणचाळीस हजार रुपये बँकेला देणे झालेले होते.

मंजू एंटरप्राइज व सिध्दि एंटरप्राइज या खातेदारांची नावे वेगळी असली तरी त्यांचा पत्ता मंजू महाल, बांद्रा असाच होता.

मंजू, राज, सिध्दि व अंबिका या चार खात्यात ओ. डी. मंजूर केल्याच्या तारखा व ओ. डी. ची रक्कम खात्यात जमा केल्याच्या तारखा पडताळून पाहाता धरने जरी त्याच्या दिल्ली ऑफीसला कळविले होते की ही चार खाती चार वेगवेगळया व्यक्ती वा फर्मची आहेत तरी ते तसे नसावे. एकाच व्यक्तिकडून किंवा एकाच व्यक्तिमार्फत ही खाती चालविली जात असावीत असा दाट संशय खजुरियाना आल्यावाचून राहिला नाही.

खातेदारांच्या नावातील सारखेपणामुळे आणि त्यांना ओ. डी. मंजूर झाल्याच्या तारखा आणि लगेच दुसऱ्या खात्यात ओ. डी. च्या रकमेएवढयाच रकमेचा भरणा यावरुन दिल्लीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना या व्यवहारात काहीतरी काळेबेरे आहे व कुंपणच तर शेत खात नाही ना? असा दाट संशय आला. ही खाती आणि त्यांचे व्यवहार आताच तपासून पाहिले नाहीत तर दिवसेदिवस वाढत असलेली ओ. डी.ची रक्कम लाखाच्या धरातून कोटीच्या घरात जायला वेळ लागणार नाही, अशी भीतीही त्यांना जाणवली. त्यामुळे दिल्लीचे विभागीय व्यवस्थापक श्री. खजुरिया हे स्वतःच बँकेची तपासणी करण्यासाठी मुंबईत आले.

खजुरिया मुंबईत येताच धर बेपत्ता झाले. ते बँकेत येईनात व त्यांच्या राहात्या ठिकाणीही आढळून येईनात. खजुरियांनी बँकेला भेट दिली व बँकेचा कारभार तपासण्यास सुरुवात केली.

खजुरियांनी सर्वप्रथम चारही संशयित खात्याची कागदपत्रे आपल्या ताब्यात घेतली. सिध्दि एंटरप्राइज खातेदाराचे नाव फक्त मिसेस रुपा एवढेच लिहिलेले होते. तिच्या नवऱ्याचे नाव व आडनाव लिहिलेले नव्हते. तिच्या घरचा व व्यवसायाचा पत्ता एकच म्हणजे मंजू महाल, प्लॉट नं. २ व ३, पहिला माळा, पाली हिल, बांद्रा असा होता. मंजू एंटरप्राइजच्या खातेदाराचा म्हणजे एस्. एस्. खोसलाचाही पत्ता तोच होता. मग या दोन व्यक्तींचे एक दुसऱ्याशी नाते काय असावे? ही दोन्ही खाती उघडताना सनराज ट्रेडर्स या दुसऱ्या खातेदाराने ओळख देण्यासाठी फॉर्मवर सही केली होती. परंतु दोन्ही फॉर्मवरच्या सह्या एक दुसऱ्याशी मिळत नव्हत्या. या दोन्ही खात्यात वटलेले धनादेश खजुरियांनी तपासून पाहिले तेव्हा एकाच खातेदाराला देलेले धनादेश दोन्ही खात्यासाठी वापरले असल्याचे दिसून आले. याचा अर्थ दोन्ही खातेदार एक दुसऱ्याशी संबंधित होते असा होत होता. सहसा एका खातेदाराला दिलेले कोरे धनादेश दुसरा खातेदार वापरू शकत नाही. परंतु येथे तसे झालेले होते. त्याला बँक अधिकाऱ्याची संमति असल्याशिवाय हे होणार नाही हेही उघड होते. बँक कर्मचाऱ्यांनी खजरियांना सांगितले की खोसला काय किंवा रुपमाला काय दोन्ही खातेदार जेव्हा बँकेत येत, तेव्हा सारे व्यवहार व्यवस्थापक धर यांच्या खोलीतच होत. धनादेशावर सही कोणी केली आणि पैसे कोणी घेतले हे कर्मचाऱ्यांना कळणे शक्य नसे.

राज एंटरप्राइज हे खाते राजकुमार या नावावर होते. परंतु त्या व्यक्तीस बँकेतील कोणत्याच कर्मचाऱ्याने पाहिलेले नव्हते. त्या खात्यासंबंधीचे सर्व व्यवहार धर स्वतः त्यांच्या खोलीतूनच करीत. राजकुमारचे संपूर्ण नांव कागदोपत्री नव्हते. त्याचा पत्ता चिंतीत बिल्डिंग, दादर, मुंबई-४० असा होता. वास्तविक दादरचा पिन नंबर मुंबई - १४ किंवा मुंबई-२८ असा आहे. मुंबई-४० असा नाही. शिवाय चिंतीत बिल्डिंग दादर भागात कोठेच नाही. हा पत्ता काल्पनिक व खातेदार बोगस असावा असा संशय खजुरियांना आला. धर स्वतःच ते खाते बेनामी स्वरुपात चालवीत असावेत अशीही शंका खजुरियांना आली.

अंबिका ट्रेडर्स हे खाते एस्. आर. सेठ, यांच्या नावे होते. त्यांचा पत्ता एअर कंडिशंड मार्केट, पाचवा मजला, ताडदेव असा होता. त्यांचा व्यवसाय बिल्डींग कन्स्ट्रक्शन व बिल्डिंग मटेरियल असे कागदोपत्री लिहिलेले होते. खजुरियांनी चौकशी करण्यासाठी बँकेचा शिपाई रहमान याला पाठविले. त्याने त्या मार्केटमध्ये चौकशी केली. परंतु या नावाचा कोणीच गृहस्थ तेथे आढळून आला नाही.

अंबिका ट्रेडर्स हे खाते उघडतांना भरुन द्याव्या लागलेल्या फॉर्मवर खातेदारास ओळखणाऱ्या व्यक्तीची सही नव्हती. मात्र त्या रकान्यात बँक मॅनेजर धर यांच्या हस्ताक्षरात एक शेरा मारलेला होता. त्यात लिहिले होते, "सोबत जोडलेले पत्र पहावे."

सोबत एक पत्र होते. ते पत्र सनतकुमार आर. सेठ, रहाणार - फुलचंद निवास, चौपाटी सी फेस, मुंबई यांनी एजंट, न्यू बँक ऑफ इंडिया यांना लिहिलेले होते. त्या पत्रात, "तुमच्या बँकेत माझ अकाऊंण्ट नं. ६८१६७ आहे. माझी सही तुमच्या रेकॉर्डवर आहे. मी या पत्रात खाली सही केलेली आहे, म्हणजे ती माझीच सही आहे हे सर्टिफाय करुन मिळावे ही विनंती." त्या पत्रावरील एस्. आर. सेठच्या सही खालीच न्यु बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजरांनी पत्रावरील सहीची खात्री करुन दाखला दिलेला होता. त्यात म्हटले होते, "या पत्रावरील सही आमच्या बँकेतील अकाऊंण्ट होल्डर एस्. आर. सेठ यांचीच आहे."

खजुरियांनी हे पत्र लक्षपूर्वक पाहिले तेव्हा एक गंमत त्यांच्या लक्षात आलीच. त्या पत्रावरील एस् . आर. सेठची सही ओळखून न्यू बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजरांनी दाखला दिला त्याची तारीख चार एप्रिल ७९ अशी होती. अन एस्. आर. सेठेचे अंबिका ट्रेडर्स हे खाते जम्मू आणि काश्मीर बँकेत आठ फेब्रुवारी रोजी उघडण्यात आले होते. याचाच अर्थ आधी खाते उघडले आणि नंतर दोन महिन्यांनी खातेदाराची ओळख व खातेदाराच्या सहीची खात्री करण्यात आली होती. दुसरी गोष्ट एस्. आर. सेठ या एकाच व्यक्तीचे दोन बँकातील पत्ते वेगवेगळे होते. अंबिका ट्रेडर्स या खात्यावर ज्या दिवशी ओ.डी. दिल्याची नोंद होती त्याच दिवशी तेवढीच रक्कम सिध्दी एंटरप्राइज व राज एंटरप्राइज या खात्याला जमा करुन ओ. डी. च्या रकमेची परतफेड झाल्याचे दाखविले होते.

यासर्व बाबींवरुन संशयित चारही खाती एक दुसऱ्याशी संबंधित असावीत व ती एकाच व्यक्तीकडून किंवा एकाच्याच सल्ल्याने चालविली जात असावीत असे दिसून येत होते. म्हणजेच धर हा बँकेंचा रक्षक नसून भक्षक होता. तो शेत खाणारे कुंपण होता हे उघड होते. गैर कायदेशीररीत्या मोठया रकमांचे ओव्हरड्राफ्ट मंजूर करुन बँकेची रक्कम हडप करण्याच्या उद्देशाने के. के. धर याने एस.एस. खोसला, रुपमाला, एस. एस. सेठ यांच्या मदतीने बोगस व बेनामी खाती उघडून बँकेला चांगलेच गंडवले होते. याबद्दल खजुरियांची खात्री झाली. त्यातल्या त्यात चांगली गोष्ट एवढीच की या चार खातेदाराखेरीज दुसऱ्या कोणालाच धरने ओव्हरड्राफ्ट मंजूर केलेला नव्हता.

खजुरियांना आता एकच उपाय दिसला. तो म्हणजे के. के धर विरुध्द पोलिसात तक्रार करुन तो आणि त्याचे चार खातेदार यांच्याविरुध्द विश्वासघात व बनवाबनवी करुन बँकेला बुडविल्याबद्दल गुन्हा दाखल करणे. पोलिसांकडे गुन्हयाचा तपास देणे. के. के. धरच्या गायब होण्यानंतर खजुरियांना तरी दुसरा उपाय दिसला नाही.

जून १९७९ मध्ये मुंबईचे अतिरिक्त पोलिस आयुक्त ज्यूलियो रिबेरो हे गुन्हा अन्वेषण विभागाच्या गुन्हेशाखेचे प्रमुख होते. १७ जून रोजी श्री. खजुरिया यांनी रिबेरो साहेबांची भेट घेतली व के. के. धर व इतर खातेदार ह्यांच्याविरुध्द लेखी तक्रार अर्ज दिला. रिबेरो साहेबांनी तो अर्ज, विश्वासघात व फसवाफसवीच्या गुन्हयांचा तपास करणारे गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक ललित पुरोहित व फौजदार विजय पेडणेकर यांच्याकडे देऊन त्वरित तपास करण्याचा आदेश दिला.

कट करुन विश्वासघाताने के.के. धर, रुपमाला, एस्. एस्. खोसला, राजकुमार यांवर संगनमताने बँकेचे दहा लाख त्रेपन्न हजार रुपये हडप केल्याचा गुन्हा पुरोहित आणि पेडणेकर यांनी दाखल केला. ताबडतोब गुन्हयाचा तपास सुरु केला.

दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांनी बँकेला भेट दिली. चारही खात्याशी संबंधित कागदपत्रे पेडणेकरांनी ताब्यात घेतली. वटलेले धनादेश, पे-इन-स्लिप्स, लेजर शीटस, अकाऊंण्ट ओपनींग फोर्मस व धर यांचा या खात्यासंबंधी दिल्लीच्या विभागीय कार्यालयाशी झालेल्या पत्रव्यवहाराची फाईल ताब्यात घेतली. कागदपत्रांचा अभ्यास व पडताळणी सुरु केली.

बँकेतील नोकरवर्गापैकी कॅशिअर रामचरण दुबे, क्लार्क बसंती बझिरानी, वॉचमन व शिपाई रेहमान खान यांना पुरोहित व पेडणेकर यांनी अनेक प्रश्न विचारले. त्यांच्याकडुन जास्तीत जास्त माहिती काढण्याचा प्रयत्न केला. सर्वच नोकरवर्गाचे म्हणणे होते, "खोसला साब और रुपा मेमसाब तो धर साहबके घरके जैसेही लोग थे. खोसला साब तो दोचार मरतबाही बँक में आये होंगे. मगर रुपा मेमसाब तो हर तीन चार रोज के बात आती थी. रुपा मेमसाब धर साहबकी पत्नी तो नहीं? वे जब बँक में आती थी तो उनका सब कामकाज धरसाबके कमरेमेंही होता था. मेम साबको कभी हमने लिखते या दस्तखत करते नही देखा. वॉचमन रेहमान खान धर साहब के कहने पर कॅशियरसे रुपये लेकर धर साहबके कमरे में दे आते थे."

पेडणेकरांनी खोसला, रुपमाला, राजकुमार व सनत कुमार यांच्या खात्यात वटलेल्या धनादेशांची पहाणी केली. प्रत्येक धनादेशावर, त्यावरील सही सोडून बाकीचे सर्व लिखाण टंकलिखित केलेले होते. पे-इन-स्लिप्स बँकेत त्याच कारकुनापैकी कोणाला तरी धर यांनी त्यांच्या खोलीत बोलावून त्याच्याकडून लिहून घेतल्या होत्या.

धर आणि चारही खातेदार यांचे बँकेतील रेकॉर्डवर असलेले पत्ते पेडणेकरांनी टिपून घेतले. त्या पत्त्यावर पोलीस पाठवून खातेदार कोठे आहेत याची चौकशी केली. खजूरिया मुंबईत आले त्या दिवसा पासूनच धर गायब झाला होता. परंतु खोसला व रुपमाला ही त्यांच्या पत्त्यावर सापडली नाहीत. त्यांच्या फ्लॅटला कुलूप होते. शेजारी व त्या इमारतीच्या वॉचमनकडे व इतर घरकाम करणाऱ्या नोकरांकडे चौकशी करता खोसला याचे खरे नाव सुधीर सेन असून तो रुपमालाचा नवरा असल्याचे समजले. त्यांना दोन लहान मुले असून चार दिवसापासून ती मुलांना घेऊन बांद्रा भागातच दुसरीकडे कोठेतरी रहाणाऱ्या तिच्या आईकडे गेली असल्याचे समजले. दुसऱ्या एका मोलकरणीने, रुपमाला तिला तिच्या मुलासह रस्त्याने जाताना अलमेडा पार्कजवळ दिसली होती असे सांगितले. तिच्या अंदाजाप्रमाणे ती तेथेच जवळपास तिच्या आईच्या घरी रहात असावी.

प्रयत्न केल्याने कोणती गोष्ट साध्य होत नाही असे नाही. पेडणेकर व त्यांच्या सहाय्यकांनी अलमेडा पार्क भागातील प्रत्येक इमारतीत जाऊन चौकशी केली. त्यात त्यांना रुपमालाच्या आईचा फ्लॅट सापडला. तेथे रुपमालाची आई व रुपाची दोन लहान मुले होती. परंतु रुपा व खोसला उर्फ सेन दोघेही तेथे नव्हते. पेडणेकरांनी गुप्तपणे त्या घरावर पाळत ठेवली.

राजकुमार व सनतकुमार यांनी बँकेत खाते उघडतांना दिलेले पत्ते खोटे होते. त्यांचे खरे पत्ते शोधणे भाग होते.

बँकेतील के. के. धरच्या खोलीतील टेबलाच्या खणांची पेडणेकरांनी तपासणी केली तेव्हा त्यांना त्यात काही हुंडया, काही कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती व काही फोटो मिळाले. त्या फोटोत धर, रुपमाला व खोसला यांचे फोटो होते. काही नर्तकीचेही फोटो होते. मद्य पिताना, नृत्य करताना, मेजवानी चालू असताना घेतलेले ते फोटो होते. धरने पैसा कसा उडवला त्याचा तो एक पुरावा होता.

धर आणि कंपनीला मोठया हॉटेलातून पार्ट्या झोडण्याची सवय होती. पेडणेकरांनी बांद्रा भागातील हॉटेल सीझर पॅलेस, ओरिएंटल पॅलेस, सिध्दार्थ, सी रॉक, पाली हिल व ऑस्कर हॉटेल शोधले. त्याचप्रमाणे वरळीचे हिल टॉप, राहन, पूनम ही हॉटेले शोधली. परंतु तेथे पाहिजे असलेले गुन्हेगार मिळून आले नाहीत. मात्र पाली हिल हॉटेलात दोन दिवस व सिध्दार्थ हॉटेलात दोन दिवस धर व रुपमाला मिस्टर व मिसेस घरसींग या नावाने राहून गेल्याचे समजले. तेथील नोकरवर्ग दोघांनाही नावाने ओळखीत होता.

बांद्रा, खार भागात पेडणेकरांनी गुप्त पोलीस जागोजागी पाळत ठेवण्यासाठी पेरुन ठेवले. स्वतःही फिरत राहून फरारी असलेल्या गुन्हेगारांच्या संभाव्य जागा तपासण्याचे सत्र चालू ठेवले.

समाजात जसे गुन्हेगार असतात तसे गुन्हेगारांची खबर देणारेही समाजात असतात. गुन्हे करुनही अटक न होता मोकळे राहून गुन्हेगारांनी उजळ माथ्याने समाजात फिरावे हे त्यांना बघवत नाही, सहन होत नाही. गुन्हेगारांचे पारिपत्य व्हावे, त्यांना शिक्षा व्हावी अशी त्यांची इच्छा असते. म्हणूनच ते आपण पडद्याआड राहून पोलीसांना गुन्हेगारांच्या खबरी देतात.

बावीस जूनला एका अनोळखी इसमाने नाव पत्ता न सांगता पेडणेकरांना त्यांच्या कार्यालयात फोन करुन कळविले की नेपियनसी रोडवर असलेल्या वैभव बिल्डींग आवारात मिसेस रुपमाला आणि धर यांना एका अँबॅसिडर मोटरीतून जाताना पाहिले. त्या मोटारीचा रंग-टॉप लाल व बाकीचा भाग पांढरा होता व मोटारीचा नंबर जीजेजी ७३३७ असा होता. खबर देणाऱ्याने पुढे सांगितले की जर पोलीस ताबडतोब तेथे जातील तर ती दोघे मोटरीसह तेथे सापडतील.

फौजदार पेडणेकर त्यांचे सहव्यवसायी फौजदार मधुकर घोरपडे व दोन पोलीस यांना घेऊन तेथे गेले. वैभव इमारतीपासून लांब अंतरावर पोलीस मोटार उभी करुन ते वैभव इमारतीच्या आवारात गेले. आवारात बऱ्याच मोटारी उभ्या होत्या. परंतु त्यात लाल टॉप व खाली पांढरा अशा दोन रंगातील एकही मोटार नव्हती. पेडणेकरांनी तेथील वॉचमनला विचारले, "अशा दोन रंगाची मोटार तिकडे आली होती काय?"

"एका तासापूर्वी तशा रंगाची मोटार आत आल्याचे मी पाहिले साहेब, परंतु बाहेर जाताना काही पाहिल्याचे आठवत नाही."

आवारात खूप गॅरेजेस होती. परंतु ती सर्व बंद होती. बाहेरुन सर्वांना कुलुपे होती मग दोघे गेले कोठे? वैभव इमारतीत कोणाकडे आली असावीत? त्यांच्यापैकी तेथे कोणी राहात असावा काय?

पेडणेकरांनी आपली ओळख सांगून तेथील वॉचमनला रुपमाला व धर यांचे फोटो दाखवून "यापैकी कोणी या इमारतीत रहावयास आले आहेत काय?" असा प्रश्न केला.

"ते मला सांगता येणार नाही साहेब. यांचा येथे फ्लॅट नाही. परंतु कोणाकडे पाहुणे म्हणून आले असतील तर सांगता येणार नाही." वॉचमनने आपले अज्ञान प्रकट केले.

वैभव इमारतीत टाटांच्या सारखे बडेबडे उद्योगपती रहात होते. अपुऱ्या माहितीच्या आधारावर त्यांच्याकडे चौकशी करावयाची म्हणजे त्यांना अपमानित करण्यासारखे होते.

इमारतीच्या आत जाणाऱ्या मार्गाजवळ एक मोठी विजेची घंटा बसवलेली पेडणेकरांना दिसली. आगीची किंवा इतर संकटसमयी इमारतीच्या रहिवाशांना सूचना देण्यासाठी ती घंटा होती. ती घंटा वाजवल्यास धडधड इमारतीतील लोक आपआपल्या फ्लॅटमधून बाहेर येतील व आपोआपच धर व रुपमाला आपल्या नजरेस पडतील अशी एक कल्पना पेडणेकरांच्या डोक्यात चमकून गेली. परंतु लगेच तो आक्रस्ताळीपणाचा मार्ग त्यांनी डोक्यातून काढून टाकला. समजा धर आणि रुपमाला तेथे नसतील किंवा निघून गेलेले असतील तर घंटा वाजवून विनाकारण बडया लोकांना आपण त्रास दिला म्हणून आपल्या विरुध्द वरिष्ठांना हे लोक तक्रार केल्याशिवाय रहाणार नाहीत.

वैभव इमारतीचे सर्व आवार तपासून पेडणेकर व घोरपडे इमारतीच्या फाटकाजवळ येऊन थांबले शेजारच्या दोन इमारतीतही ते जाऊन आले. परंतु त्यांना ती मोटार दिसली नाही. पुन्हा ते वैभव इमारतीच्या गेट जवळील वॉचमनच्या खोलीत येऊन थांबले.

जवळ जवळ अडीच तीन तासांनी एक अँबॅसिडर मोटर वैभव इमारतीच्या आवारातून बाहेर जाण्यासाठी फाटकाकडे आली. त्या गाडीला लाल टॉप नव्हता व गाडीचा नंबरही जीजेजी म्हणजे गुजरातचा दिसला नाही. त्यामुळे त्या गाडीतील लोकांकडे पेडणेकरांनी तेवढे लक्ष दिले नाही. परंतु ती मोटार फाटकातून बाहेर पडताच आतील मागच्या सीटवर बसलेल्या तरुणीने मागील काचेतून मागे पाहून पेडणेकरांकडे पहात हात हलवून "टा टा" केले.

"अरे! ही तर रुपमाला आणि तिच्या बाजूला बसलेला धर. मोटारीचा रंग आणि नंबर दोन्ही वेगळे आहेत."

पेडणेकर व घोरपडे धावत पोलीस मोटारीकडे गेले. ड्रायव्हरला बोलावून गाडी सुरु होईपर्यंत दोन तीन मिनिटे गेली. तोपर्यंत रुपमालाची मोटार दृष्टीच्या टप्प्याबाहेर निघून गेली होती. त्यांनी त्यानंतर तासभर फिरुन धर व रुपमाला यांना शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु उपयोग झाला नाही. रुपमालाने पेडणेकरांना चांगलाच चकवा दिला होता.

मोटरीचा शोध घेण्यासाठी पेडणेकरांनी पोलीस नियंत्रण कक्षाला कळविले. दोन दिवस फिरत्या बिनतारी संदेश वाहन पथकाकडुन मुंबईभर मोटारीचा शोध घेतला परंतु मोटार सापडली नाही.

चोवीस जूनला रुपमाला आणि धर अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी हायकोर्टात अर्ज करणार आहेत व त्यासाठी ते चांगल्या वकिलाच्या शोधात आहेत अशी कुणकुण पेडणेकरांच्या कानी आली. पेडणेकर व घोरपडे यांनी हायकोर्टाच्या आवारात फिरुन कानोसा घेतला. सरकारी वकिलांना भेटून चौकशी केली. परंतु अद्याप अशा अर्जाची नोटीस त्यांच्याकडे गेली नसल्याचे समजले.

रुपमाला आणि धर यांच्या हाती बराच पैसा आला होता. ते विमानाने दिल्ली, कलकत्ता किंवा अन्य शहरी जाण्याची शक्यता होती. किंवा पासपोर्ट काढून परदेशातही जाण्याची शक्यता होती. धर आणि रुपमाला यांच्या फोटोच्या नकला काढून पेडणेकरांनी त्या सांताक्रूझ आणि सहार विमानतळावरील पोलीस अधिकाऱ्यांना पाठवून दिल्या. ते दोघेही आढळून आल्यास त्यांना अटकाव करण्याची विनंती केली.

दरम्यान गुन्हा कार्यप्रणाली शाखेत तपास करता सनतकुमार उर्फ एस्.आर. सेठ हा बिलंदर ठकसेन असून तो पोलीसांच्या रेकॉर्डवर असल्याचे समजले. त्यापूर्वी त्याला फसवणूकीच्याच वेगवेगळया अकरा गुन्हयात शिक्षा झालेल्या होत्या व दोन वेळेस मुंबईतून त्याला हद्दपारही

केलेले होते. हद्दपारीच्या मुदतीत तो पुण्याला अशोक लॉजमध्ये राहिला होता. लॉजचे भाडे त्याने चेक देऊन चुकते केले. परंतु लॉजच्या मालकाचे दुर्दैवाने तो चेक वटलाच नाही. पुण्यात त्याने न्यू बँक ऑफ इंडियात खाते उघडले होते व बँकेचे मॅनेजर सतीश मुर्डेकर यांच्यावर धरप्रमाणेच भुरळ पाडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मुर्डेकर कच्च्या गुरुचे चेले नव्हते. त्यांचा पिंड धरप्रमाणे ढेपाळणाऱ्या मातीचा बनलेला नव्हता. त्यांनी सनत कुमारच्या गोड बोलण्याला दाद दिली नाही. त्याला त्यांनी एका पैशाचाही ओव्हर ड्राफ्ट मंजूर केला नव्हता.

मुंबईत दादासाहेब भडकमकर मार्गावर रहाणाऱ्या अभ्यंकर नावाच्या एका गृहस्थाकडून सनतकुमारने, त्यांना नवीन गॅस कनेक्शन घेऊन देतो म्हणून दोन हजार रुपयांना फसविले होते. अभ्यंकरांनी भडकमकर पोलीस ठाण्यात तक्रार करुन गुन्हा दाखल केला होता व त्या पोलीस ठाण्याचे पोलीस सनत कुमारला शोधीत होते.

अठ्ठावीस जूनला रुपमाला तिच्या मंजू महालातील फ्लॅटवर येणार असल्याची खबर त्या इमारतीतीलच एका रहिवाशाने फौजदार पेडणेकरांना दिली. सकाळपासूनच दोन हवालदारांना घेऊन पेडणेकर साध्या वेषात पाली हिलच्या मंजूमहाल या इमारतीवर पाळत ठेवून राहिले. या वेळी फसायचे नाही असा त्यांनी निर्धार केला.

दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास एक टॅक्सी मंजू महालच्या फाटकापाशी आली फाटक अर्धवट उघडे होते. त्यातून टॅक्सी आत जाऊ शकत नव्हती. फाटकाला लागून वॉचमेनला बसण्यासाठी एक गुंची होती. त्या गुंचीत पेडणेकर वॉचमेनशी गप्पा मारीत बसले होते. टॅक्सी फाटकाशी थांबताच दोघेही गुंचीच्या बाहेर आले. पेडणेकरांनी आत नजर टाकली. आणि ते एकदम उत्साहित झाले. ते पटकन उडी मारुन टॅक्सीच्या दाराशी गेले व ड्रायव्हरला म्हणाले, "मी सी.आय.डी. अधिकारी आहे. टॅक्सीतील दोघे फरारी आरोपी आहेत. मी त्यांना अटक करीत आहे. तू अशीच टॅक्सी सी. आय. डी. ऑफीसला घे. टॅक्सीचे भाडे तुला मिळेल."

कोण होते त्या टॅक्सीत? त्या टॅक्सीत रुपमाला व के.के. धर होते. पेडणेकरांनी त्यांना अटक करुन गुन्हे शाखेच्या कार्यलयात आणले.

दुसऱ्या दिवशी धर आणि रुपमाला यांना गुन्हयाच्या तपासकामासाठी पोलीस कोठडीत रिमांड मिळावा म्हणून, एस्प्लनेड दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात उभे केले तेव्हा एक मोठे नाटकच घडले. रुपमालाला आरोपीच्या कठडयाजवळ उभे करताच ती एकदम मटकन खाली बसली व जमिनीवर आडवी झाली. तिने न्यायाधिशांना सांगितले, तिच्या पायात उभे राहण्याचे त्राण नाही. दोन दिवसापूर्वीच तिने एका बाळाला जन्म दिला आहे व पोलीस इतके क्रुर आहेत की त्यांनी तिला तिच्या बाळापासून दूर ठेवले आहे. तिला का अटक केली हेही तिला कळलेले नाही. तिने कसलाच गुन्हा केलेला नाही. अटक करुन तिला जामिनही दिला नाही.

आरोपीचा रिमांड मिळविण्यासाठी पेडणेकर स्वतः न्यायालयात गेले होते.रुपमालाची तक्रार ऐकून तेही चक्रावले. रुपमाला आणि ओली बाळंतीण? हा विचारही त्यांना शिवला नव्हता.

रुपमालेला ताबडतोब इस्पितळात नेण्याचा आदेश न्यायाधिशांनी दिला. शेजारीच कामा हॉस्पिटलमध्ये तिला नेले. तेथील लेडी डॉक्टरांनी तिला तपासले आणि दाखला दिला, "रुपमाला गेल्या वर्षभरात तरी बाळंत झाल्याचे कोणतेच चिन्ह तिच्या शरीर तपासणीत आढळून आले नाही. तिची प्रकृती ठणठणीत आहे."

पेडणेकरांनी दाखला वाचला आणि त्यांचा जीव भांडयात पडला. त्यांना धर आणि रुपमाला यांचा पोलीस कोठडीत डांबण्याचा सरळ चौदा दिवसाचा दंडधिकाऱ्याकडून रिमांड मिळाला.

अटक झाल्यानंतर धरने पोलिसांना सांगितले सनत कुमारने त्याला फसविले. त्याच्या सांगण्यावरुन तो चुकीच्या मार्गी लागला. राजकुमार एन्टरप्राइज हे खाते त्यानेच काल्पनिक नावाने उघडले असल्याचे कबूल केले. त्या खात्यावर वटवलेल्या चेकवर त्यानेच राजकुमार या नावाने सहया केलेल्या होत्या. त्या चेकवरील सहया आणि धरच्या सहयांचे नमुने हस्ताक्षर तज्ञाकडे परिक्षर तज्ञाकडे परिक्षणासाठी पाठविल्या. त्या सहया के. के. धर यानेच केल्या आहेत असा अभिप्राय हस्ताक्षर तज्ञांनी दिला.

तपासा दरम्यान के. के धरने न्यायधिशांपूढे एक पत्र हजर केले. त्यांच्या दिल्लीतील विभागीय कार्यालयाचे प्रमुख अधिकारी श्री. खजुरिया यांच्या सहीचे ते पत्र होते. त्या पत्रान्वये के. के. धर यांना एखाद्या खातेदारला तेरा लाख रुपयापर्यत ओव्हर ड्राफ्ट मंजुर करण्याचा अधिकार दिलेला होता. त्या पत्रावर श्री. खजुरियांची सही होती. परंतु

खजुरियांनी ती सही आपली नसल्याचे व असले पत्र त्यांच्या दिल्लीच्या कार्यालयातून पाठविलेच नसल्याचे सागिंतले. पुढे तपासात रूपमालाच्या कल्पनेनुसार धरने ते बनावट पत्र तयार केले असल्याचे आढळून आले.

बँकेच्या लुबाडलेल्या पैशाचे काय केले विचारता धरने सांगितेले, जुहूला जवाहराबाद सोसायटीत बहात्तर हजार रुपये भरुन एक फ्लॅट घेतला. प्रविण चोक्सी या मोटार डिलरकडून सत्तर हजार रुपयात एक टोयटो मोटार विकत घेतली. रुपमालाच्या नावाने एक अँबॅसिडर मोटार विकत घेतली. या अँबॅसिडर मोटारिचा रंग वर लाल व खाली पांढरा असा होता. परंतु २६ जूनला वैभव इमारतीच्या एका गॅरेजध्येच गॅरेजला बाहेरुन कुलुप लावून आत धरनेच इब्राहीम सुलेमान या पेंटरच्या मदतीने केवळ दोन तासात मोटारीच्या लाल रंगावर पांढरा रंग स्प्रेपेंट लावून घेतला व मोटरीच्या जीजेजी ७३३७ या नंबराच्या मुळच्या नंबर प्लेटस वरील नंबर पुसून दुसरे खोटे नंबर टाकले.

फरारी असल्याच्या काळात धर व रुपमाला अंधेरीला चिनवाणी हॉटेलात खोली घेऊन राहत होते. त्या हॉटेलच्या आवारात जीजेजी ७३३७ ही अँबॅसिडर मोटार मिळाली. तिच्या डिकीत खोटया नंबर प्लेटसही मिळाल्या.

धरने विकत घेतलेली टोयाटो मोटार ऑलिपिया गॅरेंजमध्ये ठेवली होती ती पेडणेकरांनी ताब्यात घेतली.

धरच्या ऑफीसच्या टेबलाच्या खणात यापूर्वीच त्याने विकत घेतलेल्या एक लाख रुपयाच्या हुंडी मिळून आल्या होत्या. अंधेरीला इस्लामिया को ऑपरेटिव्ह बँकेत त्याने मुश्ताक अहमद या खोटया नावाने एक लॉकर घेतलेले होते. परंतु लॉकरमध्ये कागदपत्राशिवाय दुसरे काहीच मिळाले नाही. लॉकरवर देखरेख करणाऱ्या बँकेच्या अधिकारी श्रीमती सोनू पटेल यांनी धरला ओळखून धर व त्याचा एक छोटा भाऊ असे दोघेजण लॉकरचा वापर करीत असे सांगितले.

धरला अशोककुमार नावाचा वीस बावीस वर्षे वयाचा एक भाऊ होता. परंतु तो काश्मीरला निघून गेलेला होता. फौजदार पेडणेकर तपासासाठी काश्मीरला जाऊन आले. श्रीनगर शहरातील धरचे घर त्यांनी शोधून काढले. परंतु अठ्ठावीस जूनपासून म्हणजे धरच्या अटकेच्या तारखेपासून ते बंद असल्याचे व धरचे कुटुंबिय कोठे गेले ते माहित नसल्याचे तेथील लोकांकडून समजले. नंतर कळले की धरच्या अटकेमुळे त्यांची श्रीनगरला सर्वत्र बदनामी झाली होती म्हणून ते दिल्लीला रहावयास गेले होते.

सनत कुमार आणि खोसला यांना शोधुन काढण्यात जम्मू आणि काश्मीर बँकेच्या कर्मचाऱ्यांनी खूपच मदत केली. त्यांच्यापैकी प्रत्येकजण आपापल्या परीने त्यांना शोधण्याचा प्रयत्न करीत होते.

धर व रुपमालाच्या अटकेनंतर बरोबर एक महिन्यांने बँकेचा शिपाई रहेमान खान याला सनतकुमार फोर्ट भागात रस्त्याने जाताना दिसला. त्याने ताबडतोब पोलिसांना खबर देऊन त्याला पकडून दिले. त्यानंतर थोडयाच दिवसात बॉम्बे सेंट्रल भागात सुधीर सेन उर्फ एस्. एस्. खोसला यांनाही अटक झाली.

सनतकुमार आणि खोसला यांना कसला नाद नाही असे नव्हते. रेस, जुगार, मद्यपान, वेश्यागमन या साऱ्यात ते पारंगत होते. केवळ बोलण्याच्या चलाखीने, खोटे तेच खरे भासवून पैसा मिळविण्यात त्यांचा हातखंडा होता.

तपासा दरम्यान अटक केलेले सर्वच आरोपी जवळ जवळ दोन महिने पोलिस कोठडीत होते. त्या मुदतीत रुपमालेने पोलीसांना खुपच त्रास दिला. कोठडीत पडून राहण्याचे टाळण्यासाठी तिने आजाऱ्याचे सोंग केले. ती ह्रुदयरोगाने आजारी असल्याचे सर्वांना सांगे. त्यामुळे तिला नेहमीच इस्पितळात न्यावे लागे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना व न्यायदंडाधिकाऱ्यांना पोलिसांनी खुप मारहाण केली म्हणून ती नेहमी खोटया तक्रारी करी. तिचे सोंग आणि तक्रारी खोटया ठरत. परंतु तोपर्यंत पोलीस अधिकाऱ्याला सतत तणाव असलेल्या परिस्थितीत रहावे लागे.

दोन महिन्यानंतर सर्वच आरोपी जामिनावर सुटले. पोलीसांनी चारही आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सनतकुमारने न्यायालयात गुन्हा कबूल केला. त्याला दोन वर्षाच्या कारावासाची शिक्षा झाली. त्याशिवाय दंडही झाला व शिक्षा भोगल्यानंतर दोन वर्षासाठी मुंबईतून पुन्हा हद्दपारीचा आदेश पोलीस उपआयुक्तांनी दिला. बाकीचे तीनही आरोपी मात्र त्यांचा गाशा गुंडाळून मुंबईतून पळाले. त्यांचा ठावठिकाणा अद्याप हाती लागलेला नाही. त्यांचे जामिनदार त्यांना हजर करु शकले नाहीत. जामिनाची रक्कम भरण्यासाठी जामिनदारावर कार्यवाही चालू आहे.

# लहर

**इसाकभाईंनी आपल्या नातवाला दत्तक घेऊन आपली पुत्राची इच्छा पूर्ण केली. मुलाच्या तोंडातून शब्द बाहेर पडायची खोटी की ती गोष्ट त्याच्यापुढे हजर होत असे. अति लाडाने मुलगा एकलकोंडा होत गेला. मोठेपणी त्याला धंदाही जमेना. अशात त्याला विचित्र भास होऊ लागले..**

इसाक नळवाला!

माऊंट मेरी येथे राहणारं एक गर्भश्रीमंत बोहरी प्रस्थ! नळवालांची मुलगी शमीमा ही आपलं छोटं बाळ घेऊन वडिलांना दाखवायला आली. बाळही मोठं गोंडस. गोबरे गाल, पाणीदार डोळे, गोरापान रंग...

आजोबा नातवाला फक्त दुध पिण्यापुरते मुलीजवळ सोडायचे.

नातवावर त्यांचा एवढा जीव की एवढा जीव की शमीमा म्हणायची, "डॅडी एने राखो तमारीपासेच" आणि इसाकभाईंनी ठरवंल, या बाळाला आपल्याकडेच ठेवायचं.

नाहीतरी आपल्याला मुलगा नाही. हे एवढं वैभव धर्मादाय थोडंच द्यायचंय? नातवाला उपभोगू दे. त्यांनी खरोखरच त्या बाळाला दत्तक घेतलं. मुलीचा मुलगा युसुफ कायद्यानं त्यांचा मुलगा झाला.

युसुफ इसाक नळवाला! गडगंज संपत्तीचा वारस! लाडाकोडात युसुफ मोठा होऊ लागला. युसुफनं एखादी वस्तू मागितली आणि ती त्याला मिळाली नाही असं कधीच होत नसे. मग ती वस्तू कितीही महाग असो. ती आणणं कितीही मुश्किल असो. इसाकभाईनी युसुफला त्यांना डॅडी म्हणायला शिकवंल होतं आणि इसाकभाईंच्या पत्नीला फिरोझाला मम्मी! इसाकभाईंनी युसुफचे चालवलेले लाड पाहून फिरोझा त्यांच्यावर खूप वैतागायची. पण इसाकभाई म्हणायचे, "मारो एकच तो डिकरो छे. हूं गम्मे ते करीश."

युसुफ तीन वर्षाचा होता. इसाकभाईंच्या मांडीवर बसुन घोडा खेळणं हे नेहमीचंच! पण कधी कधी तो त्यांना घरातल्या घरात शंभर चकरा मारायला लावे. एक दिवस फिरोझानं पाहिलं तर इसाकभाई आपल्या गुडघ्यांना तेल लावत होते. घोडा घोडा करुन त्यांचे गुडघे सुजले होते. मग फिरोझानं त्यांच्या गुडघ्यांना स्वतः तेल लावून दिलं आणि ती युसुफला खूप ओरडली. पण युसुफला ओरडल्यानंतर इसाकभाई तिच्यावर जे ओरडले त्याच्यापुढे तिचं ओरडणं काहीच नव्हतं.

इसाकभाईंनी सेवा करायला फिरोझा बिचारी जास्त राहिलीच नाही. एक दिवस अचानक हृदयविकाराचा एक तीव्र झटका आला आणि फिरोझा कायमची निघून गेली. आता घरात राहिले फक्त दोघंजण. ईसाकभाई आणि युसुफ... युसुफचं वयं त्यावेळी होतं फक्त पाच आणि घरात



पाच नोकर. स्वयंपाकाला दोन, साफसफाईला एक, बाजारहाट आणि घराचा कारभार पाहायला एक आणि फक्त युसुफसाठी एक. तसं म्हटलं तर युसुफसाठी दोन नोकर होते असंच म्हणायला हवं. हा दुसरा नोकर म्हणजे स्वतः इसाकभाई . त्या पाच वर्षाच्या चिमुरडयानं हुकूम करावा आणि इसाकभाईंनी तो झेलावा. ताबडतोब अंमलात आणावा हे नेहमीचंच होतं. इसाकभाईंना स्वतःला कामधंद्याची काही गरजचं नव्हती. त्यांच्या वडिलांनी एवढया ठिकाणी प्रॉपर्टी करुन ठेवली होती की त्या प्रॉपर्टीचं भाड आणि गुंतवणुकीचं येणारं व्याज आणि लाभांश यातून त्यांना लाखो रुपये मिळत होते. त्यामूळे युसुफला ते भरपूर वेळ देऊ शकत होते.

एक दिवस शहजादा युसुफनं "डॅडी" ला फर्मान सोडलं, "मने बंदूक जोइये..." महागातली महाग खेळण्यातली रिव्हॉल्व्हर आणण्यात आली. ती हातात घेऊन "ढिश्यूं ढिश्यूं" करणं हा युसुफचा आवडीचा खेळ होता. रिव्हॉल्व्हर घेऊन तो वडिलांना फेऱ्या मारायला लावे. युसुफला उत्कृष्ट शाळेत घालण्यात आलं. त्याला शाळेत पहिल्या क्रमांकानं उत्तीर्ण होण्याएवढा हुशार करीन अशी "गॅरंटी" देणाऱ्या एका शिक्षिकेची शिकवणी ठेवण्यात आली. तिच नावं होत "सारा". साराची शिकवणी सुरु झाली. पण पहिल्या इयत्तेतच युसुफ मागे पडला.

इसाकभाई वैतागले. त्यांनी साराला फायरिंग दिलं. "पुढच्या वर्षी युसुफ पहिला आला पाहिजे."

"सॉरी सर" पुढल्या वर्षी नाही पण तिसऱ्या चौथ्या वर्षी तो पहिला येईल."

"पुढल्या वर्षी का नाही?"

"पहिलं येण्यासाठी नुसती हुशारी पुरेशी नसते... तर आपण पहिलं यायला हवं असं त्याच्या मनाला वाटायला हवं. त्याच्या मनात एक ईर्ष्या जागवायला हवी. ती मी जागवेन. त्यामध्ये दोन तीन वर्ष जातील."

इसाकभाईंनाही ते पटलं. मग सारा कामाला लागली. त्याला अभ्यास शिकवता शिकवता ती इतर अनेक गोष्टी त्याच्या मनात भरवे.

-तू तुझ्या शाळेत सर्वश्रेष्ठ आहेस.

-तुझ्याहून कोणीही वरचढ असता उपयोगी नाही.

- तू तुझ्या शाळेतला सर्वात श्रीमंत मुलगा तर आहेसच, पण सर्वात हुशार आणि बलदंड मुलगाही तुलाच व्हायला हवं.

एकीकडे सारा त्याच्या मनात आत्मविश्वास, स्वाभिमान , गर्व... अहंकार अशा एकेक गोष्टी पायरीपायरीनं उतरवत होती.

साराला अपेक्षित असलेला प्रतिसादही युसुफकडून मिळत होता. इयत्ता पाचवीत युसुफ पहिला आला.

आणि त्यानंतर त्यानं पहिला क्रमांक कधीच सोडला नाही. सातव्या इयत्तेत सारानं त्याची "शिकवणी" सोडल्यानंतर सुध्दा! अकरावीपर्यंत तो पहिला आला. (त्यावेळी अकरा अधिक चार अशी शिक्षण पध्दती होती) अकरावीनंतर तो कॉलेजमध्ये गेला. कॉलेजमध्ये मात्र त्याच्याहून हुशार अनेकजण होते. बुध्दीच्या बाबतीतला त्याचा अहंकार कॉलेजात पहिल्याच वर्षी निवळला. कॉलेजच्या लिस्टमध्ये युसुफ सत्ताविसावा आला. युसुफला ते झोंबलं. अतिशय वैफल्यग्रस्त होऊन तो घरी आला. इसाकभाईंनी त्याला समजावलं. तू हुशार आहेस, बुध्दीवान आहेस . पहिला आला नाहीस तरी हरकत नाही. पण आपल्यापेक्षा अधिक हुशार असलेले सव्वीसजण आपल्याच कॉलेजमध्ये आहेत ही गोष्ट त्याला फारच तापदायक होती. तो घरात घुम्म बसून राहिला. डॅडींशीही बोलेना.

"युसुफ, बेटा, एवढं मनावर घेऊ नकोस. तू सत्ताविसावा तर आलास ना!"

हाताच्या मुठी वळत सैरभर झालेला युसुफ ताडकन उठला. तो भयंकर अस्वस्थ झाला होता. इसाकभाईंना वाटलं, आता विषय बदलायला हवा... आणि युसुफ खुश होईल असं काही तरी करायला हवं.

"आपण तुला नवीन गाडी घेऊ या का ?... मर्सिडीज् आणतो तुझ्यासाठी."

ही मात्रा लागू पडली. युसुफची कळी खुलली. त्याच्यासाठी नवीन मर्सिडीज आणण्यात आली. मर्सिडीज घेऊन युसुफ कॉलेजला जात असे.

पण तो भयंकर गर्विष्ठ होता. शिवाय अतिश्रीमंतीमुळे त्याच्यात आणि इतर मुलांच्यात एक दरी निर्माण झाली होती. इतर मुलं त्याच्याशी बोलायलाही बिचकायची.

त्याच्याच सारखी दोन-तीन गर्भश्रीमंत मुलं त्याच्या कॉलेजला होती. पण युसुफ जेव्हा त्याच्या मित्र-

मैत्रिणींमध्ये (?) असे तेव्हा इतरांनी सदैव त्याचंच म्हणणं ऐकावं असा त्याचा दुराग्रह असे. युसुफला वाटल की अमुक एक चित्रपट पाहावा आणि इतर पाचजणांना वाटलं की दुसरा पाहावा तरी तो इतरांचं ऐकत नसे. ते तरी कशाला त्याचं ऐकतील? मग तो त्याला हव्या त्या चित्रपटाला एकटा जाई, पण त्या पाचजणाचं म्हणणं ऐकत नसे. अशा वागण्यामुळे तो अधिकाधिक एकलकोंडा बनत गेला.

युसुफचं शिक्षण पूर्ण झालं. तो इंजिनीअर झाला. नोकरीची तर गरजच नव्हती. पण काहीतरी करायला हवं होतं. प्रॉपर्टीचे व्यवहार पाहायला एक जुना जाणता मुनीम होता. त्यामुळे तिथंही इसाकभाईंना किंवा युसुफला लक्ष घालाव लागत नसे. इसाकभाईंनी त्याला मग बिझनेस करायला सांगितलं. मोठया मोठया तज्ज्ञांशी डिस्कस करुन मशिनरीच्या स्पेअर पार्टस्‌चं मॅन्युफॅक्चरिंग युनिट काढण्यात आलं. पण युसुफचं कोणाशीच जमत नसे. साध्या साध्या गोष्टींवरुन तो भांडायचा. मार्केटिंग तर त्याला अजिबातच जमत नसे. सहा महिन्यातच ते युनिट बंद करावं लागलं.

आता तो घरात एकटाच बसू लागला. दिवसभर पुस्तक वाचत बसे. त्यामध्ये रहस्यकथा, गूढकथा तो जास्त वाचत असे. सकाळी मात्र तो पोहायला जात असे. तो घोडेस्वारीही शिकला होता. अधून-मधून रायडिंग क्लबला जाऊन मनसोक्त घोडा दौडवणं हा त्याचा आवडता छंद होता.

त्यानं फ्लाइंग क्लबचंही सभासदत्व घेतलं. विमान चालवायलाही तो शिकला. विमान चालवण्याचं लायसन्स मिळण्यासाठीही तो लायक झाला होता.

आणखी एक छंद त्याला होता तो म्हणजे नेमबाजीचा. एअरगननं तो टारगेटच्या अगदी जवळ-नेम मारु शकत असे.

हे सगळे छंद तो दुपारी बारा वाजेपर्यंत करत असे. त्यानंतर जेवून झोपणे आणि मग वाचन. गूढकथा आणि रहस्यकथा.

युसुफच्या दिमतीला तो एक जुना नोकर होता तो एक दिवस वारला आणि नवीन नोकर राजाराम याला खास नोकरीवर ठेवण्यात आलं. राजाराम हा काहीसा कामचोर होता. तसेच तो स्वार्थी आणि लबाडही होता. तो गोड बोलून युसुफला आपलंसं करण्यात काहीसा यशस्वी झाला होता. एखादी गोष्ट चार चार वेळा सांगावी तेव्हा तो करत असे. पण विनोदी बोलून वेळ मारुन नेत असे.

त्याचा आळशी स्वभाव इसाकभाईंनी ओळखला होता. त्यामूळे ते अधून मधून राजारामवर रागवत. राजारामचाही इसाकभाईंवर त्यामूळे राग होता. संधी मिळाली की तो युसुफचं इसाकभाईंविषयीचं मत कलुषित करत असे. एका रात्री युसुफ आपल्या बेडरुममध्ये झोपला होता. सगळी दारं-खिडक्या बंद होत्या. मध्यरात्री अचानक त्याला जाग आली. त्यानं खिडकीत पाहिलं. त्याला खिडकीबाहेर काहीतरी आकृती हलल्यासारख वाटलं. त्यानं घाबरत घाबरत खिडकी उघडली तेव्हा बाहेर कोणीच नव्हतं.

असं वारंवार व्हायला लागलं. कधी कधी तर आपल्या बेडरुममध्ये कोणीतरी अदृश्य व्यक्ति वावरत आहे असे त्याला भास होऊ लागले. तो इसाकभाईंच्या पाठी लागला, या जागेत “काहीतरी” आहे. आपण जागा बदलू या. आणि युसुफच्या आग्रहाखातर इसाकभाईंनी ती जागा विकून नवीन जागा घेतली. पहिल्या जागेपेक्षा आलिशान. भरपूर जादा पैसे देऊन. पण नवीन जागेत सुध्दा युसुफला भास होतच होते. मग आणखी जागा बदलली. बांद्रयाहून खारला, खारहून अंधेरीला... पण काहीही उपयोग नाही. भास होतच राहीले.

युसुफनं जेव्हा चौथी जागा बदलायला सांगितली तेव्हा मात्र इसाकभाई चिडले. या जागा. बदलण्यात कित्येक लाखांचं नुकसान झालं होतं. हे भास वगैरे युसुफच्या मनाचे खेळ आहेत आणि आता ते त्याचं म्हणणं ऐकणार नाहीत असं इसाकभाईंनी ठणकावून सागितलं. इसाकभाई निघून गेल्यावर राजाराम युसुफकडे आला आणि बुड्ढयाला तुझी काही चिंता नाही. काही झालं तरी तू त्याचा खरा मुलगा नाहीस. नातूच आहेस वगैरे विष त्यानं युसुफच्या कानात ओतलं.

कानात ओतलेलं विष मनापर्यंत पोहोचायला जास्त वेळ लागला नाही. नाहीतरी इसाकभाईचा सुरकुतलेला चेहरा, पोपटासारखं नाक, पाठीला आलेलं पोक हे सगळं युसुफला आवडत नसे.

रात्री पुन्हा त्याची समजावणी करायला आलेले इसाकभाई जेव्हा पाठमोरे वळले तेव्हा युसुफनं हातातल्या फाउंटन पेननं त्यांच्या पाठीवर शाई उडवली. पाठीवर नक्षी

उडाल्याचं इसाकभाईंना समजलंच नाही. ती नक्षी आठवून बराच वेळ युसुफला हसू येत होतं.

दुसऱ्या दिवशी त्यानं इसाकभाईंची वापरातली पँट पार्श्वभागावर थोडी फाडून ठेवली. न बघताच इसाकभाई ती पँट घालून वावरत होते तेव्हा पुन्हा त्याला ते विध्वंसक हसू आलं. युसुफला रात्रीचे "भास" होतच होते. इसाकभाईच्या मागे लागून शेवटी त्यानं अधिकृतपणे एक रिव्हॉल्व्हर मिळवलं.

एक रिव्हॉल्व्हर!

सहा बुलेटस् पोटात ठेवणारं!

क्षणार्धात एखाद्या सजीव प्राण्याला निर्जीव करण्याची क्षमता असलेलं.

रोज युसुफ ते रिव्हॉल्व्हर कुरवाळत असे आणि पुन्हा "नीट" ठेवून देत असे. युसुफ इसाक नळवाला त्या रिव्हॉल्व्हरचा उपयोग करणार होता का? कसा?

आपण मुंबईतली जागा सोडून गोव्याला स्थायिक व्हावं असं आता युसुफला वाटत होतं. पण इसाकभाई गोव्याला जायला तयार नव्हते. पूर्वी बंगल्यात राहणारं नळवाला कुटुंब आता राहाव्या मजल्यावरच्या चार खोल्यांच्या एका अद्ययावत फ्लॅटमध्ये राहात होतं. कुटुंबात माणसं होती दोनच! एक इसाकभाई आणि दुसरा युसुफ, कायम त्या घरात राहणारा एकच नोकर राजाराम गावी गेला होता. दुसरे नोकर एक स्वयंपाकी आणि दुसरा साफसफाई ठेवणारा, ते येऊन जाऊन असत. इसाकभाई गोव्याला स्थानिक व्हायला तयार नाहीत हे पाहून युसुफ आतल्या आत धुमसत होता. दुपारपासून घेतलेलं एक पुस्तक वाचायचा तो प्रयत्न करत होता. पण वाचनात मन रमत नव्हतं. राजाराम गावी गेल्यामुळे तो



"टाईमपास" ही नव्हता. युसुफ उठला सहज चाळा म्हणून त्यानं टेबलाच्या खणातून रिव्हॉल्व्हर बाहेर काढून कुरवाळलं आणि तो पुन्हा आपल्या बेडवर येऊन बसला. त्यानं रिव्हॉल्व्हर उशीखाली ठेवलं आणि पुन्हा पुस्तक वाचायचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! त्यानं पुस्तक बंद करुन समोरच्या रॅकवर फेकलं. एवढयात इसाकभाई त्याच्या खोलीत आले. त्यांच्या हातात ट्रे होता. त्या म्हाताऱ्या हातातला तो ट्रे हाताबरोबरचं थरथरत होता. पण आज घरात कोणीचं नोकरमाणसं नसल्यानं त्या कोटयाधीश माणसाला स्वतःचं काम करावं लागत होतं.

"ले बेटा...कॉफी पी ले.

"मने कॉफी नही जोइये.

"कॉफीवर कशाला राग काढतोस बेटा.

"आपण आजच गोव्याला जाऊया. वी विल सेटल इन गोवा"

"गोव्याला जायची गरज-"

"आहे. ही मुंबईच मला नको. टुडे ओन्ली वी विल लिव्ह मुंबई."

"हे बघ सोडायची असली तरी अशी कशी सोडणार मुंबई? मी उद्या गोव्याला जातो. तिथल्या जागा पाहतो मग जी ठीक वाटेल ती जागा घेऊ. बस?" इसाकभाईनी शेवटी शरणागती पत्करली.

"तिथे आपण हॉटलमध्ये राहुनही निर्णय घेऊ शकतो. आजच आपण जाऊया." युसुफ हेका सोडायला तयार नव्हता. "आज जाणं शक्य नाही . माझी तब्येत बरी नाही" इसाकभाई म्हणाले. समोर बसले आणि शांतपणे स्वतःची कॉफी ते पिऊ लागले.

युसुफ त्यांना न्याहाळत होता. त्यांचा सुरकुतलेला चेहरा. पोपटासारखं नाक, मोठमोठे डोळे, जाड ओठ, तोंडातली कवळी काढून ठेवल्यामुळे हलणारं तोंड, थरथरणारा हात, त्या हातावर दिसणाऱ्या शिरा.

युसुफला तो म्हातारा घृणास्पद वाटला.

युसुफच्या डोक्यात एक कल्पना चमकली आणि त्यानं उशाखाली ठेवलेलं ते रिव्हॉल्व्हर बाहेर काढल आणि इसाकभाईवर रोखल. त्याच्या डोळयात त्यावेळी राग नव्हता.

एक विचित्र चमक होती.

इसाकभाईंच्या अंगावर शाई उडवताना ही चमक त्याचा डोळयात आली होती.

आणि त्यांची पँट पार्श्वभागावर..... मात्र आता ही चमक आणखी गडद झाली होती.

“हँडस् अप” घुसमटलेल्या स्वरात युसुफ म्हणाला. कॉफी पिणाऱ्या इसाकभाईंनी वर पाहिलं तेव्हा त्यांना काही अर्थबोधच होईना.

ज्याच्यावर जीवापाड प्रेम केलं. लाखो रुपये उधळले. ज्याचा प्रत्येक शब्द झेलला, ज्याला आपल्या आयुष्याचं सर्वस्व मानलं तो त्यांचा एकुलता एक मुलगा. त्याच्यावर रिव्हॉल्व्हर रोखून म्हणत होता- “हँडस् अप.” क्षणभर इसाकभाईंना वाटलं तो मस्कारी करतोय पण त्याच्या डोळयातली ती विचित्र चमक?... नाही नाही हा काही तरी वेगळाच प्रकार आहे.”

“हँडस् अप,” युसुफ पुन्हा म्हणाला.

अभावितपणे इसाकभाईंनी हात वर केले.

“नाऊ मूव्ह... मूव्ह... टोवर्डस् राइट.”

इसाकभाई उजवीकडे वळले. चार पावलं चालले . ”स्टॉप... अबाऊट टर्न... नाऊ लेफ्ट... हं... असं... फेऱ्या मारत राहा. फेऱ्या मारत राहा. “फेरी मारतांना थाबलात तर मी... गोळी झाडेन.”

म्हातारे इसाकभाई फेऱ्या मारत राहिले...

एक.. दोन.. तीन.. अधूनमधून ते युसुफ कडे पाहात. त्याच्या डोळयातली ती भयानक विचित्र चमक... फेऱ्या मारताना थांबायची त्यांची हिंमत होत नव्हती.

पण शेवटी फेऱ्या तरी किती मारणार? म्हातारं माणूस... थकले आणि थांबले.

“मूव्ह...”युसुफ ओरडला.

पण इसाकभाई तिथेच उभे राहून धापा टाकत राहिले.

आणि युसुफनं ट्रिगर ओढली.

एक गोळी सणसणत इसाकभाईंच्या पोटात शिरली. रक्त वाहू लागलं. ते पाहून तो भानावर आला. डॅडीना गोळी तर लागलीय . पोटातून रक्त वाहतंय. आता यांना हॉस्पिटलमध्ये नेऊया... कुठल्या हॉस्पिटल मध्ये नेऊया?... हं. होली क्रॉसमध्ये नेऊ या. युसुफ पुढे झाला. डाव्या हाताचा आधार देऊन त्यानं वडिलांना धरलं ते कण्हत कसेबसे चालत निघाले. युसुफच्या हातात रिव्हॉल्व्हर होतं. ते दोघं लिफ्टपर्यंत आले. लिफ्ट खाली गेली होती. युसुफनं लिफ्टचं बटण दाबलं. लिफ्ट वर आली. लिफ्टमननं लिफ्टचं दार उघडलं. समोरच दृश्य पाहून तो घाबरुनच गेला. एखादी प्रतिक्षिप्त क्रिया व्हावी तसं त्यांना न घेताच त्यानं लिफ्टचं जाळीचं दार बंद केलं. युसुफच्या हातात रिव्हॉल्व्हर होतंच.

त्यानं लिफ्टमनवर गोळी झाडली. गोळी लिफ्टमनच्या मांडीत शिरली. तो कोलमडला. दार उघडून वडिलांसह युसुफ लिफ्टमध्ये घुसला. लिफ्ट खाली आली.

जखमी अवस्थेतल्या वडीलांना डाव्या हाताचा आधार देत आणि उजव्या हातात पिस्तुल घेऊन तो लिफ्टमधून कंपाऊंडच्या गेटपर्यंत आला.

बाहेर एकच कल्लोळ उडाला. पण कोणाचीही हिंमत होत नव्हती. कंपाऊंडच्या बाहेर येऊन तो टॅक्सी शोधू लागला. पण एकही टॅक्सी येत नव्हती. लांब उभे राहिलेल्या माणसांचा घोळका टॅक्सीवाल्याला आधीच सावध करायचा. मग टॅक्सीवाला पुढे येईना.

युसुफनं त्या माणसांच्या दिशेनं एक गोळी झाडली. घोळक्यातली माणसं पांगली. सुदैवानं कोणाला गोळी लागली नाही.

एकही टॅक्सी मिळेना तसा युसुफ बॅंडस्टॅंडकडे निघाला. इसाकभाई कण्हत होतेच. बॅंडस्टॅंडला समुद्रकाठी बऱ्याच टॅक्सीज् उभ्या होत्या.

सगळयात मागच्या टॅक्सीत युसुफनं वडिलांना कसंबसं ढकललं आणि तोही बसला “होली क्रॉस हॉस्पिटल चलो.” पण टॅक्सीवालाही या दोघांना पाहून गडबडला होता.

“बंद करनेका टाइम हुआ है भाय... दुसरा गाडी देखो.” युसुफनं रिव्हॉल्व्हर त्याच्या डोक्याशी धरली. पॉइंट ब्लॅक.

त्यानं निमूटपणे टॅक्सी सुरु केली. टॅक्सीनं वेग घेतल्यावर युसुफनं रिव्हॉल्व्हर काढून घेतलं. वडिलांना कसंबसं तो रुमालानं त्याचं रक्त पुसू लागला.

त्याला वडिलांच्या जखमेशी बीझी झालेला पाहिला आणि टॅक्सीवाल्याला दुर्बुध्दी सुचली. त्यानं टॅक्सी होली क्रॉस हॉस्पिटलकडे न घेता हिल रोडवरुन पोलीस स्टेशनच्या दिशेन वळवली.

टॅक्सीनं मार्ग बदलला आहे हे युसुफच्या लक्षात आलं. त्यानं उजव्या हातातल्या पिस्तुलाचं नळकांड टॅक्सी ड्रायव्हरच्या मानेवर ठेवलं आणि चाप ओढला.

मानेतून आरपार गोळी गेली.

टॅक्सी ड्रायव्हर जागच्या जागी गतप्राण झाला. गाडीवरचा ताबा सुटला आणि गाडी समोरच्या चर्चच्या भिंतीवर आदळली. भिंतीवर आदळताना त्या टॅक्सीनं एका छोटया मुलाचा बळी घेतला.

दूध घ्यायला निघालेला तो छोटा मुलगा टॅक्सी आणि भिंत यामध्ये नेमका सापडला.

इकडे इसाकभाई तर जवळजवळ बेशुध्दच झाले होते. युसुफनं त्यांना कसंबसं टॅक्सीबाहेर काढलं आणि दोघं होली क्रॉस हॉस्पिटलच्या दिशेनं निघाले.

रस्त्यातले लोक अवाक् होऊन ते दृश्य पाहात होते.

डाव्या हातावर पोटातून रक्तस्त्राव होत असलेल्या एका म्हाताऱ्याला घेऊन चाललेला आणि उजव्या हातात पिस्तूल असलेला एक देखणा तरून पाहून ते सुन्न झाले होते.

युसुफ आणि इसाकभाई होली क्रॉस हॉस्पिटलमध्ये पोहोचले तेव्हा तिथले आऊट पेशंट डिपार्टमेंटमधली बाकडी हाऊसफुल्ल झाली होती. हातात पिस्तुल घेतलेल्या युसुफला पाहून तिथे एकच गडबड उडाली. एका मिनिटाच्या आत पटापट माणसं पळाली. परिचारिकाही इकडे तिकडे पळाल्या. आतमध्ये रोग्यांची तपासणी करणाऱ्या डॉक्टर्सनाही पुढे यायची हिंमत होईना. ओपीडीच्या त्या हॉलच्या मध्यभागी युसुफ उभा होता.

“एनी डॉक्टर हियर... इथे कोणी डॉक्टर आहे का?... युसुफ ओरडला.

पण कोणीही त्याला प्रत्युतर दिलं नाही. “माय फादर वॉटस् अ ट्रीटमेंट... एनी डॉक्टर हिअर ?”

कोणीही पुढे येईना. एका खांबाआड दडलेल्या एका डॉक्टरनं हळूच पोलीस कंट्रोल रुमला फोन करुन कळवलं.

त्याच नाक्यावर उभ्या असलेल्या वायरलेस गाडीला तात्काळ संदेश मिळाला आणि आमची वायरलेस गाडी होली क्रॉस हॉस्पिटलच्या दारात अक्षरशः दोन-तीन मिनिटात पोहोचली. “पिस्तुल फेक दो,” वायरलेसमधून उतरलेल्या पोलीसांनी युसुफला फर्मावलं.

युसुफनं पिस्तुल फेकलं तर नाहीच उलट ते पोलीसांवर रोखत तो म्हणाला,

“माझ्या वडिलांना ताबडतोब ट्रीटमेंट हवीय. तुम्ही डॉक्टरला पाठवा.”

एवढयात एक धीट आणि चुणचुणीत परिचारिका पुढे झाली. युसुफनं पोलिसांवर रोखलेलं पिस्तुल काढून तिच्यावर रोखलं.

पण ती घाबरली तर नव्हतीच उलट तिच्या चेहऱ्यावर स्मित होतं.

“हातात पिस्तुल घेतल्यावर कोणी पुढे येईल का?” तिनं प्रतिप्रश्न केला. “डॉक्टरलाही आपला जीव प्यारा आहे. तुम्ही पिस्तुल फेकून द्या. ताबडतोब डॉक्टर येतील आणि ट्रीटमेंट सुरु होईल. प्लीज, पिस्तुल फेकुन द्या. इटस् अ रिक्वेस्ट.”

तिच्या या बोलण्याचा विलक्षण परिणाम झाला युसुफनं पिस्तुल फेकलं.

क्षणार्धात डॉक्टरांनी इसाकभाईंचा आणि पोलिसांनी युसुफचा ताबा घेतला. परिचारिकेनंच युसुफचं पिस्तुल रुमालात उचलून पोलिसांच्या हवाली केलं.

एवढयात हॉस्पिटलमध्ये आणखी एक केस आली. युसुफच्या सोसायटीतल्या माणसांनी लिफ्टमनला आणलं होतं. त्याच्या मांडीत गोळी घुसली होती. हेही कृत्य युसुफचंच आहे हे सोसायटीतल्या लोकांनी पोलिसांना सांगितलं युसुफला अटक करण्यात आली. खुनी हल्ल्याचा गुन्हा नोंदवत असतानाच टॅक्सीवाल्याच्या खुनाची बातमीही येऊन धडकली आणि युसुफवर खुनाचं कलमच लावण्यात आलं.

लिफ्टमन काही दिवसांनी बरा झाला आणि त्याला सोडण्यात आलं. पण इसाकभाईच्या म्हाताऱ्या शरीरानं

मृत्यूशी दिलेली झुंज यशस्वी झाली नाही. आपल्याचं मुलानं मारल्याची घटना होती ती. इसाकभाईंच्या मनावरचा आघात जास्त मोठा होता.

स्वतःच्याच दत्तक मुलानं मारलेल्या गोळीमुळे तो कोटयाधीश वैफल्यग्रस्त म्हातारा पैगंबरवासी झाला.

पोलीस लॉकअपमध्ये सुन्न होऊन बसलेल्या युसुफला बोलतं करण्याचा पोलिसांनी खुप प्रयत्न केला. पण युसुफनं कधीच तोंड उघडलं नाही. त्याला असंख्य प्रश्न विचारण्यात आले. पण त्यानं एकाही प्रश्नाचं उत्तर दिलं नाही अगदी मरेपर्यंत.

युसुफची वैद्यकीय तपासणी झाली आणि त्याच्या डोक्यावर परिणाम झाल्याचं निष्पन्न झाल्यामुळे वेडयांच्या इस्पितळात त्याची रवानगी झाली. पण त्यानं मौन धरलं ते कायमचं. पुढे पुढे त्या**नं अन्नही वर्ज्य केलं.**

आणि एक दिवस वेडयांच्या इस्पितळातच गडगंज संपत्तीचा वारस असलेल्या युसुफ इसाक नळवाला या चोवीस वर्षाच्या मनोरुग्ण तरुणानं शेवटचा श्वास घेतला.

युसुफ नळवालाची की कथा पोलीसचातुर्य कथा नसली तरी ती एक दारूण शोकांतिका असल्यानं नेहमीच मला विषण्ण करते.

युसुफ हा अति लाडामुळे असा अहंकारी, एककल्ली आणि लहरी झाला. लहानपणी खेळण्यातल्या रिव्हॉल्व्हरने खेळणाऱ्या युसुफच्या मनात रिव्हॉल्व्हरच्या धाकानं घाबरणारे वडील कायम सुप्तावस्थेत राहिले. वडिलांचा छळ केल्यामुळे एक आसुरी आनंद त्याला मिळायचा आणि हया आसुरी आनंदानंच शेवटी अनेक बळी घेतले.

तो स्वतःसुध्दा एक बळीच ठरला.



निवृत्त पोलिस कमिशनर श्री. एम. एन. सिंग यांच्यातर्फे प्रशस्ती पत्रक स्विकारताना

# श्रध्दांजली



माझे वडिल दिवंगत विजय राजाराम पेडणेकर यांची इच्छा होती, त्यांचे पुस्तक छापले जावे परंतु त्यांचे ते स्वप्न अपुरे राहिले आणि आज मी त्यांची मुलगी सौ. भावना सुधीर चोरगे त्यांचे हे स्वप्न पुर्ण करीत आहे, याचे मला समाधान वाटते आणि हि माझ्याकडून त्यांना वाहिलेली भावपूर्ण श्रध्दांजली आहे.

माझे वडिल दिवंगत विजय राजाराम पेडणेकर यांचे दिनांक २३/०६/२०१६ रोजी निधन झाले आणि आई सौ. मंजू विजय पेडणेकर हिचे दिनांक ०५/०१/२०१२ रोजी निधन झाले. हा योगायोग म्हणावा की, दोघांनी एकमेकांवर केलेले जीवापाड प्रेम जे दोघेही एकमेकांच्या वाढदिवसाच्या तारखेलाच निधन पावले.

दोघांच्याही पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सौ. भावना पेडणेकर चोरगे आणि गांधी कुटूंबिय**
**व समस्त मित्रपरिवार**


OM SWEET OM
ANJUMAN-I-ISLAM

महाराष्ट्र दिन १ मे, १९९२ रोजी शिवाजी पार्क येथील
भव्य सोहळ्यात राष्ट्रपतीचे पोलिस पदक स्विकारताना



Anand Printing Press, Dadar - 14. M.: 9819736677